सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. १२ डिसेंबर २०२५ | वर्ष – ३ रे | अंक २४६ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### सह्याद्री रुग्णालय तोडफोड प्रकरणी सात जणांवर गुन्हा दाखल

**पुणे :** सह्याद्री रुग्णालयाची तोडफोड प्रकरणी सात जणांवर गुन्हा दाखल. हडपसरमधील सह्याद्री रुग्णालयात उपचारादरम्यान ज्येष्ठाचा मृत्यू झाल्यानंतर संतप्त नातेवाईकांनी रुग्णालयाची केली होती. डॉक्टरांनी ट्रीटमेंट व्यवस्थित केली नाही, त्यामुळे मृत्यू झाल्याचा आरोप करत ही तोडफोड करण्यात आली. पोलिसांनी तत्काळ दाखल होत, तोडफोड करणाऱ्या चौघांना ताब्यात घेतले. तर सात जणांवर गुन्हा दाखल केला. याप्रकरणी हडपसर पोलिस ठाण्यात शुभम सकपाळ, गौरव सकपाळ, विश्वजीत कुमावत, कुणाल सकपाळ यांच्यासह इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### आर.आर. आबांच्या लेकानं गाजवलं अधिवेशन

**नागपूर :** राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पाटलांकडुन सांगलीच्या तासगाव आणि कवठेमहांकाळ शहराच्या विकासाचे प्रश्न हिवाळी अधिवेशनात मांडण्यात आलेत. तासगाव आणि कवठेमहांकाळ शहरातले विविध योजना नगरविकास खात्याकडे प्रास्तवित असून या योजनांसाठी नगर विकास खात्याकडून निधी आणि मंजुरी मिळावी, अशी मागणी आमदार रोहित पाटलांकडून अधिवेशनाच्या पुरवणी मागणीवरून करण्यात आली आहे. तासगाव आणि कवठेमहांकाळ या दोन्ही शहरांच्या शाश्वत विकासासाठी तसेच पायाभूत सुविधा उभारणीतील अडचणी प्रामुख्याने रोहित पाटील यांनी मांडल्या.

### मुंबईत आतापर्यंत ४१०५७ दुबार मतदार

**मुंबई :** निवडणूक आयोगाच्या यादीमध्ये सुमारे ११ लाख १ हजार दुबार नावे होती. मात्र मुंबई महापालिकेने प्रत्यक्षात तपासणी केली असता पालिकेच्या २६ प्रभागांमध्ये २ लाख २५ हजार ६८ मतदारांची दुबार नावे दिसून आली. यापैकी ५० टक्के मतदारांची तपासणी केली असता यात आतापर्यंत ४१ हजार ५७ दुबार मतदार सापडले. त्यामुळे उर्वरित तपासणीनंतर १५ ते २० टक्केपर्यंत दुबार नावे राहण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

### ई-वाहनांना येत्या ८ दिवसांत टोलमाफी

**मुंबई :** राज्य सरकारने ई-वाहनांना टोल माफी जाहीर केली असतानाही टोलवसुली होत असून जनतेला सरकारने दिलेला शब्द मोडला जात आहे. त्यामुळे पुढच्या आठ दिवसांत एकाही ई-वाहनाकडून टोल वसूल केला जाऊ नये, असे स्पष्ट आदेश विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी बुधवारी विधानसभेत दिले. ई-वाहन धोरण २०२५ अंतर्गत समृद्धी आणि मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवे आणि अटल सेतू या तीन महामार्गावर टोलमाफी लागू करण्याचा जीआर २५ मे २०२५ रोजी जारी करण्यात आला आहे.

### राजन विचारे राज ठाकरेंच्या भेटीला

**मुंबई :** शिवसेना उबाठाचे माजी खासदार राजन विचारेंनी राज ठाकरेंची भेट घेतली. यावेळी राजन विचारेंसोबत केदार दिघेही उपस्थित होते. पत्रकारांशी बोलताना राज ठाकरेंशी सदिच्छा भेट घेतल्याचे त्यांनी यावेळी सांगितलं. राज ठाकरे ठाणे कोर्टात हजर राहण्यासाठी आले होते यावेळी रेस्ट हाऊसमध्ये राजन विचारे आणि केदार दिघे यांनी त्यांची भेट घेतली आहे.

### महाराष्ट्रात पुढचे ४८ तास थंडीच्या लाटेचे

**पुणे :** हिमालयावरून येणाऱ्या शीतलहरींचा थेट परिणाम मध्य भारतासह आता महाराष्ट्रावरही दिसत असून, राज्याच्या बहुतांश भागांमध्ये तापमानाच लक्षणीय घट नोंदवण्यात आली आहे. निफाड, धुळ्यासह नागपूर, जालना या भागांमध्ये किमान तापमान एकेरी आकड्यावर आल्यानं थंडीचा कडाका नागरिकांना घरात डांबून ठेवण्यास जबबादार ठरत आहे.

# मराठवाड्यातील ७० हजार कुटुंबांना हक्काचे घर

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची विधानसभेत घोषणा

**नागपूर :** छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांतील आणि चंद्रपूरच्या राजुरा भागातील सुमारे ७० हजार कुटुंबांना आज मोठा दिलासा मिळाला आहे. मराठवाड्यातील हजारो कुटुंबांच्या डोक्यावर टांगती तलवार असलेल्या 'मदत माश' इनामी जमिनींचा प्रश्न अखेर निकाली निघाला.

या जमिनींवरील निवासी घरे नियमित करण्यासाठी आता कोणताही नजराणा भरावा लागणार नाही. ती घरे मोफत नियमित करून रहिवाशांना जमिनीचे 'वर्ग-१' मालकी हक्क देणारे 'हैदराबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५' (विधेयक क्र. १०१) विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आले.

विधानसभेत मांडण्यात आलेल्या या विधेयकावर जयंत पाटील, अर्जून खोतकर, विजय वडेट्टीवार, देवराव भोंगळे, किशोर पाटील, बालाजी कल्याणकर, चंद्रदीप नरके, भास्कर जाधव, शेखर निकम, मनिषा चौधरी, सुरेश धस, कैलास पाटील यांनी चर्चेत सहभागी होत महत्वपूर्ण मुद्दे मांडले.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधेयक मांडताना स्पष्ट केले की, १९५४ च्या कायद्यानुसार या जमिनी भोगवटादार वर्ग-२ (नवीन व अविभाज्य शर्ती) म्हणून गणल्या जात होत्या. त्यामुळे या जमिनींवर कर्ज मिळत नव्हते किंवा त्या हस्तांतरित करता येत नव्हत्या. यापूर्वी अशा जमिनी नियमित करण्यासाठी चालू बाजारभावाच्या ५० टक्के किंवा ५ टक्के रक्कम भरावी लागत होती, ज्यामुळे नागरिक पुढे येत नव्हते. मात्र, आता मंजूर झालेल्या विधेयकानुसार, जर एखाद्याने

### हैदराबाद इनामे व रोखे अनुदाने रद्द सुधारणा विधेयक एकमताने मंजूर

जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय निवासी कारणासाठी जमिनीचा वापर केला असेल आणि त्याबाबतचे खरेदीखत किंवा नोंदणीकृत दस्तऐवज सादर केल्यास, कोणताही नजराणा न आकारता ती जमीन नियमित केली जाईल. तसेच, संबंधित जमीनधारकास 'भोगवटादार वर्ग-१' चा दर्जा मिळेल, ज्यामुळे त्यांना पूर्ण मालकी हक्क प्राप्त होतील.

चर्चेदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) गटनेते जयंत पाटील यांनी शंका उपस्थित केली. ते म्हणाले, हे विधेयक केवळ काही मूठभर लोकांसाठी किंवा विकासकांसाठी आहे का? देवस्थानांच्या जमिनी लाटून त्या विकल्या गेल्या आहेत, त्यांना अभय देण्यासाठी हा घाट घातला जात आहे का? हे विधेयक देवस्थान जमिनींना लागू होणार नाही, हे स्पष्ट करावे.त्यावर उत्तर देताना महसूलमंत्र्यांनी देवस्थानशी याचा काहीच संबंध नसल्याचे स्पष्ट केले. हे विधेयक केवळ 'मदत माश' इनामापुरते मर्यादित आहे.



यामध्ये छत्रपती संभाजीनगरमधील ९७ गट, जालन्यातील १०, परभणी, नांदेड, हिंगोली, लातूर, धाराशीव आणि चंद्रपूरमधील राजुरा येथील १० गटांचा समावेश आहे.

# नागपूरमध्ये अन्न-औषध सुरक्षेला आधुनिकतेची नवी ढाल!

**नागपूर :** खाद्य पदार्थातील भेसळ शोधून काढण्यासाठी प्रयोगशाळा व अत्याधुनिक यंत्र सामुग्री आदी सुविधा येथे उपलब्ध झाल्या आहेत. अन्न व

### मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते अन्न व औषधी प्रशासन, नागपूर विभागीय कार्यालयाचे उद्घाटन

औषधी प्रशासन, नागपूर विभागीय कार्यालयाची नूतन इमारत ५ मजली असून इमारतीचे बांधकाम १५०० चौरस मीटरवर करण्यात आले आहे. इमारतीच्या पहिल्या माळ्यावर औषध विभाग व दुसऱ्या माळ्यावर अन्न विभाग कार्यान्वित होणार आहेत. इमारतीमध्ये अत्याधुनिक उपकरणे असलेली प्रयोगशाळा उर्वरित जागेत असेल. या इमारतीचे बांधकाम १५ कोटी १७ लाखांच्या निधीतून करण्यात आले आहे.



नागपूर हे भारताचे मध्यवर्ती ठिकाण असल्यामुळे अन्नपदार्थांची वाहतूक व वितरण येथून मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे अन्नपदार्थ साठविण्यासाठी शीतगृहे, वेअर हाऊस, लॉजिस्टिक पार्क येथे मोठ्या प्रमाणात आहेत. नागरिकांना सुरक्षित पदार्थ उपलब्ध होण्यासाठी तसेच औषधे व खाद्यपदार्थांमधील भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषधी नमुन्यांची दर्जात्मक व गुणात्मक विश्लेषण करणे ही महत्त्वाची बाब आहे.

या प्रयोगशाळेत अद्ययावत यंत्र सामग्री व उपकरणे प्राप्त झाल्यामुळे अन्न व औषध प्रशासन कार्यालयाचे दैनंदिन कामकाज अधिक प्रभावी व गतिमान होण्यास मदत होणार आहे. यावेळी मंत्री नरहरी झिरवाळ व इतर मान्यवर उपस्थित होते.

# राज्यात ६ महिन्यांत ७८१ शेतकऱ्यांच्या आत्महत्या!

**नागपूर :** महाराष्ट्राच्या शेती क्षेत्रातील गंभीर समस्या पुन्हा एकदा विधिमंडळात उघड झाली आहे. राज्यात गेल्या सहा महिन्यांत (एप्रिल ते सप्टेंबर २०२३/२४) तब्बल ७८१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक आकडेवारी शासनाने लेखी उत्तरात मान्य केली आहे. केंद्र सरकारच्या राष्ट्रीय गुन्हे अहवाल २०२३ नुसार, देशातील सरासरी प्रत्येक दोन आत्महत्यांमध्ये १ आत्महत्या महाराष्ट्रातील शेतकऱ्याची असल्याची अत्यंत गंभीर बाब समोर आली आहे, ज्यामुळे कृषी क्षेत्रातील संकट अधिक गडद झाल्याचे स्पष्ट होते.


**विदर्भ आणि मराठवाड्यात सर्वाधिक बळी**

शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण महाराष्ट्रातील दोन प्रमुख विभागांमध्ये सर्वाधिक आहे, विदर्भामध्ये एकूण २९६ शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि मराठवाडामध्ये एकूण २१२ शेतकऱ्यांच्या आत्महत्या या आकडेवारीवरून हे स्पष्ट होते की, अनुक्रआत्महत्यामे कापूस आणि सोयाबीन पिकांवर अवलंबून असलेल्या या दोन्ही विभागांमध्ये आर्थिक ताण आणि नैसर्गिक संकटांमुळे शेतकरी सर्वाधिक त्रस्त आहेत.

# घरात घुसलेला बिबट्या दीड तासाच्या प्रयत्नाने जेरबंद

**सांगली :** सांगली जिल्ह्यातील शिवरवाडी (ता. शिराळा) येथील नवीन बांधकाम होत असलेल्या घरात घुसलेल्या बिबट्याला पकडण्यात वन विभाग, सह्याद्री रेस्क्यू वॉरिअर्स व रेस्क्यू टिमला अखेर दीड तासाच्या प्रयत्नानंतर यश आले. शिवरवाडीत अशोक बेंद्रे यांच्या घराचे बांधकाम अंतिम टप्प्यात आहे. दोन दिवसापूर्वी या दरवाजा नसलेल्या घरात बिबट्या असल्याचे आढळल्यानंतर हुसकावून लावले होते. आज सकाळी सात वाजता अशोक बेंदरे याचे भाऊ नाथा बेंदरे नळाचे पाणी भरण्यासाठी लागणारी पाइप आणण्यासाठी सदर घरकुलात गेले असता त्यांना बिबट्या बसल्याचे आढळले. सापडलेल्या बिबट्याला आज सायंकाळी चांदोली राष्ट्रीय उद्यानात सोडण्यात येणार आहे.

त्यांनी गुपचूप बाहेर येऊन इतर भाऊ अशोक, सहदेव, पोपट व दगडू बेंदरे यांच्या मदतीने उत्तर व पश्चिमेकडील दरवाजे पत्र्याच्या पाने लावून बंद केले व वन विभाग शिराळा यांना फोन करून माहिती दिली.



त्यानंतर तासाभराने वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी लोखंडी सापळा, जाळी घेऊन शिवरवाडीत पोहोचले. घराच्या एका चौकटीला लोखंडी सापळा लावून फटाके फोडण्यात आले. परंतु, बिबट्याने त्याला दाद दिली नाही. त्यानंतर बांबू, चिवे व काठ्यांच्या साहाय्याने ढकलून दीड तासांच्या प्रयत्नांनंतर अखेर बिबट्याला सापळ्यात जेरबंद करण्यात आले.


बिबट्याची पकड मोहीम पाहण्यासाठी गावासह पंचक्रोशीतील ग्रामस्थांची झुंबड उडाली होती. शिवरवाडीचे सरपंच श्रीकांत पाळेकर, उपसरपंच सोपान बेंदरे, पोलिस पाटील मोहन घागरे, पणुंब्रे तर्फ शिराळा सरपंच बाजीराव पाटील, उपसरपंच केशव सूर्यगंध, घागरेवाडीचे सरपंच विक्रम खोचरे, अनंत सपकाळ, बाजार समितीचे संचालक नामदेव बेंदरे आदींचा समावेश होता. वन विभागामार्फत वनपाल अनिल वाझे, वनरक्षक दत्तात्रय शिंदे, स्वाती कोकरे, सह्याद्री रेस्क्यू वॉरिअर्सचे संस्थापक सुशीलकुमार गायकवाड, धीरज गायकवाड, रेस्क्यू टीमचे संतोष कदम, गौरव गायकवाड, युनूस मणेर, मानव सुरले, शंतनू भोसले यांचा बिबट्याला पकडण्यात सहभाग होता.

# नायब तहसीलदार एसीबीच्या ताब्यात

**सिन्नर :** फेरफार नोंद मंजूर करून देण्याच्या बदल्यात तब्बल दहा लाखांची लाच मागणाऱ्या सिन्नर तहसील कार्यालयातील महसूल नायब तहसीलदार संजय भिकाजी धनगर (५१) यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अडीच लाखांची रक्कम स्वीकारताना मंगळवारी (दि. ९) रात्री नाशिकमधील सोपान हॉस्पिटलसमोर रंगेहाथ पकडले. या कारवाईमुळे महसूल विभागात खळबळ उडाली आहे.

दोडी खुर्द येथील तक्रारदाराने त्यांच्या मुलगा व सुनेच्या नावे गट नं. ४९९ मधील ३ हेक्टर ६० आर जमीन खरेदी केली होती. या खरेदीवरून फेरफार नोंद क्र. ३३४५ रद्द करण्यासाठी आलेल्या तक्रारीचा निकाल त्यांच्या बाजूने लावून देण्यासाठी तसेच प्रलंबित नोंद मंजूर करण्यासाठी धनगर याने ६ डिसेंबर रोजी १० लाखांची मागणी केल्याचे तक्रारीत नमूद आहे. तडजोडीतून अडीच लाखांवर व्यवहार ठरला. तक्रारदाराने एसीबीकडे धाव घेतली. त्यानंतर पथकाने जाळे टाकत मंगळवारी रात्री धनगर यास पंचासमक्ष लाच घेताना ताब्यात घेतले. त्याच्या विरोधात नाशिकच्या मुंबई नाका पोलिस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस अधीक्षक भारत तांगडे, अपर पोलिस अधीक्षक माधव रेड्डी व सुनील दोरगे यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक रुपाली खांडवी, हवालदार संदीप वणवे, प्रमोद पाळदे, शरद हंबाडे, युवराज खांडवी यांनी ही कारवाई केली.




# सहकार भारती तर्फे देवगिरी बँकेचा गौरव

**छत्रपती संभाजीनगर :** देवगिरी नागरी सहकारी बँक लि., छत्रपती संभाजीनगर बँकेस भारतीय रिझर्व्ह बँकेकडून 'शेड्युल्ड बँक' हा महत्त्वपूर्ण दर्जा प्राप्त झाला आहे. हा दर्जा प्राप्त करणारी देवगिरी बँक ही मराठवाड्यातील पहिली नागरी सहकारी बँक ठरली आहे आहे. या कामगिरीबद्दल सहकार भारती यांनी आयोजित केलेल्या सहकारी बँकांच्या राज्यस्तरीय प्रशिक्षण कार्यक्रमात देवगिरी बँकेचा सन्मान करण्यात आला.

शेड्युल्ड बँक दर्जा मिळवण्यासाठी रिझर्व्ह बँकेच्या कठोर निकषांची संपूर्ण पूर्तता देवगिरी बँकेने केली असून, देवगिरी बँकेचे हे यश मराठवाड्यातील सहकार चळवळीस चालना देणारे ठरले आहे, तसेच सहकारी बँकावरील ग्राहकांचा आणि भागधारकांचा विश्वास अधिक दृढ होण्यास याने मोठी मदत होत आहे असे मत याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.



या सोहळ्यास भारतीय रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे, भारतीय रिझर्व्ह बँकेचे मुख्य महाव्यवस्थापक दीपक कनोजिया, सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी आणि सहकार भारती महाराष्ट्राचे अध्यक्ष संजय बिर्ला उपस्थित होते. त्यांच्या हस्ते देवगिरी बँकेचा सन्मान करण्यात आला. देवगिरी बँकेचे संचालक सुरेश जगाडे, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे यांनी हा सन्मान स्वीकारला.

देवगिरी बँकेचे अध्यक्ष किशोरदादा शितोळे यांनी बँकेच्या सन्मानाबद्दल सहकार भारतीचे आभार व्यक्त करतांना शेड्युल्ड बँक दर्जा हा आमच्या कर्मचाऱ्यांची मेहनत, ग्राहकांचा विश्वास आणि संचालक मंडळाच्या सक्षम मार्गदर्शनाचा एकत्रित परिणाम आहे.

हा मान आम्हाला अधिक जबाबदारीने आणि पारदर्शकतेने काम करण्याची प्रेरणा देतो. आगामी काळात आम्ही अधिक आधुनिक, जलद आणि गुणवत्तापूर्ण सेवा देण्याचे लक्ष्य ठेवले आहे. असा विश्वास व्यक्त केला.

देवगिरी बँकेने मिळवलेला हा दर्जा केवळ संस्थेच्या प्रगतीचे द्योतक नसून, मराठवाड्यातील सहकार क्षेत्रासाठी नव्या संधींचा मार्ग मोकळे करणारे पहिले पाऊल म्हणूनही पाहिले जात आहे.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे बक्षीस वितरण

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, ११ डिसेंबर :** लातूर शहरातील खाडगाव रोड भागातील फय्याजशेख मित्र मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ नुकताच पार पडला. यावेळी एक हजार गरजू लोकांना थंडीपासून बचाव करण्यासाठी स्वेटर्सचेहीवाटप करण्यात आले.

या प्रसंगी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस मोईज शेख, जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, डॉ. राईस खान, काँग्रेसचे विभाग प्रमुख सूर्यकांत कातळे, माजी नगर-सेवक पप्पू देशमुख, अयुब मणियार, दत्ता सोमवंशी, नागसेन कामेगावकर, गणेश देशमुख यांसह मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हा लिफ्ट असो.चे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते फय्याज शेख यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक केले. या उपक्रमाच्या आयोजनामागची भूमिकाहीत्यांनी विस्तृतपणे विशद केली. वधात्या थंडीच्या पार्श्र्वभूमीवर गरजू लोकांना स्वेटरचे वाटप करण्याचा निर्णयही घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. टेनिस बॉल स्पर्धेत इब्राहिम सय्यद युवा मंचने प्रथम पारितोषिक पटकावले. द्वितीय पारितोषिक जय भवानी क्रिकेट क्लबने पटकावले. विजेत्या पहिल्या संघालारोख ११ हजार रुपयांचे तर दुसऱ्या क्रमांकाच्या विजेत्यांना पाच हजार रुपयांचे बक्षीस देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिषेक पाटील यांनी केले.



# उद्यापासून लातूरमार्गे पंढरपूर-तिरुपती रेल्वेसेवा



**मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागीय सल्लागार समितीचे सदस्य संजय निलेगांवकर यांची माहिती**

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, ११ डिसेंबर :** शनिवार, दि. १३ डिसेंबर २०२५ पासून पंढरपूर- तिरुपती व्हाया लातूर साप्ताहिक रेल्वेसेवा सुरु होणार असल्याची माहिती मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागीय सल्लागार समितीचे सदस्य संजय निलेगांवकर यांनी दिली.

पंढरपूरमार्गे तिरुपती रेल्वे सेवा सुरु करण्यात यावी, अशी मागच्या अनेक वर्षांपासूनची प्रवाशांची मागणी होती. रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य संजय निलेगांवकर यांनी दि. १० ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या रेल्वे सल्लागार समितीच्या महत्वपूर्ण बैठकीत ही मागणी आग्रहाने लावून धरली होती. त्यांनी ही रेल्वेसेवा लातूरमार्गे पंढरपूर-तिरुपती सुरु करण्याच्या दृष्टीने सकारात्मक प्रयत्न केले. त्यांच्या मागणीनुसार दक्षिण मध्य रेल्वे विभागाने गाडी क्रमांक ०७०१२ व ०७०१३ ही तिरुपती पंढरपूर - तिरुपती साप्ताहिक रेल्वे सेवा लातूरमार्गे सुरु करण्यास नुकतीच मंजुरी दिली आहे.

येत्या दि. १३ डिसेंबर २०२५ शनिवार पासून ही गाडी सुरु होणार आहे. गाडी क्रमांक ०७०१२ ही दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजून ४० मिनिटांनी तिरुपतीहून सुटेल.ही गाडी काचीगुडा, सिकंदराबाद, बिदरमार्गे दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. १४ डिसेंबर रोजी दुपारी २ वाजून २० मिनिटांनी लातूर स्थानकावर पोहचेल. ही गाडी सायंकाळी ६ वाजून ५० मिनिटांनी पंढरपूर स्थानकावर पोहचेल. गाडी क्रमांक ०७०१३ ही दर रविवारी पंढरपूरहून रात्री आठ वाजता निघेल. ही गाडी मध्यरात्री १२ वाजून १० मिनिटांनी लातूर रेल्वे स्थानकावर पोहचेल तर दुसऱ्या दिवशी म्हणजे सोमवारी रात्री साडेदहा वाजता तिरुपती स्थानकावर पोहचेल. या गाडीला एक एसी प्रथमवर्ग, एक एसी फर्स्ट कम टू टिअर, दोन एसी टू टिअर, ६ एसी थ्री टिअर, ९ स्लीपर क्लास, दोन द्वितीय श्रेणी कम दिव्यांग एसएलआर असे एकूण २३ डबे असणार आहेत. ही सुविधा तूर्तास दि. १३ डिसेंबर ते दि. २८ डिसेंबर २०२५ या कालावधीत सुरु असणार आहे. प्रवाशांच्या मिळणाऱ्या प्रतिसादावर या गाडीची पुढील रूपरेषा निश्चित केली जाणार असल्याचे संजय निलेगावकर यांनी सांगितले.

याशिवाय या बैठकीत हरंगुळ रेल्वे स्थानकाची प्लॅटफॉर्मची उंची आणि लांबी वाढविणे, लातूर -पुणे-खडकी इंटरसिटी रेल्वे सेवा सुरु करणे आदी विषयांवरही महत्वपूर्ण चर्च झाल्याची माहिती निलेगांवकर यांनी दिली.

# स्ट्राँग रुमसह विविध ठिकाणी आयुक्तांनी केली पाहणी

## निवडणुकीच्या अनुषंगाने महापालिका ॲक्शन मोडवर





**लातूर :** आगामी काही दिवस-ात होणाऱ्या महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय, मतमोजणी, तसेच स्ट्राँग रूमसाठी जागा आवश्यक आहे. त्याअनुषंगाने मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी बुधवारी (दि. १०) स्थळ पाहणी केली.

आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने महानगरपालिका प्रशासन तयारी करत आहे. मतदानानंतर मतमोजणी पर्यंत काही दिवस मतपेट्या संरक्षित ठिकाणी ठेवाव्या लागतात. तसेच त्यानंतर मतमोजणीसाठीही सुरक्षित स्थळ आवश्यक असते. त्याअनुषंगाने आयुक्तांनी पाहणी करून चाचपणी केली.

मतमोजणी व स्ट्राँग रूमसाठी बार्शी रस्त्यावरील महिला तंत्रनिकेतन तसेच औसा रस्त्यावरील पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतनच्या इमारतींची पाहणी आयुक्तांनी केली. मतमोजणीसाठी आवश्यक असणाऱ्या बाबी/सोयी-सुविधाची पाहणी केली. या ठिकाणी अधिकच्या कोणत्या सोयी कराव्या लागतील याची माहितीही आयुक्तांनी घेतली.

निवडणुकीत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र कार्यालय आवश्यक आहे. त्यासाठी बार्शी रस्त्यावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय तसेच बाजार समिती परिसरातील समाज कल्याण कार्यालय या ठिकाणांची पाहणीही आयुक्त श्रीमती मानसी यांनी केली.

याप्रसंगी मनपा उपायुक्त डॉ.पंजाबराव खानसोळे, शहर अभियंता उषा काकडे, कार्यकारी अभियंता विजय चव्हाण, अग्निशमन अधिकारी गणेश चौधरी, प्रवीण इंगळे, निवडणूक विभाग प्रमुख परमेश्वर होके यांच्यासह सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# एमआयडीसीच्या दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या जीवितास धोका



**भाजप नेत्या डॉ. अर्चना पाटील चाकुरकर यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन**

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, ११ डिसेंबर :** हरंगुळ (बु.) मंदार वस्ती आणि मौजे वरवंटी (बसवंतपूर) परिसरातील नागरिकांना लातूर चखऊ मधून नाल्याद्वारे येणाऱ्या दूषित पाण्याचा प्रचंड त्रास होत असून नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम दिसत आहेत. या गंभीर समस्येबाबत भारतीय जनता पक्षाच्या नेत्या डॉ. अर्चना पाटील चाकुरकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केले आहे की, एमआयडीसीमधील सांडपाणी थेट नाल्यात सोडले जात असल्याने ते लोकवस्तीमध्ये मिसळत आहे. परिणामी नागरिकांच्या अंगावर पुरळ, एलर्जी, त्वचारोग यांसारख्या समस्या मोठ्या प्रमाणावर वाढल्या आहेत. विशेषतः महिला आणि लहान मुलांचे आरोग्य गंभीर धोक्यात आल्याचे नमूद केले आहे. डॉ. चाकुरकर यांनी सांगितले की, नागरिकांनी अनेक वेळा तक्रारी करूनही योग्य तो परिणामकारक पाणी व्यवस्थापन केले गेलेले नाही. त्यामुळे दूषित पाणी थेट लोकवस्तीत येत असून नागरिकांच्या जीवितास प्रत्यक्ष धोका निर्माण झाला आहे. निवेदनात पुढे असा उल्लेख करण्यात आला आहे की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पर्यावरण अधिनियम १९८७ अंतर्गत एमआयडीसवर कठोर कारवाई करावी. तसेच दूषित पाणी बाहेर जाण्याची व्यवस्था तात्काळ बंद करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी तातडीच्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. शेवटी, डॉ. अर्चना पाटील चाकुरकर यांनी प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न लक्षात घेऊन त्वरित कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत हृदयरोगावर होणार उपचार

**जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा पालकांशी संवाद**



**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, ११ डिसेंबर :** राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत सन २०२५-२६ मध्ये जिल्ह्यातील अंगणवाडी आणि शासकीय, निमशासकीय शाळांमधील ० ते १८ वर्षे वयोगटातील बालकांची व विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. यामध्ये हृद्यद-ोष आढळलेल्या २४ बालकांवर पुणे येथील विविध नामांकित रुग्णालयांमध्ये मोफत शस्त्रक्रिया केली जाणार असून यासाठी ही बालके रवाना झाली. यानिमित्ताने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या पालकांशी संवाद साधला. आरोग्य उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. अशोक सारडा, डॉ. आनंद कलमे तसेच राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांची वर्षातून दोन वेळा आणि ६ ते १८ वर्षे वयोगटातील बालकांची वर्षातून एक वेळा आरोग्य तपासणी केली जाते. यासाठी जिल्ह्यात ३० पथकांची तपासणी करण्यात आली आहे. बालकांमध्ये आढळणारे जन्मतः असलेले व्यंग, लहान मुलांमधील आजार, जीवनसत्वाच्या कमतरतेमुळे होणारे आजार व दिव्यांगत्व याचे वेळीच निदान व उपचार होण्यासाठी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम उपयुक्त ठरत आहे.

सन २०२५-२६ या वर्षात जिल्ह्यातील एकूण १ हजार २९९ बालकांमध्ये दृष्टीदोष, ४ हजार ६०१ बालकांमध्ये दातांचा आजार आढळून आला आहे. त्यांना पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात आले आहे.

# कॅन्सरग्रस्त भारतबाई जाधव यांना संजय राजुळेंच्या वतीने ५० हजारांची मदत

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, ११ डिसेंबर :** औसा तालुक्यातील मोगरगा येथील भारतबाई भाऊसाहेब जाधव या सध्या अन्ननलीकेचा कॅन्सर ने त्रस्त असुन दरमहा ७० हजार रुपये खर्च येत असल्याने मोगरगा येथील भाऊसाहेब शेषेराव जाधव हे आर्थिक विवंचनेत होते.

त्यांची ही माहिती मिळताच लातूर येथील सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांनी त्यांच्या मित्र परिवारास आवाहन केले व स्वतः अशी ५० हजाराची मदत केली आहे.

लातूर येथील सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांनी मोगरगा येथील भारतबाई भाऊसाहेब जाधव यांना अन्ननलीकेच्या कॅन्सर च्या उपचारासाठी आतापर्यंत २० लाख रुपये खर्च झाले. घरची बचत संपली. दागदागीने संपले, पुढील उपचारासाठी १६ लाख रूपयांची गरज जाधव परिवाराला आहे. ही गरज ओळखून लातूर येथील सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांनी मित्र परिवाराच्या मदतीने मदत करून जाधव परिवाराला आधार दिला.

तसेच या परिवाराला पुढील मदतीसाठी संजय राजुळे यांनी मदतीचे आवाहन केले असुन समाजातील दानशूर व्यक्तीनी शक्य तेवढी मदत करावी.

**जाधव कुटुंबीयांना आणखीन मदतीची गरज**

औसा तालुक्यातील जाधव कुटुंबीयांना कॅन्सर या आजारावर उपचार करण्यासाठी मोठी रक्कम लागणार असून त्यांची परिस्थिती अतिशय हलाखीची आहे ती ओळखून सामाजिक कार्यकर्ते राजुळे यांनी मदत केली आहे व सामाजिक कार्यकर्त्यांसह सामाजिक संघटने कडून या कुटुंबीयांना जेवढी होईल तेवढी मदत करावी असे आव्हान सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांनी जाधव कुटुंबीयांच्या ९६२३७४३१२५ या नंबर वरती फोन पे किंवा गुगल पे करून मदत करावी असे आवाहन केले आहे.

# 'मुक्तांगण'मध्ये डिश डेकोरेशन, रांगोळी स्पर्धा

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, ११ डिसेंबर :** लातूर येथील विशाल नगर परिसरातील, साईमंदिर समोरील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित मुक्तांगण इंग्लिश स्कूलमध्ये पालकांच्या करिता डिश डेकोरेशन आणि रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे कविता लाटे व शाळेच्या प्राचार्या सुमेरा शेख यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून करण्यात आले. याप्रसंगी पालक, शिक्षिका व विद्यार्थी उपस्थित होते.

शाळेच्या पालकांनी तयार केलेल्या डिशेस प्रदर्शनात सादर करण्यात आल्या. पालकांनी सादर केलेले डिश डेकोरेशन हे आपल्या संस्कृतीशी निगडीत होते. मुलांना कशा प्रकारे खावयाच्या पदार्थात आवड निर्माण करता येईल या उद्दे-शाने पालकांनी नव-नवीन पदार्थ तयार करून दाखवले.

सदर कार्यक्रमाचे परीक्षक कविता लाटे यांनी खाद्यपदार्थांचे परीक्षण करून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक निवडला. यामध्ये विद्यार्थ्यांच्या पालकामधून प्रथम क्रमांक प्रियांका सतलिंग बुलबुले, ज्योती विजयकुमार चिंचोलकर, पूनम छगन बन द्वितीय क्रमांक दीक्षा धनंजय देलमाडे, वर्षा शेखर कोरे तृतीय क्रमांक सोना-ली गोपाल खटावकर, रोहिणी नितीन बचाटे, वैष्णवी गिरीश गर्जे, ज्योती विशाल महालकर, तृप्ती श्रीनिवास नाईकनवरे यांना देण्यात आला.

# जिल्ह्यात शनिवारी राष्ट्रीय लोकअदालत

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, ११ डिसेंबर :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्दे शानुसार लातूर जिल्हा व सत्र न्यायालय, तसेच लातूर जिल्ह्या-तील सर्व तालुका न्यायालयात शनिवार, १३ डिसेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आलेले आहे. लोक अदालतीमध्ये दोन्ही पक्षकारांच्या संमतीने प्रकरण निकाली काढल्यास न्यायालयीन शुल्क तथा कोर्ट फी परत मिळते. त्यामुळे पक्षकार व विधीज्ञ यांनी १३ डिसेंबर रोजीच्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये आपली प्रकरणे आपसी तडजोडीने निकाली काढावीत, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष संजय जे. भारूका, तसेच सचिव व्यंकटेश गिरवलकर यांनी केले आहे.

# शहरात राबवणार को ब्रँडेड आयुष्यमान कार्ड निर्मिती मोहीम



**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, ११ डिसेंबर :** आरोग्य संरक्षण अधिक प्रभावी व सुकर करण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना यांचे को ब्रँडेड कार्ड निर्माण करणे संदर्भात मार्गदर्शक सूचना निर्गमित केले आ-हेत.

त्या अनुषंगाने दिनांक ९ डिसेंबर २०२५ ते ३० डिसेंबर २०२५ दरम्यान लातूर शहरांमध्ये आयुष्मान कार्ड निर्मिती करण्यासाठी विशेष मोहीम राबवली जात आहे. लातूर शहर महानगरपालिकेतील आरोग्य केंद्र, सीएससी सेंटर तसेच रास्त भाव दुकान या ठिकाणी केवायसी केली जाणार आहे. तसेच लागलीच आयुष्मान कार्डची निर्मिती देखील केली जाणार आहे.

या योजनेचा लाभ लातूर शहरा-तील सर्व नागरिकांना घेता येतो. यामध्ये प्रामुख्याने प्रतिक कुटुंब प्रति वर्ष रुपये पाच लाखापर्यंत मोफत शस्त्रक्रिया व उपचार हे २३९९ आजारांवरती शहरातील खाज-गी व शासकीय असे एकूण ३६ रुग्णालयामध्ये उपचार घेता येऊ शकतात. अँड्रॉइड मोबाईल मध्ये आयुष्मान प डाऊनलोड करून प मधील बेनिफिशियरी बटन वर क्लिक करून लाभार्थी स्वतःचे ई केवायसी कार्ड काढू शकतात याशिवाय आपल्या नजीकच्या आरोग्य केंद्रामध्ये अशा स्वयंसेविका मार्फत, आरोग्य कर्मचारी यांचेमार्फत तसेच रास्त भाव दुकान, सीएससी सेंटर येथे देखील इ केवायसी करून कार्ड काढून घेता येते.

या कार्डमुळे देशभरातील अधिकृत रुग्णालयांमध्ये उपचार घेणे लाभार्थ्यांना शक्य होणार आहे. महाराष्ट्रातील सरकारी व मान्यता प्राप्त खाजगी रुग्णालयांमध्ये देखील याचा लाभ मिळणार आहे. दरवर्षी प्रती कुटुंब पाच लाखांपर्यंतचे कॅशलेस आरोग्य कवच या कार्डच्या आध-ारावर मिळते. यात शस्त्रक्रिया दाखल करून उपचार, आपातकालीन सेवा यांचा समावेश आहे.

शहरातील सर्व पात्र नागरिकांना या योजनेचा लाभ घेता येतो शासकीय कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय देखील या आरोग्य योजनेचा लाभ घेऊ शकतात.

शहरातील नागरिकांनी या योजनेचा लाभ घेऊन आरोग्य विभागामार्फत तसेच सीएससी रास्त भाव दुकानदार यांना आयुष्यमान कार्ड निर्मिती करणे कामी सहकार्य करावे. असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती मानसी व उपायुक्त श्रीमती वसुधा फड यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# विवाह सोहळ्यात वारकरी संस्कृतीचे दर्शन कौतुकास्पद : पोलीस अधीक्षक

**अहिल्यानगर, दि.११ डिसेंबर :** प्रदुषणकारी डीजे ध्वनीक्षेपकाचा वापर टाळून विवाह समारंभात वारकरी संप्रदायाच्या पवित्र परंपरेचे दर्शन घडविण्याचा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी केले.

शेवगाव येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत कार्यरत असलेले अशोक सखाराम राऊत यांची कन्या सौ अंजली आणि केडगाव येथील राजेंद्र गोपीनाथ घोडके यांचे चिरंजीव अमोल यांचा विवाह नुकताच पार पडला. या सोहळ्यात मुलीचे मामा कृष्णा मसुरे यांच्या समन्वयाने डीजे ध्वनिक्षेपकाऐवजी पर्यावरणपूरक आणि संस्कृती जतनाच्या हेतूने टाळ, मृदुंग, पखवाज, वीणा यांसारख्या पारंपरिक वाद्यांच्या सुरावटीत वधू-वर विवाहबद्ध झाल्याने उपस्थितांना वारकरी संप्रदाय संस्कृतीचे दर्शन घडले.



या पर्यावरणपुरक व आदर्श उपक्रमाची दखल घेऊन हरिभूमी प्रतिष्ठानच्या वतीने वधू-वर व दोन्ही कुटुंबीयांचा जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या शुभहस्ते पर्यावरणमित्र सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. विवाह समारंभात होणारे ध्वनीप्रदूषण टाळण्यासाठी अशा उपक्रमांची गरज आहे. इतरांनीही या पथदर्शी उपक्रमापासून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी केले. डीजेच्या कर्कश आवाजामुळे होणारे ध्वनीप्रदूषण मानवी शरीराला तसेच संपूर्ण सजीव सृष्टीला अतिशय धोकादायक आहे. त्यामुळे विवाह समारंभामध्ये नागरिकांनी डीजे ऐवजी पारंपारिक वाद्यवृंदाचा वापर करून महाराष्ट्राची संस्कृती जपण्याचे कार्य करावे असे आवाहन हरिभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभय ललवाणी यांनी केले.

यावेळी राजेंद्र घोडके, संगीता घोडके, अशोक राऊत, अरुणा राऊत, ऋषिकेश ललवाणी, संकेत घोडके, अभय राऊत आदी उपस्थित होते.

## थोडक्यात...

### सोलिसतर्फे किसान पुणे २०२५ मध्ये प्रगत ट्रॅक्टर्सचे प्रदर्शन




**छत्रपती संभाजीनगर :** सोलिस यानमारने पुण्यातील 'किसान ॲग्री शो २०२५' मध्ये आपल्या अत्याधुनिक आणि शक्तिशाली ट्रॅक्टर्सची श्रेणी सादर केली आहे. यामध्ये प्रामुख्याने 'नेक्स्ट जेन प्लॅटफॉर्म'वर आधारित सोलिस जेपी ९७५, बागायतीसाठी उपयुक्त सोलिस २७१६ एसएन आणि वायएम २३५ या मॉडेल्सचा समावेश आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि कार्यक्षमता वाढवण्यासाठी हे ट्रॅक्टर्स प्रगत ४-सिलिंडर इंजिन, १५एफ+१५आर ट्रान्समिशन आणि आधुनिक फिचर्सने सज्ज आहेत. याशिवाय सोलिस ५७२४ ४डब्लूडी आणि वायएम ३४८आर हे मॉडेल्सही प्रदर्शित करण्यात आले आहेत. सोलिस यानमारचे अध्यक्ष मुदित गुप्ता यांनी यावेळी शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी सर्वोत्तम तंत्रज्ञान देण्याची ग्वाही दिली. हे प्रदर्शन मोशी, पुणे येथे १४ डिसेंबर २०२५ पर्यंत सुरू राहणार आहे.

### अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना बियाणे व खतांचे वाटप



**बिडकीन :** अतिवृष्टी आणि मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान सहन केलेल्या टेकडितांडा, पोरगाव आणि गेवराई बासी (ता. पाथन, जि. संभाजीनगर) येथील शेतकऱ्यांना तातडीच्या मदतकार्यातून बियाणे आणि खतांचे वाटप करण्यात आले. ही उपक्रमशील मदत छत्रपती संभाजीनगर धर्मप्रांत व छत्रपती डायोसिस सोशल सर्व्हिस सोसायटी यांच्या माध्यमातून राबविण्यात आली. या कार्यासाठी वसई धर्मप्रांत तसेच उदारमनाच्या दात्यांनी विशेष मदत उपलब्ध करून दिली. यापूर्वीच अतिवृष्टीच्या काळात आपत्कालीन मदत म्हणून धान्य व किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले होते. त्यानंतर शेतकऱ्यांना शेती पुन्हा उभी करण्यासाठी बियाणे व खतांचे वाटप मोठा आधार ठरले आहे.

### आत्मनिर्भर भारताच्या ध्येयाला अमेझॉनचे समर्थन

**छत्रपती संभाजीनगर :** अमेझॉन संभव शिखर परिषदेच्या सहाव्या आवृत्तीत कीस्टोन स्ट्रॅटेजीने प्रसिद्ध केलेल्या इकॉनॉमिक इम्पॅक्ट अहवालानुसार, २०१० पासून भारतात अमेझॉनने केलेल्या ४० अब्जच्या एकत्रित गुंतवणुकीचे, यात कर्मचाऱ्यांना दिली गेलेली भरपाई आणि पायाभूत सुविधांचा विकास यांचाही समावेश आहे, भारताच्या आत्मनिर्भर दृष्टिकोनात महत्त्वपूर्ण योगदान आहे. कीस्टोनच्या मते, या गुंतवणुकीमुळे अमेझॉन भारतातील सर्वात मोठा परदेशी गुंतवणूकदार, सर्वाधिक ई-कॉमर्स निर्यात सक्षम करणारी कंपनी आणि देशातील सर्वोच्च रोजगार निर्माता ठरला आहे. पूर्तता केंद्रे, वाहतूक नेटवर्क, डेटा सेंटर, डिजिटल पेमेंट पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञान विकासासह भौतिक आणि डिजिटल पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी कंपनीने मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली आहे. कीस्टोन अहवालानुसार, २०२४ मध्ये भारतीय उद्योगांमधील सुमारे २.८ दशलक्ष प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, प्रेरित आणि हंगामी नोकऱ्यांना अमेझॉनने चालना दिली.

### गती व स्टाइल आले एकत्र

मुंबई - स्ट्रीक्स या हायजेनिक रिसर्च इन्स्टिट्यूट (एचआरआय) च्या भारतातील आघाडीच्या हेअर कलर व केअर ब्रँडने आपले वैविध्यपूर्ण इनोव्हेशन स्ट्रीक्स शॅम्पू हेअर कलरसाठी प्रॉडक्ट ॲम्बेसेडर म्हणून भारतीय क्रिकेट संघामधील प्रमुख वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहच्या नियुक्तीची घोषणा केली आहे. उत्साहवर्धक नवीन मोहिम 'मेन फास्ट, स्ट्रीक्स सुपर-फास्ट'च्या माध्यमातून या सहयोगाला सादर करण्यात आले आहे. ही मोहिम आत्मविश्र्वास, गती आणि आकर्षक स्टाइलला साजरे करते.

### पिरामल फायनान्सचा महाराष्ट्रात विस्तार

मुंबई: पिरामल फायनान्स लिमिटेडने आज महाराष्ट्रभर मोठ्या विस्ताराची घोषणा केली असून आर्थिक वर्ष २०२८ पर्यंत एकूण १.५ लाख कोटी रुपये एयूएम गाठण्याचे चे लक्ष्य ठेवले आहे. महाराष्ट्र पिरामल फायनान्ससाठी सर्वात मोठ्या बाजारपेठांपैकी एक असून नाशिक, नागपूर, पुणे आणि कोल्हापूरसह राज्यातील प्रमुख शहरांमध्ये ७७ शाखांच्या मदतीने १,२१,००० हून अधिक ग्राहकांना सेवा पुरवली जाते.

### रेडबसतर्फे मराठी भाषेतील इंटरफेस

**मुंबई :** रेडबस या जगातील सर्वात मोठ्या ऑनलाइन बस तिकिटिंग व्यासपीठाने त्यांच्या अँड्रॉईड ॲपवर मराठी भाषेतील इंटरफेस सादर केला आहे. या प्रकारची सुविधा देणारे हे एकमेव बस तिकिटिंग व्यासपीठ आहे. या अपडेटमुळे पूर्णपणे स्थानिक मराठी भाषेतून बुकिंग सुविधा उपलब्ध झाली आहे. आता वापरकर्त्यांना त्यांच्या प्राधान्यक्रमाच्या भाषेत सर्च, नेव्हिगेट आणि संपूर्ण बुकिंग करता येणार आहे. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील मराठी बोलणाऱ्या समुदायासाठी सादर झालेला हा भाषेचा पर्याय भारतात उपलब्ध आहे.

### वीवो ने नॅशनल जिओग्राफिक क्रिएटिव्ह वर्क्स सोबतच्या सहकार्याची घोषणा केली

**मुंबई :** वीवोने आज नॅशनल जिओग्राफिक क्रिएटिव्ह वर्क्स सोबतच्या त्यांच्या नवीन सहकार्याची घोषणा केली, गो इनटू द वाइल्ड, हा एक इमर्सिव्ह फोटोग्राफी आणि स्टोरीटेलिंग उपक्रम आहे जो पूर्णपणे नवीन वीवो एक्स३०० सिरीजवर चित्रित केला गेला आहे. मागील आवृत्तीच्या यशानंतर, या वर्षीचा प्रकल्प नॅट जिओ एक्सप्लोरर आणि देशभरातील निर्माते आणि छायाचित्रकारांना भारताच्या वन्य भूप्रदेशात घेऊन जातो, जिथे ते अस्पृश्य लँडस्केप्स, वन्यजीव भेटी आणि नैसर्गिक दृश्ये सिनेमॅटिक तपशीलात कॅप्चर करतात.

### शामराव देवरे यांचे निधन



**सोयगाव :** येथील शामराव तुकाराम देवरे (वय.३८) यांचे अल्पशा आजाराने दि.९ मंगळवार रोजी रात्री ९:१२ वाजता निधन झाले.त्यांचेवर दि.१० रोजी सकाळी ९ वा.सोयगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात वडील, आई, दोन भाऊ, पत्नी, तीन मुली, एक मुलगा असा परिवार आहे. नामदेव देवरे, लक्ष्मण देवरे यांचे ते भाऊ होत.

## कन्नड शहरात 'मांजा' विक्रीचा पर्दाफाश

**तभा वृत्तसेवा**

**कन्नड, दि. १० डिसेंबर :** कन्नड शहरात जीवघेणा मांजा दोरा खुलेआम विक्रीस ठेवला जात असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला गुप्त बातमीदारामार्फत मिळताच पथकाने तातडीने धडक कारवाई करत एकाला ताब्यात घेतले. शहरात रोजच्या गर्दीत आणि वाहतुकीत हा घातक मांजा कोणत्या दुर्घटना घडवू शकला असता, याचा विचार करता शहर पोलिसांना याची कल्पनाच कशी नाही? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

पोलिस निरीक्षक विजयकुमार राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली. पथकात सहाय्यक पोलिस निरीक्षक पवन हिंगमीरे, पोलिस हेडकॉन्स्टेबल अशोक वाघ, विष्णू गायकवाड, अनिल काळे, महेश बिरोटे, संजय तांदळे व महिला पोलिस अंमलदार प्रिया भंडारे यांचा समावेश होता.

शिवनगर येथे आरोपी शेख नासेर शेख कबिर (वय ५६) हा अवैधरीत्या ७६४० रुपयांचा मांजा आपल्या घराच्या परिसरात विक्री करत असल्याचे आढळून आले. त्याच्याकडून घातक मांज्याचे साहित्य जप्त करण्यात आले. या प्रकरणात फिर्यादी म्हणून पोलिस हेडकॉन्स्टेबल अशोक वाघ यांनी तक्रार नोंदवली असून पुढील तपास कन्नड शहर पोलिस ठाण्यातील मोईस यांच्याकडे आहे.

नियमबाह्य आणि जीवघेणा मांजा शहरात विक्रीस उपलब्ध असणे ही गंभीर बाब असल्याचे पोलिसांनी सांगितले. गर्दीच्या भागात, महामार्गांवर किंवा मोपेड/दुचाकीस्वारांच्या गळ्याला हा मांजा लागल्यास जीवाला मोठा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे नागरिकांनी अशी विक्री दिसताच तातडीने पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या या वेळेवरच्या कारवाईमुळे संभाव्य अनर्थ टळला असला तरी शहर पोलिसांच्या हलगर्जीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

### स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई; शहर पोलिसांच्या गाफीलपणावर प्रश्नचिन्ह



## जिल्हा कारागृहात आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिन

**तभा वृत्तसेवा**

**अहिल्यानगर, दि.११ डिसेंबर :** व्यक्ती हा जन्मतः गुन्हेगार नसतो, तर परिस्थिती किंवा क्षणिक रागामुळे त्याच्या हातून गुन्हा घडतो. त्यामुळे कारागृहातील बंद्यांनी भूतकाळातील चुका विसरून, स्वतःमध्ये सकारात्मक बदल घडवत 'वाल्याचा वाल्मिकी' बनावे, असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी केले.



महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने, अहिल्यानगर जिल्हा कारागृहात आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना घार्गे बोलत होते. या कार्यक्रमास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव योगेश पैठणकर, नायब तहसीलदार मयूर बेरड, प्रमुख वक्ते ॲड. सुनील मुंदडा, कारागृह अधीक्षक एस. पी. कवार, तुरुंगाधिकारी अरुण मदने आदी उपस्थित होते.

पोलीस अधीक्षक घार्गे पुढे म्हणाले , अनावधानाने किंवा परिस्थितीमुळे कारागृहात यावे लागले तरी, येथील वास्तव्याचा उपयोग स्वतःच्या सुधारणेसाठी करावा. गुन्हेगारी प्रवृत्ती सोडून देऊन मुख्य प्रवाहात सामील होण्याचा निश्चय प्रत्येकाने करावा. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव योगेश पैठणकर यांनी प्राधिकरणातर्फे दिल्या जाणाऱ्या 'मोफत विधी सेवे'ची माहिती दिली. आर्थिक परिस्थितीमुळे कोणताही बंदी न्यायापासून वंचित राहू नये, यासाठी विधी सेवा प्राधिकरण कटिबद्ध असून, बंद्यांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मिश्रक श्रीमती हर्षल रेळे, सुभेदार हिराचंद ओंबासे, गणेश बेरड, सुनील विधाते यांनी परिश्रम घेतले.


## 'प्रत्येक महिन्यात एक उपवास' संकल्पनेवर दिल्लीत आंतरराष्ट्रीय संमेलन

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि.११ डिसेंबर :** तपस्वी सम्राट सन्मति सागरजी महाराज आणि जैनाचार्य पुष्पदंत सागरजी महाराज यांच्या पावन आशीर्वादाने, १२ व १३ डिसेंबर २०२५ रोजी नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे भव्य आंतरराष्ट्रीय जनमंगल संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. 'अंतर्मना धार्मिक एवं पारमार्थिक न्यास' आणि 'पतंजली योगपीठ हरिद्वार' यांच्या संयुक्त विद्यमाने हा द्वि-दिवसीय कार्यक्रम होत असून, संमेलनाचे मुख्य आकर्षण म्हणजे परमपूज्य अंतर्मना आचार्यश्री १०८ प्रसन्नसागरजी महाराज व योगऋषी स्वामी रामदेवजी महाराज यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

संमेलनाचा केंद्रबिंदू हर मास - एक उपवास या संकल्पनेवर आधारित असून, योग, ध्यान, त्याग आणि तपस्येचे आध्यात्मिक व वैज्ञानिक महत्त्व जनसामान्यांपर्यंत पोहोचवणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. लोकमंगलाची सम्यक दृष्टी : स्वदेशी चिंतन, योग, ध्यान आणि उपवास या विषयावर देश-विदेशातील विचारवंत, संत, योगाचार्य, वैज्ञानिक व तज्ज्ञ मंथन करणार आहेत.





कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, भूपेंद्र यादव, धर्मेंद्र प्रधान यांच्यासह पंडित धीरेंद्र शास्त्री, आचार्य बालकृष्ण, महंत बालकनाथ, दिल्ली महापौर रेखा गुप्ता, खासदार योगेंद्र चंदोलिया, बांसुरी स्वराज, सुधांशु त्रिवेदी आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

छत्रपती संभाजीनगर, पैठण, कोल्हापूर, मुंबई, बीड, हैदराबाद, इंदूर, नागपूर, कानपूर, राजस्थान, दिल्ली, अहमदाबाद आदी ठिकाणांहून हजारो भक्त सहभागी होणार असल्याची माहिती नरेंद्र अजमेरा,

## सिल्लोड तालुक्यात अवैध धंदे बोकाळले

**तभा वृत्तसेवा**

**सिल्लोड, दि.११ डिसेंबर :** नगरपरिषद कामात गुंतलेले असल्याने तालुक्यात मोठ्या प्रमाणात अवैध धंद्यांनी जोर धरला असून शहरालगतच्या पूर्णा नदी पात्रातून रात्रीचा बेसुमार वाळू उपसा सुरू आहे. सर्रास मटका व्यवसाय,पत्त्यांचे क्लब,गुटखा आणी अवैध दारु अशी अनेक अवैध धंदे जोमाने सुरू झाल्याने सर्व सामान्य जनता त्रस्त झाली आहे.

पुढील महिन्यात होणाऱ्या नगरपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने पोलीस व महसूल प्रशासनावर मोठ्या प्रमाणात जबाबदारी असल्याने इतर बाबींकडे संबंधित यंत्रणेचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे खोडकाई वाडी परिसरातील पूर्णा नदी पात्रातून रात्री आठ वाजेपासून पहाटेच्या सहा वाजेपर्यंत बेसुमार अवैध वाळू उपसा सुरू आहे. याबाबत महसूल व पोलीस प्रशासनातीलच काही कर्मचाऱ्यांचे या वाळूमाफियांशी लागेबांधे असल्याने त्यांचे वर कारवाई होत नसल्याचे बोलले जात आहे. ट्रॅक्टर टिप्पर आदी वाहनांच्या माध्यमातून सुरू असलेल्या या अवैध वाळू उपसा मुळे पूर्णा नदी पात्रात मोठमोठे खड्डे पडत आहेत याशिवाय वाळू पट्ट्यांचा लिलाव झालेला नसल्याने वाळूची चोरी होत असून यामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे शासनाला लाखो रुपयांचा चुना लावणाऱ्या या वाळू माफियांवर कारवाई करण्याची महसूल अथवा पोलीस प्रशासनामध्ये हिम्मत नाही काय ? असा संतप्त सवाल शहरातील नागरिकांकडून विचारल्या जात आहे.

## अतिरिक्त जिल्हा न्यायालय, वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश न्यायालयास मंजुरी

**कन्नड, दि.११ डिसेंबर :** तालुक्यातील न्यायप्रक्रिया अधिक सक्षम आणि प्रभावी करण्याच्या दिशेने ऐतिहासिक पाऊल उचलत उच्च न्यायालयाने कन्नड येथे अतिरिक्त जिल्हा न्यायालय आणि दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर न्यायालय स्थापन करण्यास प्रस्तावित मंजुरी दिली आहे. कन्नड परिसरातील नागरिकांना वर्षानुवर्षे भेडसावत असलेली न्यायालयासाठी दूरवर जाण्याची समस्या आता मोठ्या प्रमाणात सुटणार आहे. या निर्णयामुळे न्यायप्रक्रियेची वेगवान अंमलबजावणी होऊन सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. या महत्त्वपूर्ण उपक्रमामागे कन्नड वकील संघाचा सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि अथक मेहनत मोलाची ठरली आहे. वकील संघातील भगवान चव्हाण (माजी अध्यक्ष), ॲड. एम. एम. भारूका, ॲड. वसंत काळे, ॲड.निलेश थोरात, ॲड.जे.सी.मगर, ॲड. मेने, तसेच ॲड. सय्यद आणि ॲड. निसार शेख यांनी वेळोवेळी न्यायालयीन अधिकाऱ्यांशी संपर्क, आवश्यक दस्तऐवजांची पूर्तता आणि मंजुरी प्रक्रियेचा पाठपुरावा करतही महत्त्वाची भूमिका बजावली.

या मंजुरी प्रक्रियेत दिवाणी न्यायाधीश कन्नड आणि जिल्हा न्यायालय यांच्या सहकार्याचा मोठा वाटा राहिला. त्यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे प्रस्तावास गती मिळाली आणि कन्नडच्या न्यायव्यवस्थेचे चित्र बदलण्याचा मार्ग मोकळा झाला.

## समाजातला संकोच दूर करण्यासाठी 'पीरियड' मेळावा

**तभा वृत्तसेवा**

**जालना, दि.११ डिसेंबर :** आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टचा उपक्रम असलेल्या 'उजास'ने आपल्या चौथ्या वर्धापनदिनानिमित्त जालन्यातील अनाया गार्डन येथे 'पीरियड मेळा'चे भव्य आयोजन केले. जिल्ह्यातील तब्बल १० शाळांमधील ५०० पेक्षा अधिक किशोरवयीन मुला-मुलींनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमास जालना महानगरपालिका आयुक्त आयएएस आयशा मित्तल प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.




मासिक पाळीविषयी समाजात असलेला संकोच दूर करून वैज्ञानिक आकलन वाढवणे हा या मेळ्याचा मुख्य हेतू होता. जून २०२३ ते नोव्हेंबर २०२५ या काळात उजासने जालन्यात तब्बल १०,३२९ सत्रांद्वारे दोन लाखांहून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत (मुलगे व मुली) मासिक पाळी आरोग्याचा संदेश पोहोचवला. स्थानिक बचत गटांच्या माध्यमातून १,०५,२३७ 'उजास ग्रीन क्लॉथ पॅड्स'चे उत्पादन करण्यात आले असून, यातून महिलांना दरमहा ७ ते १० हजार रुपयांचे शाश्र्वत उत्पन्न मिळत आहे.

उजासच्या प्रमुख पुनम पाटकर यांनी सांगितले की, मासिक पाळी आरोग्य हा शांत बसण्याचा नव्हे तर मुलभूत हक्काचा विषय आहे. गेल्या चार वर्षांत उजासच्या कार्यामुळे मुलींच्या ज्ञानात २१ ते ३२ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

**जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस**

**मा. श्री. ए. ए. कळमकर, ३ रे सह. दिवाणी न्यायाधिश, (क. स्तर) न्यायालय गंगापूर**

प्रकरणात पुढील तारीख ३०/०१/२०२६

सिव्हिल एम. ए. क्र.८४५/२०२५

अर्जदार -१) शकील अहमद खलील अहमद खान पठाण वय -५९ वर्षे, धंदा - मजूर, रा. पोस्ट ऑफिस जवळ, चमनपुरा, गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद, २) शहीन बेगम युसुफ खान वय - ५४ वर्षे, धंदा - घरकाम, रा. वाल्मीक नगर, जालना ता. जि. जालना, ३) रईस खलील अहमद खान पठाण वय - ५२ वर्षे, धंदा - मजूर, रा. पोस्ट ऑफिस जवळ, चमनपुरा, गंगापूर, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद, ३) सिमाबेगम मोहमद इमायखान पठाण वय - ४९ वर्षे, धंदा - घरकाम, रा. २६८७, उत्तमभाई चाल, मंदिर फलीया रोड, गायत्री मंदिर, जवळ, अमली, पो. सिलवासा, दादरा - नगर हवेली, ता. जि. दादरा - नगर हवेली, ५) शिरिनबानो तरबेज पठाण वय - ३७ वर्षे, धंदा - घरकाम रा. नाईकवाडी गल्ली, नेवासा, मा. नेवासा जि. अहमदनगर,

विरूद्ध

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण - बॉंम्बे रेग्युलेशन ॲक्ट तखखख १८२७ अन्वये लिगळ हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेंस कळविण्यात येते की उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालयात ड. आफताब एस. शेख रा. गंगापूर ना. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत बॉंम्बे रेग्युलेशन क्ट तखखख १८२७ अन्वये लिगळ हेअरशिप सर्टिफिकेट / वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं. १ ते ५ हे वरील नमूद ठिकाणाने कायमरूपी गहणगरअसुन अर्जदार क्रं. १ ते ५ हे आपसात सख्खे भाऊ, विवाहित बहिणी आहे. अर्जदार क्रं. १ते ५ यांचे वडील नामे मयत झालेले आहे. अर्जदार क्रं. १ ते ५ यांची आई नामे आयबदाबी खलील अहमद ह्यां देंगीन दिनांक १०/०९/१९८७ रोजी मौजे गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेली आहे. त्यामुळे मयत खलील अहमद चांद खा पठाण यांना अर्जदार क्रं. १ व ३ मुले असुन अर्जदार क्रं. २, ४ व ५ या विवाहित मुली या नात्याने कायदेशीर वारसदार असुन अर्जदार क्रं. १ ते ५ यांच्या व्यक्तिरित इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत खलील अहमद यांनी या अर्जदारांना वारस असल्याचे घोषित करून शासकीय, निमशासकीय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता सदर प्रकरणी कोणाचेही कोणाचेही कारण असुन यास व वारसावर कोणाचाही आक्षेप किंवा इतर काहीही आक्षेप घेतला आहे. मयत झालेल्यापासून ३०दिवसांच्या आत या न्यायालयात नोदववा. त्यानंतर आलेल्यास ज्यावर आक्षेप घेतला आहे.व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे याचिकांचा हक्कावर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल करता जाहिर आज दिनांक ११/१२/२०२५ रोजी माझ्या महिने व या न्यायालयाच्या शिक्कयनाशी दिले.

**लिपिक सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**

**जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस**

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २७०/२०२५.

१. आनंदाबाई धनराज जाधव, वय ४० वर्षे, धंदा घरकाम. रा. गलवाडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर,ह.मु आन्वा, ता. भोकरदन, जि. जालना, २. निवृत्ती धनराज जाधव, वय १७ वर्षे, धंदा शिक्षण, अ.पा.क अर्जदार क्रं. १.

विरुद्ध -

१. शाम शेनफड जाधव, वय ६० वर्षे, धंदा शेती, रा. गलवाडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर, २.धनराज शेनफड जाधव (मयततर्फे वारस), अ. वैशाली पवन बावस्कर, वय २० वर्षे, रा. वसई, ता. सिल्लोड, जि. छ. संभाजीनगर नगर, आ. अजय धनराज जाधव, वय १९ वर्षे, धंदा मजुरी, रा. वरीलप्रमाणे, ३. शोभाबाई श्रिपत गवळी, वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. हळदा, ता. सिल्लोड, जि. छ. संभाजीनगर, ४. सरलाबाई कोंडिराम बावस्कर, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. वसई ता, सिल्लोड, जि. छ. संभाजीनगर.

प्रकरण :- **वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत**

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अ. आगे सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत भागाबाई शेनफड जाधव यांचा दिनांक १७/०८/२०२४ रोजी गलवाडा अ., ता. सोयगांव येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्चयात वरील अर्जदार व गैरजअर्जदार हेच वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत भागाबाई शेनफड जाधव यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार व गैरअर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी दिनांक १०/१२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे,

पु.ता.३/१/२०२६.

**आदेशावरुन, विभीगीय लिपीक**
**सहाय्यक अधीक्षक**
**(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)**
**१. नोटीसबोर्ड, दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव,**
**२.ग्रामपंचायत कार्यालय गलवाडा,**
**ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर.**

**जाहीर प्रगटन**

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २९९/२०२५

१. संगिता राजु बारी, वय ४७ वर्ष, धंदा शेती, रा. शिरसोली, ता. व. जि. जळगांव, २. दत्तात्रय तुळशिराम फुसे, वय ४५ वर्ष, धंदा शेती, रा. शिवाजीनगर आमखेडा, ता. सोयगाव, जि.छ. संभाजीनगर, ३. विक्रम तुळशिराम फुसे, वय ४२ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे

विरुद्ध कोणीही नाही

प्रकरण :- **वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत**

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ड. शुभम अ. आगे सोयगाव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत तुळशिराम शामराव फुसे यांचा दिनांक ३०/१०/२०१२ रोजी आमखेडा, ता. सोयगांव येथे मृत्यु झालेला असून त्यांच्या पश्यात वरील अर्जदार हेव बारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार है मयत तुळशिराम शामराव फुसे यांचे वारस असून त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उनर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार व गैरअर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक१०/१२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. १५/१२/२०२५

**आदेशावरून,**
**विभागीय लिपीक**
**सहाय्यक अधीक्षक**
**(दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगाव)**

प्रतिलीपी :-
**१. नोटीसबोर्ड, दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव,**
**२. ग्रामपंचायत कार्यालय आमखेडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर.**

## अग्रलेख...

# मानव-वन्यजीव संघर्ष शमवा होऽऽ!

एकाच दिवशी तीन महिलांवर हल्ला करून वाघाने त्यांना ठार केले. त्यात एकाच कुटुंबातील सासू-सुनेचा समावेश होता. लगेच पुढच्या तीन दिवसांत वन्यजीवांनी अन्य तीन महिलांच्या नरडीचा घोट घेतला. त्यातल्या एकीला तर वाघाने चक्क तिच्या पतीदेखत फरफटत नेले आणि काही क्षणांत ठार केले. चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही व मूल तालुक्याच्या या घटना काही महिन्यांपूर्वीच घडलेल्या. त्यापूर्वी, चंद्रपूर महानगरानजीक दुर्गापूर परिसरातून खेळणाऱ्या मुलाला बिबट्याने उचलून नेले आणि त्याचा जीव घेतला. त्याच काळात महाऔष्णिक वीज केंद्राच्या वसाहतीत शिरून वाघाने चक्क आईच्या हातचे पोर उचलून नेले. काय वाटले असेल त्या माउलीला! या साऱ्या घटना ऐकताना, वाचताना नेहमीच्या वाटत असल्या तरी त्यामागचे दुःख फार मोठे आहे हे समजून घ्या. कोणतेही संवेदनशील मन हळहळल्याशिवाय राहणार नाही अशा या घटना राज्याच्या एका कोपऱ्यात, चंद्रपूर जिल्ह्यात घडल्या; नव्हे अजूनही घडत आहेत. जेथे म्हणून जंगल आहे त्या गडचिरोली, नागपूर, नाशिक, अहिल्यानगर आणि पुण्यातही हे घडत आहे. आम्ही जंगलाशेजारी राहतो, रान व त्यातल्या जीवांना आपल्या पोरासारखे जपतो, हा काय आमचा दोष आहे?, असा प्रश्न सांत्वन करायला गेलेल्यांना विचारला जातो, तेव्हा त्यांच्या हाती निरुत्तर होण्यापलीकडे काहीच उरत नाही. राज्यातील ३५.२१ टक्के जंगल असलेल्या या भागाची व येथे वास्तव्य करणाऱ्या गावकऱ्यांची ही शोकांतिका आहे. जंगल जपण्याची जबाबदारी केवळ आमचीच आहे का, हा त्यांचा प्रश्न तेवढाच स्वाभाविक आणि अंतर्मुख करणारा आहे.

हाच प्रश्न मंगळवारी राज्याच्या हिवाळी अधिवेशनात बराच गाजला. वाघ व बिबटे मानवी वस्तीत शिरत असून, त्यांच्या हल्ल्यात अनेकांचे जीव जात आहेत. दुसरीकडे गावात भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट आहे. नागरिकांना वस्त्यांमध्ये फिरणे कठीण झाले आहे, अशी व्यथा सर्वपक्षीय आमदारांनी मांडली आणि या संवेदनशील प्रश्नावर ठोस उपाययोजनेची मागणी केली. गेल्या पाच वर्षांत झालेल्या वाघांच्या हल्ल्यांत तब्बल २५० जणांचा, तर बिबट्यांच्या हल्ल्यांत ८७ आणि रानडुकरे, कोल्हे, अस्वल, तडस, लांडगा आदींच्या हल्ल्यांत एकूण ३७७ जणांचा राज्यात बळी गेला आहे. धक्कादायक व तेवढीच चिंतेची बाब म्हणजे, गेल्या दहा महिन्यांत वाघ व बिबट्यांनी तब्बल ४७ जणांचे जीव घेतले आहेत. ही केवळ वनविभागाची आकडेवारी आहे. जगात फक्त १४ देशांत वाघ आहे. त्यातले ५० टक्के वाघ एकट्या भारतात असून, त्यातही विदर्भ वाघांची संख्या देशात अग्रेसर आहे. आपल्या उपराजधानीला वाघाच्या राजधानीचा दर्जा आहे. चंद्रपूर जिल्हा तर वाघाचे माहेरघरच आहे. देखण्या, रुबाबदार अशा वाघाच्या भूमीत राहण्याचा गर्व अनुभवत असताना, सोबतीला मानव-वन्यजीव संघर्षाच्या गंभीर समस्येचे ओझेही हाच परिसर वाहतो आहे. सद्यःस्थितीत पेटलेला हा संघर्ष शमवा होऽऽ अशी आर्त हाक येथील गावागावांतून ऐकू येत आहे. ही हाक विधिमंडळापर्यंत पोहोचली हे बरे झाले. कारण 'वाघ व बिबट्याच्या हल्ल्यात गावकऱ्यांचा मृत्यू' अशा बातम्यांबद्दलची संवेदनाच एव्हाना बोथट होत चालली होती. खरे तर, अशा हल्ल्यांत ज्यांच्या घरचा जीव जातो, त्यांच्या दुःखाची कल्पना करणे अवघड असते. कुणाची आई आपल्या चिमुकल्यांना सोडून गेली. तर कुणाच्या डोक्यावरचे बापाचे छत्रच नाहीसे झाले आहे. गावकऱ्यांचे जीवनच जंगलाशी जुळले असताना त्यांनी जंगलात जाऊ नये म्हणून आजवरच्या सत्ताधाऱ्यांनी त्यांची मूलभूत गरज भागवली का? या प्रश्नाचे उत्तर त्यांना अपेक्षित होते. तो विषय विधिमंडळात आला. जानेवारी महिन्यात 'वाईल्डकॉन-२०२५' ही भारतातील पहिली परिषद चंद्रपुरात झाली. मानव-वन्यजीव संघर्ष हा या परिषदेचा विषय होता. 'संरक्षित क्षेत्राबाहेरील वन्यप्राण्यांच्या संख्येवरील नियंत्रणासाठी अभिनव आणि संवेदनशील उपाययोजना' असे गोंडस नाव देऊन या परिषदेत दोन दिवस चर्चासत्र रंगले. देश-विदेशातून आलेल्या तज्ज्ञांच्या मंथनातून मानव-वन्यजीव संघर्ष कमी होण्याचा मार्ग निघेल, अशी आशा व्यक्त केली गेली. यापूर्वी या पद्धतीचे प्रयत्न झालेच नाहीत, असेही नाही. पण आजवर अशा प्रयत्नांतून या गंभीर प्रश्नावर उपाययोजना झाल्याचे ऐकिवात नाही. खरे तर, अशा परिषदा आणि संमेलनांतून या समस्येचा मार्ग सापडेल ही भ्रामक कल्पना आहे. प्रत्यक्ष कृतीशिवाय मार्ग सापडणारही नाही. मध्यंतरी वाघ गावाजवळ आला की गावकऱ्यांना लगेच त्यांच्या भ्रमणध्वनीवर सावधगिरीच्या सूचना देणारे तंत्रज्ञान विकसित केले गेले आणि ते ताडोबात वापरले गेले. या उपक्रमाचे कौतुक खुद्द देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीसुद्धा त्यांच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून केले. पण त्याचा प्रत्यक्ष किती लाभ झाला याची आकडेवारी अद्याप वनविभागाने जाहीर केली नाही. घटना घडल्या की, संबंधित वाघ-बिबट्याला शोधायचे, त्यांना बेशुद्ध करून जेरबंद करायचे एवढाच काय तो या समस्येवरचा उपाय आहे, असे समजणे भविष्यातली मोठी चूक ठरेल. समस्येचे मूळ शोधून त्यावर ठोस उपाय शोधले गेले पाहिजेत.

वाघाचे बछडे मोठे झाले की ते स्वतःचे साम्राज्य उभे करतात. त्यासाठी त्यांना सीमोल्लंघन करावे लागते. अशावेळी त्यांना 'कॉरिडॉर' हवा आहे. मात्र तो कोळसा खाणी व महामार्गांच्या जाळ्यांमुळे बाधित आहे. त्यावर उपाय म्हणून 'ओव्हर पास वे' असले तरी ते मोठ्या संख्येत प्रस्तावित आणि प्रलंबित आहे. ते आधी पूर्ण केले पाहिजे. जेथे वाघ, बिबटे मोठ्या प्रमाणात आहेत अशा जंगलातून त्यांचे स्थलांतरण करणे हाही एक चांगला उपाय आहे. तसा प्रयत्न ताडोबा प्रकल्पातून होतही आहे. नागझिरा अभयारण्य, सह्याद्री व ओडिशाच्या सिमलीपाल व्याघ्र प्रकल्पात ताडोबाच्या वाघिणींना यशस्वीरीत्या पाठवले गेले आहे. पुढेही असे प्रयत्न होत राहावेत. वाघ व बिबट्यांना जंगलातच पुरेसे खाद्यान्न मिळावे म्हणून तृणभक्षी प्राण्यांची संख्या वाढणे, त्यासाठी त्यांचे खाद्य असलेल्या स्थानिक गवताच्या प्रजाती जपणे, त्या वाढवणे ही कामे युद्धपातळीवर झाली पाहिजेत. उन्हाळ्यात वन्यजीवांना पुरेसे पिण्याचे पाणी मिळावे याची तरतूद आधीच केली पाहिजे. वाघ, बिबट, हरिण किंवा अन्य वन्यजीवांचा सकस व आवडता आहार कोणता, हे जाणून घेण्यासाठी 'नॅशनल सेंटर फॉर बॉयोलॉजिकल सायन्सेस' या संस्थेच्या माध्यमातून 'डीएनए मेटाबार कोडिंग' पद्धतीने शोधकार्य सुरू केले आहे. त्याच्या निकषानुसार गवताच्या बाहेरच्या प्रजाती काढून २ ते ३ हजार हेक्टरमध्ये स्थानिक व दर्जेदार गवताचे रोपण आणि संवर्धन करण्याचे काम ताडोबात होते आहे. असे केले नाही तर हरणांची संख्या कमी होईल, असे गंभीर संकेत या शोधातून मिळाले आहेत. शिवाय ग्रामस्थांचे जंगलावरचे अवलंबन कमी करण्यासाठी इंधन पुरवठा करणे, तेंदुपत्ता संकलनाच्या काळात त्यांना संरक्षण देणे, जंगलाच्या सीमेवर सौर ऊर्जा कुंपण उभारणे, विशेषतः बिबट प्रवण क्षेत्रांतील घरे, गोठे, शाळा यांच्याभोवती कुंपण उभारणे, आवश्यक असल्यास बकऱ्या जंगलात सोडणे; जे वनमंत्र्यांनी विधिमंडळात कबूलही केले आहे; अशा साऱ्या उपाययोजना तातडीने केल्या पाहिजेत. वाघ, बिबटे, आणि भटक्या कुत्र्यांचा मानवी वस्तीतील वाढता धोका ही एक धगधगती सामाजिक-नैसर्गिक आपत्ती ठरू पाहत आहे. नैसर्गिक अधिवासाचा संकोच आणि मानवी वस्तीची वाढ या दोन पातळ्यांवरील संघर्षातून निर्माण झालेली ही समस्या आहे. वाघ-बिबट्याच्या हल्ल्याइतकाच गंभीर, किंबहुना रोजच्या जगण्याला भेडसावणारा प्रश्न म्हणजे भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट. शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांवर, कामावर जाणाऱ्या महिलांवर आणि वृद्धांवर भटके कुत्रे हल्ले करीत आहेत. या कुत्र्यांच्या चाव्यामुळे रेबीजचा धोका असून, अनेक सरकारी रुग्णालयात रेबीजच्या लसीचा तुटवडा असल्याने गरीब रुग्णांना जीव गमवावा लागल्याची उदाहरणेही समोर आली आहेत. भटक्या कुत्र्यांना पकडून त्यांची नसबंदी आणि लसीकरण करण्याची मोहीम युद्धपातळीवर राबवणे आवश्यक आहे. शिवाय, शहरांतील कचरा व्यवस्थापन सुधारणे गरजेचे आहे जेणेकरून भटक्या कुत्र्यांसाठी अन्न उपलब्ध होणार नाही. पाळीव कुत्र्यांसाठी रेबीज लस आणि परवाना अनिवार्य करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर दंड आकारणेही आवश्यक होऊन बसले आहे. या समस्येवर राजकीय इच्छाशक्तीने आणि लोकसहभागाने तोडगा काढणे काळाची गरज आहे. अन्यथा, हा संघर्ष अनेक निष्पाप जीवांचे बळी घेत राहील.

---


## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# सद्दी स्मार्ट कॅलेंडरची

पूर्वी डिसेंबर महिना आला की डायऱ्या आणि कालदर्शिक (कॅलेंडर) आणणे अनिवार्य असायचे. घरोघरी स्वयंपाकघरात फ्रिजशेजारी भिंतीवर कॅलेंडर विराजमान होत असे. या कॅलेंडरवर अनेक सांसारिक गोष्टी लिहिल्या जात असत. साखर संपली, दूध, वाणसामान भरले, वाढदिवस, विवाहदिवस दिलेले आहेर, प्रवास तारखा, उपवास अशा अनेक गोष्टींची नोंद असे. नंतर त्यात पंचांगही आले. मुहूर्त, दिन विशेष अशा अनेक गोष्टी महिन्याच्या मागील पानावर वा उजवीकडील जागेत लिहिल्या जात असत. महत्त्वाचे सण कधी आहेत, गोरज मुहूर्त कुठले अशी इत्थंभूत माहिती कालदर्शिकेत असे. कॅलेंडर हे मराठी कुटुंबातील एक सदस्य असे. स्वयंपाकघरात त्याची हक्काची जागा असे. माझी आजी जुने कॅलेंडर न काढता त्यावरच नवीन वर्षाचे लावत असे. 'असे का' असे विचारताच, दूधवाले, कामाच्या बायांशी चर्चा (वाद) करताना मदत मिळते, कारण त्यावर खाडे, कमी जास्त अशा अनेक उपयुक्त गोष्टी लिहिलेल्या असत. अनेकदा मी आजीला रात्री कॅलेंडर्स वाचून कागदावर विशेष नोंदी लिहिताना पहिले. हे तू काय करते आहेस असे विचारता 'तुला कळणार नाही' असे उत्तर मिळायचे. आता गोष्टी वेगाने बदलत आहेत. या सर्व बाबी मोबाईल ॲपवर आहेत. मोबाईलचा आणखी एक फायदा म्हणजे तो सतत तुमच्याजवळ असतो. त्यामुळे तुम्हाला कुठेही माहिती मिळते.

आजच्या वेगवान जगात वेळ व्यवस्थापन हे अत्यंत महत्त्वाचे बनले आहे. कॅलेंडर हे वेळेचे नियोजन करण्याचे मुख्य साधन आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशिन लर्निंग, बिग डेटा ॲनालिसिस, रोबोटिक्स या आणि यासारख्या घटकांमुळे संबंधित संगणकीय प्रणाली आणि यंत्रणा स्वतंत्रपणे निर्णय घेणाऱ्या आणि स्वयंभू बनत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्र वेगाने विकसित होत आहे आणि त्याचा कॅलेंडर आणि वेळ व्यवस्थापनावर मोठा परिणाम होत आहे. यामुळे आपले दैनंदिन जीवन, काम आणि सामाजिक नियोजन करण्याच्या पद्धतीत मोठे बदल होत आहेत. त्यासाठी एआय टूल्स कॅलेंडर एआय, गुगल असिस्टंट, क्लॉकवाईज, शेड्युल एआय अशी अनेक लोकप्रिय कॅलेंडर्स उपलब्ध आहेत. त्याचबरोबर आपले चॅटबॉट्सही मदत करतात. तुमच्या कॅलेंडरमध्ये अपॉईंटमेंट्स आणि मीटिंग्ज हाताने लिहायचे दिवस आता इतिहासजमा झाले.




एआय-सक्षम वैयक्तिक सहायक आता सूत्रे हाती घेत आहेत, तुमचे वेळापत्रक व्यवस्थापित करण्याचा ते एक संपूर्ण सखोल दूरगामी मार्ग देतात. नैसर्गिक भाषा प्रक्रिया क्षमतांनी सुसज्ज असलेले हे सहायक वापरकर्त्यांना त्यांच्या कॅलेंडरशी संभाषणात्मक संवाद साधण्याची परवानगी देतात. तुमच्या व्हर्च्युअल सहायकाला तुमच्या आगामी कार्यक्रमांबद्दल फक्त सांगा किंवा तुमच्या दिवसाचा सारांश विचारा आणि ते उर्वरित काम हाताळेल. या तंत्रज्ञानाचा वापर करणारे कॅलेंडर ॲप तुमच्या ऐतिहासिक वेळापत्रकांचे विश्लेषण करू शकतात, कमाल उत्पादकता तास ओळखू शकतात आणि बैठकीच्या सोयीस्कर वेळा सुचवू शकतात. स्थान, उपस्थितांची उपलब्धता आणि निकड यासारख्या घटकांचा विचार करून एआयचालित वेळापत्रक तुमचे कॅलेंडर तुमच्या अद्वितीय कार्यप्रवाहाशी सुसंगत असल्याचे सुनिश्चित करते. आयुष्य अप्रत्याशित असते आणि योजना अनेकदा बदलतात. कधी पाऊस पडतो, लोकांची विमाने चुकतात, काही वेळा लोक आजारी पडतात. अशा वेळी आपल्याला वेळापत्रक बदलावे लागते आणि त्यात अनेक घटक आणि व्यक्ती सहभागी असतात. एआय कालदर्शन ॲप्स गतिमान पुनर्नियोजन क्षमता सादर करत आहेत, ज्या अनपेक्षित परिस्थितीशी पटकन जुळवून घेऊ शकतात. शेवटच्या क्षणी बैठक रद्द करणे असो किंवा प्राधान्यक्रमांमध्ये अचानक बदल असो, तुमचे कॅलेंडर मानवी हस्तक्षेपाशिवाय स्वयंचलितपणे समायोजित करू शकते आणि पर्यायी दिवस, स्थान व वेळ सुचवू शकते. ही तुमचे वेळापत्रक लवचीक आणि रिअल-टाईम बदलांना प्रतिसाद देणारे राहील, हे बघते. शेवटी अंतिम निर्णय तुमचा असतो. तुम्ही अनुमोदन दिले की पुढची कारवाई तात्काळ पार पडते. एआयमुळे कॅलेंडर केवळ साध्या नोंदी ठेवण्यापुरते मर्यादित राहिलेले नाही, तर ते अधिक स्मार्ट आणि कार्यक्षम बनले आहे. एआय-आधारित कॅलेंडर आता उपलब्ध वेळेनुसार, प्राधान्यानुसार आणि इतर मीटिंगनुसार आपोआप भेटीगाठी (अपॉईंटमेंट्स) आणि कामे शेड्यूल करू शकतात. उदाहरणार्थ, कॅलेंडरमध्ये एकाच वेळी दोन मीटिंग येत असतील, तर एआय तुम्हाला सर्वोत्तम वेळ सुचवेल किंवा दोन्हीपैकी कोणती महत्त्वाची आहे हे ठरवून त्यानुसार नियोजन करेल.

एआय यंत्रणा वापरणाऱ्याच्या कामाचा पॅटर्न शिकते आणि त्यानुसार वेळेचे नियोजन करते. यामुळे कोणत्या कामासाठी किती वेळ लागतो, कोणता वेळ तुमच्यासाठी सर्वांत उत्पादक आहे, हे समजायला मदत होते. यामुळे अनावश्यक वेळ वाया जाण्यापासून वाचतो आणि उत्पादकता वाढते. केवळ मीटिंगची वेळ लक्षात ठेवण्याऐवजी एआय मीटिंगच्या तयारीसाठी आवश्यक असलेली माहिती, उपस्थित राहणाऱ्या लोकांची माहिती आणि इतर संबंधित तपशील पाठवू शकते. उदाहरणार्थ, प्रवासाची आवश्यकता असेल तर ते वाहतुकीच्या स्थितीबद्दलही माहिती देईल. एका मीटिंगनंतर लगेच दुसरी मीटिंग वेगळ्या ठिकाणी असेल, तर एआय दोन्ही ठिकाणांमधील प्रवासासाठी लागणारा वेळ लक्षात घेऊन योग्य नियोजन करण्यास मदत करते; जेणेकरून तुम्ही वेळेवर पोहोचू शकता. गुगल असिस्टंट किंवा सिरी आता कॅलेंडरशी अधिक प्रभावीपणे संवाद साधू शकतात. या माध्यमांना आवाजाद्वारे मीटिंग सेट करायला सांगता येते, एखाद्या इव्हेंटबद्दल विचारता येते किंवा दिवसाचे वेळापत्रक बदलण्यास सांगता येते. एआय ॲप्स पाश्चिमात्य संस्कृतीचे पालन करत असल्याने शुभ, अशुभ, काळ-वेळ, मुहूर्त अशा बाबी नसतात. अनेक जण अमावास्येला महत्त्वाची कुठलीही गोष्ट करत नाहीत. त्यासाठी तुम्हाला पारंपरिक पंचांग पाहावे लागेल. पण आता चांगली बातमी म्हणजे ज्योतिषीही ऑनलाईन झाले आहेत. मराठी भाषेत उपलब्ध असलेल्या काही भारतीय पंचांग ॲप्समध्ये मराठी कॅलेंडर - पंचांग, हिंदू कॅलेंडर-द्रिक पंचांग आणि सनातन पंचांग यांचा समावेश आहे. या ॲप्समध्ये तुम्हाला दैनिक पंचांग, तिथी, नक्षत्र, शुभ-अशुभ वेळ तसेच मराठी सणांची माहिती मिळेल. एखाद्या भारतीय उद्योगाने एआय कॅलेंडर पंचांगासकट विकसित केले तर त्यालाही भारतात चांगली संधी आहे. जे काम पूर्वी खाजगी सचिव करत असत, ते आता एआय कॅलेंडर टूल्स प्रभावीपणे करतात. काळानुसार बदल घडले, माणसे बदलली, विचार बदलले. आता अनेक घरांमध्ये कालदर्शिका नसते (कारण गरज संपली), काही घरांमध्ये उपचार म्हणून कॅलेंडर असते पण त्यावर पूर्वीसारखे लिखाण नसते. कालाय तस्मै नमः.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

---

## वेध

**नीलेश जोशी**

# कुटुंबात निकोप संवाद आवश्यक

समाजात घडणाऱ्या काही घटना मन अस्वस्थ करणाऱ्या असतात. आपले पारंपरिक मूल्य, कुटुंब व्यवस्था यात गतीने होत असलेल्या बदलांची पुन्हा चिंतन करण्याची गरज असल्याची आठवण हे प्रसंग करून देतात. अकोला शहरातील खदान परिसरात राहणारा १४ वर्षीय मुलगा ११ नोव्हेंबरला घरून कुणालाही न सांगता निघून गेला. पोलिसांनी अक्षरशः २०० सीसीटीव्ही फुटेज तपासले. ७ जिल्ह्यांत दीड हजार किलोमीटरपर्यंतचा प्रवास करून दीडशे ते दोनशे जणांना विचारपूस केली आणि त्यानंतर या मुलाचा शोध लागला. पोलिसांनी २१ दिवस केलेल्या शोधमोहिमेचा शेवट सुखकारक होता. १४ वर्षीय बालक त्याच्या कुटुंबात परतल्यानंतर त्याच्या आणि कुटुंबीयांच्या चेहऱ्यावरील संमिश्र भाव बरेच काही सांगत होते. तर दुसरी घटना उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या शाळेतील. या शाळेत १३ वर्षीय विद्यार्थिनीला शाळेतीलच वरच्या वर्गात असणारा विशिष्ट समाजाचा मुलगा त्रास देत होता. या संदर्भातील तक्रार तिने कुटुंबीयांकडे केली होती. कुटुंबीयांनी देखील या संदर्भातील माहिती शाळेत दिली. पण अचानक तिने आत्महत्येचा मार्ग स्वीकारत जीवन संपविले. या दोन्ही घटना कुटुंबातील मोकळा संवाद कमी झाल्याची उदाहरणे आहेत. दुर्दैवाने अशा घटना, प्रसंग केवळ अपवाद नसल्याने अधिक चिंतेची बाब आहे.



भौतिक प्रगती गतीने होत आहे. त्यातच गेल्या काही दशकात जग जवळ आले असे म्हटले जाते. मोबाईल आणि समाजमाध्यमांचा अंमल सतत वाढता आहे. या बदलांचे काही अंशी चांगले परिणाम असले तरी व्यक्ती-व्यक्तींमधील संवाद कमी होत असल्याचा दुष्परिणाम चिंताजनक आहे. त्यातच आता कुटुंबातील संवादही कमी झाल्याचे दिसून येते. खरं म्हणजे कुटुंबातील संवाद म्हणजे केवळ मौखिक होणारा संवाद नव्हे. तर मौखिक संवादाशिवाय अमौखिक संवाद, भावनिक संवाद देखील महत्त्वाचा असतो आणि असा संवाद ही प्रत्येक कुटुंबात सहज होणारी बाब होती. पण आता अगदी सहज होणाऱ्या संवादाची जागा समाज माध्यमाने व्यापली आहे. संवादाऐवजी लहान असो की मोठा तो सतत मोबाईलमध्ये गुंतून पडला आहे. 'घरात सर्वच असतात पण एकमेकांपासून दूर' अशी निर्माण झालेली स्थिती अनेक प्रश्न उत्पन्न करते. जिथे संवादच खुंटला असेल तिथे संस्कारांची रुजवण तरी कशी होईल. व्यक्ती निर्माणासाठी आवश्यक असलेली कुटुंबातील बलस्थाने कमकुवत होणे हे समाज स्वास्थ्यासाठी धोकादायक आहे. म्हणून वेळीच सावध होण्याची आणि योग्य उपाययोजनांची आवश्यकता ओळखली पाहिजे. खरं म्हणजे भारतीय संस्कृतीचा पाया हा कुटुंब व्यवस्थेवर भक्कम उभा आहे. त्यातही संयुक्त कुटुंबपद्धती हे तर आपले वैशिष्ट्यच. पण कालौघात संयुक्त असलेले कुटुंब चौकोनी तर आता त्रिकोणी झाले आहे. कुटुंब व्यवस्थेतून जीवनमूल्यांची रुजवण, नकळत होणारे संस्कार चारित्र्यसंपन्न पिढी घडविते. कुटुंबातील अनेक छोट्या-मोठ्या रूढी-परंपरा संस्कार देणाऱ्या असतात. याच संस्कारांचे प्रतिबिंब समाजात वावरताना उमटते. पण समाजमाध्यमांमुळे कुटुंबामधील घटत असलेला निकोप संवाद अनेक समस्यांचे मूळ आहे. म्हणूनच कुटुंब व्यवस्था बळकट व्हावी यासाठी भजन, भोजन, भाषा, भूषा, भवन आणि भ्रमण या उपाययोजना करण्याचे आवाहन राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारख्या संघटना करीत आहेत. घरातील सर्वांनी एकत्र बसून रोज किंवा आठवड्यातून दोन वेळा तरी भोजन करावे ज्यावेळी टीव्ही, मोबाईल आदी दूर ठेवून गप्पा मारत भोजनाचा आस्वाद घ्यावा, असे म्हटले आहे. याचा मुख्य उद्देशच निकोप संवाद व्हावा असा म्हणावा लागेल. कुटुंबात निकोप आणि निर्भय संवाद झाला असता तर कदाचित अकोल्यात आत्महत्या केलेल्या 'त्या' मुलीचा जीव वाचला असता.

९४२२८६२४८४

---

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# पाचशे कोटींच्या आरोपाचा बॉम्ब

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी मतचोरीच्या मुद्यावरून भाजप आणि निवडणूक आयोगावर सातत्याने आरोप करत असताना त्यांच्या पक्षाच्या पंजाबमधील एका नेत्याने काँग्रेस नेतृत्वावर आरोप करत खळबळ उडवली. पंजाब प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष राहिलेले नवज्योतसिंग सिद्धू यांच्या पत्नी आणि काँग्रेस नेत्या नवज्योत कौर यांनी हा आरोप केला. नवज्योतसिंग सिद्धू पंजाबच्या राजकारणात कधी परतणार, असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता, काँग्रेस पक्ष त्यांना मुख्यमंत्रिपदाचा अधिकृत उमेदवार जाहीर करेल, तेव्हाच ते राजकारणात परततील, असे उत्तर नवज्योत कौर यांनी दिले. मात्र त्या एवढ्यावरच थांबल्या नाहीत, तर पंजाबचा मुख्यमंत्री होण्यासाठी ५०० कोटी रुपयांची सुटकेस पाहिजे. अशी सुटकेस दिल्याशिवाय काँग्रेस पक्षात कोणतेच पद मिळू शकत नाही, असा गंभीर आरोपही त्यांनी केला. आम्हाला काँग्रेस पक्षातून कोणी पैसे मागितले नाही, मात्र जो ५०० कोटी रुपये देऊ शकतो, तोच काँग्रेसकडून पंजाबचा मुख्यमंत्री होऊ शकतो. मात्र आमच्याजवळ एवढे पैसे नाही. त्यामुळे आम्ही मुख्यमंत्री होऊ शकत नाही, असा खुलासाही त्यांनी केला. या आरोपांमुळे पंजाब प्रदेश काँग्रेसमधील अंतर्गत गटबाजी समोर आली आहे.

विशेष म्हणजे २०२७ मध्ये पंजाब विधानसभेची निवडणूक असल्यामुळे नवज्योत कौर यांच्या आरोपांना राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. दुसरे म्हणजे पंजाबचे राज्यपाल गुलाबचंद कटारिया यांची भेट घेऊन आल्यानंतर नवज्योत कौर यांनी हा आरोप केला. त्यामुळे त्याचे गांभीर्य आणखी वाढले. नॅशनल हेरल्ड प्रकरणात सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्यासह अनेकांवर दुसरा एफआयआर दाखल झालेला असताना नवज्योत कौर यांनी असा आरोप करत काँग्रेसच्या नेतृत्वाला घरचा अहेर करत आरसा दाखवला, असे म्हणायला हरकत नाही.

नवज्योत कौर यांच्या या आरोपानंतर काँग्रेस पक्षाने त्यांना निलंबित केले आहे. निलंबनाची कारवाई केल्याबद्दल नवज्योत कौर यांनी पंजाब प्रदेश काँग्रेस अध्यक्ष अमरिंदरसिंग राजा वडिंग यांच्यावरही भ्रष्टाचाराचे आरोप करत हल्ला चढवला. नवज्योत कौर यांच्या निलंबनावर, त्यांना काँग्रेस पक्षात खरे बोलण्याची शिक्षा मिळाली, अशी बोचरी प्रतिक्रिया भाजपा प्रवक्ते शहजाद हुसेन यांनी व्यक्त केली. नवज्योत कौर यांनी नाव घेऊन हा आरोप केला नसला तरी काँग्रेसच्या नेतृत्वाला, एकूणच काँग्रेसची संस्कृती आणि कार्यपद्धतीला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे, असे म्हणावे लागेल. एकप्रकारे काँग्रेस पक्षातील संस्थात्मक भ्रष्टाचाराचे पितळ त्यांनी उघडे पाडले. काँग्रेस पक्षातील नेते आणि भ्रष्टाचार या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, यात शंका नाही. काँग्रेसमध्ये पदांचा बाजार चालतो, पैसे घेऊन पदे विकली जातात, असा आरोप याआधी अनेकांनी केला आहे. त्या आरोपांना नवज्योत कौर यांच्या ताज्या विधानामुळे एकप्रकारे दुजोरा मिळाला आहे. विशेष म्हणजे पंजाबच्या राजकारणात नवज्योतसिंग सिद्धू आणि त्यांच्या पत्नी नवज्योत कौर यांचे वेगळे महत्त्व आहे. त्यामुळे त्यांचे आरोप उडवून लावता येणार नाही. त्यांचे आरोप पंजाबमधील काँग्रेसच्या अंतर्गत राजकारणाबाबत असले तरी काँग्रेस पक्षाची एकूणच संस्कृती पाहता त्याची व्याप्ती राष्ट्रीय स्वरूपाची राहू शकते. नवज्योत कौर यांच्या आरोपानंतर काँग्रेस पक्षावर तुटून पडण्याची आप आणि भाजपाला आयती संधीच मिळाली.



२०२७ मध्ये पंजाबच्या विधानसभा निवडणूक होत आहे. त्यामुळे या आरोपांचे गंभीर पडसाद उमटणे स्वाभाविक आहे. पंजाबसारख्या तुलनेत छोट्या राज्यात मुख्यमंत्रिपद ५०० कोटी रुपयांत विकले जात असेल तर अन्य मोठ्या राज्यांत विशेषतः कर्नाटकमध्ये त्या पदाची किंमत किती असेल, अशी चर्चा सुरू होणे स्वाभाविक आहे. काँग्रेसशासित अन्य एका राज्यात मुख्यमंत्रिपदाची किंमत ३५० कोटी रुपये असल्याचा आरोप एका भाजपा नेत्याने केला आहे. नवज्योतसिंग सिद्धू यांनी क्रिकेटमधून संन्यास घेतल्यानंतर राजकारणात प्रवेश केला. २००४ ची निवडणूक त्यांनी भाजपाच्या तिकिटावर अमृतसरमधून लढवली आणि जिंकली. राजकारणात येण्याच्या आधी सिद्धू भारताच्या कसोटी क्रिकेट संघात होते. १९८८ मध्ये सिद्धू आपल्या एका मित्रासह पातियाळाच्या बाजारात गेले असता, तेथे गाडीच्या पार्किंगवरून त्यांचा एका व्यक्तीशी वाद झाला. यात वादात सिद्धू यांनी केलेल्या मारहाणीमुळे त्या व्यक्तीचे नंतर रुग्णालयात निधन झाले. सिद्धू खासदार झाल्यानंतर हा खटला पुन्हा सुरू करण्यात आला. सदोष मनुष्यवधाच्या या प्रकरणात त्यांना सत्र न्यायालयाने तीन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली होती. उच्च न्यायालयानेही ही शिक्षा कायम केली. तीन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा झाल्यामुळे सिद्धू यांना खासदारकीचा राजीनामा द्यावा लागला. सिद्धू यांनी या शिक्षेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. सर्वोच्च न्यायालयाने ही शिक्षा कमी करत एक वर्षावर आणली. एवढेच नाही तर त्यांना निवडणूक लढवण्याची परवानगी दिली. २००७ मध्ये अमृतसरमध्ये झालेल्या पोटनिवडणुकीत सिद्धू विजयी झाले. २००९ मध्ये सिद्धू पुन्हा अमृतसरमधून भाजपाचे उमेदवार म्हणून विजयी झाले. २०१६ मध्ये सिद्धू यांनी भाजपाचा राजीनामा देत काँग्रेसमध्ये प्रवेश केला. आपण जन्मजात काँग्रेसी असल्याचा दावा त्यांनी तेव्हा केला होता. पंजाबमधील काँग्रेसच्या मंत्रिमंडळात त्यांचा समावेश झाला. २०२१ मध्ये काँग्रेसच्या नेतृत्वाने त्यांची प्रदेश काँग्रेश अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली. २०२० ची पंजाब विधानसभेची निवडणूक काँग्रेसने सिद्धू यांच्या नेतृत्वात लढवली. या निवडणुकीत त्यांचा तर पराभव झाला, पण राज्यात काँग्रेसचेही पानिपत झाले. त्यामुळे सिद्धू यांना प्रदेश काँग्रेस अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला. तेव्हापासून ते राजकारणातून दूर फेकले गेले. कपिल शर्माच्या लॉफ्टर शोमध्ये ते गेल्या काही वर्षांपासून परीक्षक म्हणून काम करत टाईमपास करत आहे. पत्नी नवज्योत कौर यांच्या ५०० कोटींच्या आरोपामुळे सिद्धू पंजाबच्या राजकारणाचा केंद्रबिंदू झाले आहेत. त्यांच्या पत्नी नवज्योत कौर २०१२ मध्ये अमृतसर पूर्व विधानसभा मतादरसंघातून काँग्रेसच्या उमेदवार म्हणून निवडणूक जिंकल्या. पक्षाच्या संसदीय सचिव म्हणून त्यांनी काम केले. त्यामुळे त्यांचा आरोप दुर्लक्ष करण्यासारखा नाही. कौर यांच्या आरोपामुळे पंजाबमध्ये काँग्रेसतर्फे आतापर्यंत जे मुख्यमंत्री झाले, त्यांनी काँग्रेस नेतृत्वाला ५०० कोटी रुपयांची सुटकेस पोहोचवली होती, अशी शंका घ्यायला जागा आहे. तसे झाले असेल तर कौर यांनी आपल्या आरोपाच्या समर्थनार्थ याचे भक्कम पुरावे द्यायला पाहिजे. काँग्रेसच्या नेतृत्वानेही त्यांच्या आरोपांची चौकशी करत आपले 'हात' भ्रष्टाचाराने बरबटलेले नाहीत, हे सिद्ध केले पाहिजे. अन्यथा नवज्योत कौर यांच्या आरोपात निश्चितच तथ्य आहे, असे पंजाबच्या जनतेला वाटेल.

९८८१७१७८१७

---

### आजचे संघगीत-६९

गुरुवार, ११ डिसेंबर २०२५

#### संघ माझा चांगला गाव समदा रंगला

संघ माझा चांगला गाव समदा रंगला
चंग आम्ही बांधला, भेदभाव संपला ॥धृ.॥

मोकळ्या या मैदानावर वारा वाहे झुळझुळ
पावलांच्या तालावर लेझिम वाजे खुळखुळ
खराखुरा खेळ खेळू, शत्रु करू खिळखिळा ॥१॥

आट्यापाट्या हुतूतूच्या आंखल्या या पाट्या
उठाबशा जोर काढून फिरवू या लाठ्या
जुलूमाला खो देऊन संघ वाढू लागला ॥२॥

उडीसंगं चकाकतं जंबियाचं पातं
तलवारीचे वार कसे, निघती तोलात
सरसावुनी भिडविती, रोखलेला भाला ॥३॥

गावकरी कामधंदे, हातचे सोडून
शाखेवरी धाव घेती बोलणी ऐकून
संघगाणी गावयाचा, छंद त्यांना लागला ॥४॥

हिंदुस्थान हिंदूंचा भगवा झेंडा त्यांचा
म्होरक्याचं ऐकायाचं संघ सेवकांचा
बघा बघा गाव सारा आला प्रार्थनेला ॥५॥

---

## वाचक पत्रे

### पथदिव्यांच्या वेळा बदलेल का?

हिवाळ्याच्या दिवसांत दिवस बराच उशिराने उजाडतो आणि तिकडे लवकर मावळतोही. प्रशासनाकडे पथदिवे निश्चित वेळेत सुरू व बंद करण्याची व्यवस्था आहे. तरी बऱ्याच ठिकाणी रस्ते दिवसाच्या उजेडातही जळताना दिसतात. याकडे ना प्रशासनाचे लक्ष असते, ना पौर्णिमेला काही वेळ लाईट बंद ठेवण्याचे आवाहन करणाऱ्या सामाजिक संस्थांचे. सकाळी ५.३० ला पथदिवे बंद केले जातात तेव्हा आसमंतात बराच काळोख असतो. हा काळोख साधारणपणे जानेवारीच्या अखेरीसपर्यंत असतो. तेव्हा प्रशासनाला विनंती आहे की सकाळी पथदिवे बंद करण्याची वेळ किमान वीस मिनिटांनी वाढवावी.

**गजेंद्र डोळके**/८०१०६०३७८९

### वाहतूक कोंडीचा चाकरमान्यांना त्रास

नागपुरात सध्या मेट्रोचे काम सुरू असल्याने अनेक ठिकाणचे रस्ते अरुंद झाले आहेत. त्यामुळे वाहतुकीची कोंडी हा एक ज्वलंत प्रश्न सध्या नागपूर तथा आसपासच्या परिसरात नोकरीकरिता ये-जा करणाऱ्या चाकरमान्यांना सतावतो आहे. एकतर मेट्रोचे काम आणि त्यातल्या त्यात अनेक ठिकाणचे रस्ते बंद करण्यात आल्याने लहान वाहने वाटेल तिथून आपली जागा शोधतात. त्यामुळे एकाच रस्त्यावर सर्व वाहने आल्याने अनेकदा वाहतुकीची कोंडी होते आहे. परिणामी, अगदी सकाळीच घरून निघणाऱ्या चाकरमान्यांना रात्री परतताना दीड ते दोन तास रोजच उशीर होत असल्याने, त्यांचे हाल होत आहे. कुटुंबाला सुद्धा द्यायला त्यांच्याजवळ वेळ नसल्याने सर्वत्र संताप व्यक्त करण्यात येतो आहे.

वाहतुकीची ही कोंडी सोडविण्यासाठी एकतर रस्त्यांच्या दुतर्फा असलेले अतिक्रमण हटवायला हवे. तसेच, आडवी तिडवी वाहने चालवून ट्रॅफिक जाम करणाऱ्या लहान वाहनधारकांवर जबर कारवाई करण्यात यावी. एकतर बर्डीवरील पुलावरून बसेस वाहतूक बंद केल्याने खाली सिग्नलवर ताटकळत राहावे लागते. चाकरमान्यांच्या संतापाचा विचार करता संबंधित खात्याने वाहतूक कोंडी सोडवायला हवी.

**लीलाधर दवंडे**/८४१२८७७२२०

### वेदमूर्ती देवव्रत रेखे यांचे अभिनंदन!

१९ वर्षीय देवव्रत यांनी दररोज ४ तास असे सलग ५० दिवसांत केलेले २००० वेदमंत्रांचे दंडक्रम पारायण ही एक ऐतिहासिक घटना आहे. दंडक्रम पद्धतीने स्वर, लय आणि उच्चार यांचा अचूक समतोल सांभाळून, श्वासावर नियंत्रण ठेवून वेदांचे पारायण करताना एक जरी चूक झाली तरी पारायण व्यर्थ जाते असे सांगितले जाते. विशेष म्हणजे देवव्रत यांनी ही कठोर साधना कुठली उपाधी मिळवण्यासाठी केलेली नाही; तर विश्व कल्याण आणि वेदांचे रक्षण हे त्यामागील प्रयोजन आहे. देवव्रत यांच्या या अद्वितीय कामगिरीबद्दल त्यांना दंडक्रम विक्रमादित्य ही उपाधी मिळाल्यानंतर त्यांनी, मी अजून पूर्ण एक पाऊल सुद्धा टाकलेले नाही, असे नम्रपणे सांगितले. देवव्रत यांच्या या अहंशून्य स्थितीतून समाजाला खूप शिकण्यासारखे आहे. वेदांमधील ज्ञान पुढील पिढीपर्यंत जाण्यासाठी ते मुखोद्गत करण्याची परंपरा जपली पाहिजे, मौखिक ज्ञान हे अविनाशी आहे. हल्ले, आक्रमणे, आगी लावणे, यापासून मौखिक ज्ञान अबाधित राहते. देवव्रत यांचे दंडक्रम पारायण हे अभिमानास्पद, कौतुकास्पद आणि विशेषतः झेन झीसाठी प्रेरणादायी आहे!

**छाया मिराशी**/पुणे

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# नवोदय परीक्षा केंद्र अचानक ग्रामीण भागात हलवले

## मानवत तालुक्यात १११० विद्यार्थ्यांवर परिणाम; पालक व शाळांचा तीव्र आक्षेप

**महेश दिशागत**

**मानवत,/प्रतिनिधी-** नवोदय विद्यालय प्रवेशासाठी होणारे परीक्षा केंद्र कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक बदलण्यात आल्याने मानवत तालुक्यात संभ्रमाचे व नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून मानवत येथील नेताजी सुभाष विद्यालय येथे सुरू असलेले परीक्षा केंद्र यंदा थेट जिजाऊ ज्ञानतीर्थ विद्यालय, ग्रामीण भाग येथे हलविण्यात आले आहे.

येत्या १३ डिसेंबर रोजी ही प्रवेश पूर्व परीक्षा होणार आहे. विशेष बाब म्हणजे, नवोदय प्रवेश परीक्षा नियमाप्रमाणे तालुका ठिकाणीच घेणे बंधनकारक असते.मात्र, मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचा हवाला देत तत्कालीन गटशिक्षण अधिकाऱ्यांनी तडजोडी करून पसंतीच्या ग्रामीण शाळेत हे केंद्र स्थलांतरित केल्याचा आरोप पालक



व शिक्षकांनी केला आहे. प्रत्यक्षात नेताजी सुभाष विद्यालयात आजतागायत कोणताही अनुचित प्रकार घडलेला नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. या अनपेक्षित निर्णयाचा मानवत तालुक्यातील तब्बल १११० विद्यार्थ्यांवर थेट परिणाम होणार असून, ग्रामीण भागात परीक्षा केंद्र गेल्याने वाहतूक, वेळेची अडचण, तसेच आर्थिक भार वाढणार असल्याची चिंता पालकांनी व्यक्त केली आहे. परीक्षा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेली असताना अचानक केंद्र बदलल्याने विद्यार्थ्यांचा मानसिक ताण देखील वाढल्याचे चित्र आहे.

या प्रकरणी नेताजी सुभाष विद्यालय प्रशासनाने नवोदय विद्यालय व शिक्षण विभागाकडे अधिकृत तक्रार दाखल केली आहे. दरम्यान, हा निर्णय त्वरित रद्द करून परीक्षा केंद्र पुन्हा मानवत येथेच ठेवण्यात यावे, अशी जोरदार मागणी पालकवर्ग, शिक्षक संघटना व शिक्षणप्रेमींमधून होत आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### गुंजन पाटील व संजय आवटे यांचे शनिवार व रविवारी परभणीत व्याख्यान

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील चतुरंग प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या यशवंतराव चव्हाण स्मृती व्याख्यानमालेत कवयित्री गुंजन पाटील व ज्येष्ठ पत्रकार संजय आवटे यांचे शनिवार व रविवारी व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

वसमत रस्त्यावरील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात शनिवारी सायंकाळी ६ वाजता 'समाज माध्यमांचे महिलांच्या जीवनावर होणारे दुष्परिणाम व बदलते सामाजिक संदर्भ' या विषयावर कवयित्री पाटील या तर रविवारी 'आम्ही भारताचे लोक' या विषयावर ज्येष्ठ पत्रकार आवटे हे पुष्प गुंफणार आहेत. या प्रतिष्ठानतर्फे गेल्या २५ वर्षांपासून ही व्याख्यानमाला चालविली जात आहे.

### डुकरे कुटूंबियांना न्याय मिळवून देऊ : राणे

सरकार भक्कमपणे पाठीशी : शब्द आणि कृतीत फरक नाही

**परभणी,/प्रतिनिधी :** जिंतूर तालुक्यातील पिंपरी रोहिला या गावी किरकोळ कारणातून एका गटाने केलेल्या हल्ल्यात मृत्यू पावलेल्या मारोती निवृत्ती डुकरे या युवकाच्या कुटूंबियांना राज्य सरकार निश्चित न्याय मिळवून देईल, असा विश्वास राज्याचे मत्स्य व्यवसाय, बंदरे मंत्री नितेश राणे यांनी व्यक्त केला.

बुधवारी दुपारी राणे यांनी रोहिला पिंपरी या गावी भेट देऊन डुकरे कुटूंबियांबरोबर हितगुज केले. त्यांचे सांत्वन केले. यावेळी या कुटूंबाच्या पाठीशी हे सरकार निश्चितपणे ताकदीने उभे राहील, कुटूंबियांना न्याय मिळवून दिला जाईल, सरकारची ही जबाबदारी आहे. आपण या संबंधीचा शब्द देत आहोत, कृतीतही फरक असणार नाही, असे ते म्हणाले. हिंदु समाजाविरोधात मस्ती करणारे दोन पायावरसुध्दा घरी जावू शकणार नाहीत, असेही ते म्हणाले. दरम्यान, २१ ऑक्टोंबर रोजी दोन गटात दिवाळीचे फटाके फोडण्याच्या कारणावरुन किरकोळ वाद विवाद झाला. त्यातून मारहाण झाली. त्यात मारोती निवृत्ती डुकरे हे गंभीर जखमी झाले. त्यांना नांदेड येथील रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले होते. त्यांचे उपचार सुरु असतांना निधन झाले. या घटनेनंतर संतप्त नातेवाईकांनी, ग्रामस्थांनी त्यांचा मृतदेह बोरी पोलिस ठाण्यात आणून आरोपींविरोधात कठोर कारवाईची मागणी केली होती.

### वर्ष उलटूनसुध्दा सूर्यवंशी मृत्यू प्रकरणात पोलिस अधिकाऱ्यांविरुध्द गुन्हे दाखल होईनात : संतप्त कार्यकर्त्यांद्वारे रास्तारोको

**परभणी,/प्रतिनिधी :** सोमनाथ सूर्यवंशी या युवकाच्या मृत्यू प्रकरणातील दोषी पोलिस अधिकाऱ्यांविरोधात एक वर्ष उलटूनसुध्दा अद्यापपर्यंत गुन्हे न दाखल झाल्याने लाँग मार्च संघर्ष समितीच्या कार्यकर्त्यांनी आज बुधवार १० डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार रास्ताराको आंदोलन केले.

या आंदोलनकर्त्यांनी जिल्हा प्रशासनास निवेदन सादर करुन सोमनाथ सूर्यवंशी या युवकाच्या कोठडीतील मृत्यू प्रकरणात संबंधित पोलिस अधिकाऱ्यांविरुध्द कठोर कारवाई करावी, आरोपी दत्ता सोपान पवार याची नार्को टेस्ट करावी, विटंबना करणाऱ्यांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा, यासह अन्य मागण्या करण्यात आल्या. यावेळी आशिष वाकोडे, गुलमीर खान, रवि सोनकांबळे, विनोद कदम, विश्वजित वाघमारे, अर्जून पंडीत, अक्षय भराडे आदी सहभागी झाले होते.

### पद्माकर केदार यांची 'अटल फाउंडेशन'च्या महाराष्ट्र प्रदेश मंत्रीपदी नियुक्ती

**परभणी,/प्रतिनिधी :** माजी पंतप्रधान, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांवर आधारित सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्य करणाऱ्या अटल फाउंडेशनच्या राष्ट्रीय अध्यक्ष श्रीमती अपर्णा सिंह यांच्या आदेशानुसार आणि महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष गणेश राजे यांच्या नेतृत्वाखाली पद्माकर केदार यांची फाउंडेशनच्या महाराष्ट्र प्रदेश मंत्रीपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

शुक्रवार ५ डिसेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय कार्यालयात आयोजित विशेष कार्यक्रमात केदार यांना त्यांच्या नवीन पदाचे नियुक्ती पत्र सुपूर्द करण्यात आले. हे पत्र फाउंडेशनचे महाराष्ट्र प्रदेश महामंत्री हेमंत पाटील गोढाळकर यांनी प्रदान केले. यावेळी राज्य उपाध्यक्ष व्यंकटेश कमळू, संभाजीनगर अध्यक्ष गणेश राऊत, बी. के. जोशी यांच्यासह संघटनेचे स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. गोढाळकर यांनी केदार यांच्या मागील कार्याचा गौरव करत त्यांना नवीन जबाबदारीसाठी शुभेच्छा दिल्या.

प्रदेश मंत्री म्हणून केदार यांच्यावर अटलबिहारी वाजपेयी यांच्या आदर्श विचारांना महाराष्ट्रातील तरुणाईपर्यंत पोहोचवणे आणि फाउंडेशनचे संघटन राज्यभर अधिक व्यापक व मजबूत करण्याची जबाबदारी असेल. तसेच सामाजिक सेवा, ग्रामीण विकास आणि शैक्षणिक उपक्रमांना बळ देण्यावर ते विशेष लक्ष केंद्रित करतील. प्रदेश अध्यक्षांनी म्हटले की, केदार यांच्या निवडीमुळे महाराष्ट्रातील संघटनेला अधिक बळकटी मिळेल, असा विश्वास आहे. पद्माकर केदार यांनी या नियुक्तीबाबत मनः पूर्वक अभिनंदन स्वीकारले आणि फाउंडेशनचे ध्येय लक्षात ठेवून तरुण स्वावलंबी व्यावसायिक, आधुनिक कृषी तंत्रज्ञान, सामाजिक बांधिलकी, गरजू रुग्ण सहाय्य, आदिवासी कल्याण, महिला स्वावलंबन व संरक्षण अशा विविध क्षेत्रात प्रामाणिकपणे काम करण्याची तयारी व्यक्त केली. केदार यांच्या नेतृत्वाखालील कार्यामुळे समाजाला मोठा फायदा होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, केदार यांच्या या निवडीबद्दल मित्रमंडळातर्फे मोठ्या प्रमाणावर स्वागत होत आहे.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

१.**गंगाखेड**- तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा**- तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

## जिंतूरातील बसस्थानक परिसराला आले वाहनतळाचे स्वरूप

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी-** बसस्थानक ावरील स्थानिक अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे बसस्थानक परिसराला स्थानिक वाहनतळाचे स्वरूप आले आहे. या परिसराचा वापर खाजगी वाहनधारक सर्रास करीत आहेत. आता बसस्थानकावरील बस लागण्याच्या गाळ्यामध्येही खाजगी वाहन लावण्यापर्यंत मजल या वाहनधारकांची गेली आहे. जिंतूर बसस्थानकावरील शौचालय ते जुन्या बस स्टॅन्डच्या मधल्या मैदानात हे खाजगी वाहनधारक आपाली वाहने उभी करून प्रवासी भरून नेत आहेत. हे प्रकार गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असून



एसटीचे अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे आता आपले खाजगी वाहन बस लावण्याच्या फलाटावर उभे करण्याचे काम हे खाजगी वाहनधारक करीत आहेत. बसस्थानकाच्या इमारतीतील बस लावण्याच्या फलाटाचा वापर बसचालक करीत नाहीत. सर्व बसेस बसस्थानकाच्या समोरील मैदानात अस्ताव्यस्त लावल्या जातात. याकडेही अधिकारी जाणीवपूर्वक डोळेझाक करीत आहेत. बसेस फलाटावर लागत नसल्याने कोणती बस कुठे जाणार आहे याचा बोध प्रवाशांना होत नाही. त्यामुळे गोंधळाची स्थिती निर्माण होत आहे. प्रत्येक बसमागे धावत जाऊन बस कुठे चालली हे शोधण्यासाठी प्रवाशांची तारांबळ उडत आहे. परभणीचे वरिष्ठ अधिकारी अधूनमधून जिंतूर बसस्थानकाला भेट देतात. त्यांच्यासमोरही बसेस फलाटावर नव्हे, तर अस्ताव्यस्त मैदानात समोरच लागलेल्या दिसतात. परंतु हे अधिकारी देखील याकडे जाणीपूर्वक डोळेझाक करीत असल्याचे दिसून येत आहे. संबंधित वरिष्ठांनी याकडे लक्ष देऊन बसेस फलाटावर लावण्यासंदर्भात शिस्त लावावी, खाजगी वाहनधारकांना बसस्थानक परिसरातून हाकलावे, अशी मागणी प्रवासी वर्गातून होत आहे.

लांब पल्ल्याच्या बसेसना थांबा मिळेना

जिंतूर-औंढा या मार्गावरील भोगाव येथे लांब पल्ल्याच्या बसगाड्यांना थांबा नसल्याने येथील प्रवाशांची गैरसोय होत आहेत. जिंतूर - औंढा या मार्गावरून हदगाव, किनवट, माहूर, यवतमाळ, पुसद या आगाराच्या डझनभर बसेसच्या दिवसातून फेऱ्या होतात. परंतु या बसेसला थांबा नसल्याने प्रवाशांना खासगी वाहनाचा आधार घ्यावा लागत आहे. संभाजीनगर, शिर्डी, अहिल्यानगर, मुंबई या ठिकाणी जाणाऱ्या बसगाड्या थांबत नसल्यामुळे प्रवाशांना जिंतूरसारख्या ठिकाणी जाऊन लांब पल्ल्याच्या गाडीतून प्रवास करावा लागतो. भोगाव हे गाव लोकसंख्येने तसेच तीर्थक्षेत्राचे ठिकाण असल्याने येथे प्रवाशांची मोठी संख्या आहे. तसेच येथील देवीच्या दर्शनासाठी भाविकांची नेहमीच ये-जा असते. वरिष्ठांनी याकडे लक्ष देऊन भोगाव येथे बसला थांबा द्यावा, अशी मागणी होत आहे.

### परभणी जिल्हयातील नागरिक गारठले

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी जिल्हयातील नागरिक सध्या हुडहूडीने चांगलेच गारठले आहेत. त्याचा परिणाम त्यांच्यावर चांगलाच होत असल्याचे दिसून येत आहे. सध्या जिल्हयातील तापमान हे ५ .९ अंशावर आले आहे. त्यामुळे सायंकाळी ४ वाजल्यानंतर थंडीची चाहूल लागत आहे. त्यामुळे अनेकजणांना या वातावरणाचा परिणाम होत आहे. सध्या थंडीने नागरिक चांगलेच परेशान झाले आहेत. त्याशिवाय बालके, वयोवृध्द नागरिक यांना थंडी पासून स्वतः चा बचाव करण्याची आज खरी गरज असल्याचे यावेळी जाणकरांतून आपले मत व्यक्त होत आहे.

## जिल्हा कारागृहात आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिनानिमित्त जागृती कार्यक्रम

**परभणी,/प्रतिनिधी-** आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने परभणी जिल्हा कारागृहात मानवी हक्क व संरक्षणाबाबत जागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव भुषण काळे, जिल्हा कारागृह अधीक्षक राजेंद्र मरळे, तुरुंगाधिकारी श्रेणी-२ श्रीमती स्वाती जाधवर, तसेच ॲड. लायबा बेग आणि ॲड. वामन वाघमारे उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कारागृहातील अधिकारी व कर्मचारी - सर्यकांत सोनसळे, शिवाजी जोगदंड, प्रमोद तारे, जुनेद शेख, गजानन बेले, साईनाथ अंधारे, आरती खाडे, अक्षय थाटकर, वर्षा खंदारे, नामदेव पोले, जुनेद लताफ खान, कपिल नरंगळे, किरण माने, नारायण घुले, सचिन कोरके, विश्वास गाडे, गोपाळ सुरकुटलावार व बालाजी अमृतवार यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी बंद्यांच्या मूलभूत मानवी हक्कांचे संरक्षण याबाबत मार्गदर्शन केले.

## शिक्षक पतसंस्थेच्या कार्यकारिणी अध्यक्षपदी शिवाजीराव चामले तर सचिव पदी संजय झुरूळे

**शांतीलाल शर्मा**

**पालम,/प्रतिनिधी-** शिक्षक पतसंस्था महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे राज्य कार्याध्यक्ष तथा जिल्हा अध्यक्ष किशनराव इदगे व महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हा कार्याध्यक्ष रामराव रोकडे यांच्या नेतृत्वाखाली कै गंगारामजी पो पा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी



पतसंस्थेच्या नुतन कार्यकारिणीची निवड करण्यात आली ती खालीलप्रमाणे अध्यक्ष शिवाजीराव चामले,उपाध्यक्ष उमाकांत लांडगे, सचिव संजय झुरुळे,सहसचिव भागवत पदकोंडे,कोषाध्यक्ष श्रीमती कावेरी पौळ यांची निवड करण्यात आली. या वेळी मधुकर सिरस्कर, रामरावजी रोकडे, नागनाथ गोदगीरे, व्यंकटराव ढेले,ज्ञानोबा देवकते,कोंडय्या स्वामी, रमेश लांडगे,सुभाष चव्हाण,लांडगे, सोपान बने, रामेश्वर रेड्डी,प्रकाश लांडगे तसेच संचालक मंडळ सहकार अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## पूर्णेतील त्या दोन प्रभागासाठी नऊ उमेदवार राहिले रिंगणात

**पूर्णा,/प्रतिनिधी-** पूर्णा नगरपालिकेच्या दोन प्रभागाच्या निवडणुकीची प्रक्रिया पूर्णा तहसील कार्यालयात सुरू असून बुधवारी उमेदवारी अर्ज परत घेण्याचा शेवटचा दिवस आहे यानंतर या दोन प्रभागाचे चित्र स्पष्ट होणार आहे.



पूर्णा नगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक एक ब व प्रभाग क्रमांक दहा ब या दोन प्रभागाच्या निवडणुकीची प्रक्रिया पूर्णा तहसील कार्यालयात निर्वाचन अधिकारी तथा तहसीलदार माधवराव बोथीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. बुधवारी या दोन्ही ठिकाणी उमेदवारी अर्ज परत घेण्याचा शेवटचा दिवस असून यानंतर ११ डिसेंबर रोजी उमेदवारांना चिन्हाचे वाटप होणार आहे तर त्यानंतर २० डिसेंबर रोजी या दोन्ही ठिकाणी प्रत्यक्ष मतदान घेतले जाणार असून २१ डिसेंबर रविवार रोजी पूर्णा नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल जाहीर केला जाणार आहे प्रभाग क्रमांक एक ब मध्ये सात उमेदवार निवडणूकच्या रिंगणात आहेत तर प्रभाग क्रमांक दहा ब मध्ये दोन उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

## पदवीधर मतदारांनी नाव नोंदणी करावी - तहसीलदार बोथीकर

**संपत तेली**

**पूर्णा,/प्रतिनिधी-** पदवीधर मतदारांनी नाव नोंदणी करावी - तहसीलदार माधवराव बोथीकर पूर्णा, प्रतिनिधी- पूर्णा तालुक्यातील पदवीधर मतदारांची प्रारूप यादी नुकतीच प्रसिद्ध करण्यात आली असुन यादीत नाव नसलेल्या सर्व पदवीधर मतदारांनी आपल्या नावाची नोंदणी यादीत करावी, असे आवाहन तहसिलदार माधवराव बोथीकर यांनी केले आहे.

पूर्णा तालुक्यातील तहसील कार्यालयात १ नोव्हेंबर २०२२ या अर्हता दिनांकावर आधारीत छत्रपती संभाजीनगर विभाग पदवीधर मतदार संघाची यादी नव्याने तयार करण्यात आली असून प्रारुप मतदार यादी प्रसिध्दीची सुचना व प्रारुप मतदार यादी बुधवार ३ डिसेंबर २०२५ रोजी पदनिर्देशीत ठिकाणच्या मतदान केंद्रावर तसेच महूसल मंडळ पूर्णा,ताडकळस, लिमला, चुडावा, कावलगाव आणि कातनेश्वर आदी ठिकाणी प्रसिध्द करण्यात आली आहे. ही मतदार यादी पाहण्यासाठी पूर्णा तहसिल कार्यालयात तहसीलदार, नायब तहसीलदार यांच्या कक्षासह निवडणूक विभागाच्या कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात आली आहे. पदवीधर मतदार संघाची मतदार यादी तयार करण्यासाठी अर्हता दिनांकाच्या आधारे मतदार यादीत नाव समाविष्ठ करण्यासाठी किंवा समाविष्ठ असलेल्या नावाबाबत किंवा एखाद्या नोंदीच्या तपशीला संदर्भात कोणतीही दावे व हरकती असल्यास ३ ते १८ डिसेंबर २०२५ या कालावधीत नमुना १८, ७ किंवा ८ क्रमांकाच्या फार्ममध्ये तहसिल कार्यालय पूर्णा कार्यालयातील पदनिर्देशीत ठिकाणचे मतदान केंद्र तहसील कार्यालय या ठिकाणी संबंधित अधिकारी यांच्याकडे दाखल करावे, तसेच दि. १ नोव्हेंबर २०२२ रोजी पूर्वी पदवी प्रमाणपत्र प्राप्त करणाऱ्या पदवी धारकांनी अद्यापपर्यंत नावनोंदणी केली नसल्यास या पदवी धारकांनी विहीत नमूना नं. १८ सोबत पदवी प्रमाणपत्र, मार्कमेमो, पासपोर्ट फोटो, मतदान ओळखपत्र, रहीवासी च्या पुराव्यासह ऑफलाईन तसेच https://mahaelection.gov.in या लींक वर ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन सहायक मतदार नोंदणी अधिकारी जिवराज डापकर, तहसिलदार माधवराव बोथीकर , निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार पंढरीनाथ शिंदे, सहायक महसूल अधिकारी व्यंकटेश जज्जरवार आदींनी केले आहे.

## मानवत येथे तालुका स्तरीय ५३ वे बालवैज्ञानिक विज्ञान प्रदर्शन संपन्न

**मानवत ,/प्रतिनिधी-** विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच विज्ञानाची आवड लागावी आणि अंगी असलेल्या सुप्तगुणातून बालवैज्ञानिक घडावे यासाठी प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही दिनांक ९ डिसेंबर २०२५ रोजी श्रीमती शकुंतलाबाई कांचनवार कत्रुवार विद्यालय मानवत येथे तालुकास्तरीय विज्ञान गणित व पर्यावरण प्रदर्शन भरवण्यात आले होते. या बाल विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थेचे पदाधिकारी विजयकुमार बापुराव कत्रुवार, बालकिशन पन्नालाल चांडक, संजय द्वारकादास लड्डा, शाळेचे मुख्याध्यापक पुंडलिक गज्जेवाड, गटशिक्षणाधिकारी मंगेश नरवाडे, शिक्षण विस्तार अधिकारी नीलू पवार, केंद्रप्रमुख ओम मुळे, विनोद गायकवाड, प्रकाश मोहकरे, उमाकांत हाडूले, राजकुमार गाडे, आत्माराम पाटील ज्ञानेश्वर जलशिंगे, दत्ता शहाणे, यामध्ये शाश्वत शेती, कचरा व्यवस्थापन व प्लास्टिक पर्याय, हरित ऊर्जा, उद्यानमुख तंत्रज्ञान, मनोरंजक गणितीय मॉडलिंग, आरोग्य स्वच्छता, जलसंवर्धन व व्यवस्थापन इत्यादी घटकावर विद्यार्थ्यांना विषय देण्यात आले होते. भविष्यातील वैज्ञानिक आजच्या विद्यार्थ्यांमध्ये लपलेला आहे. त्यांनी ज्या पद्धतीने गणिताचे मॉडेल विज्ञान प्रयोग तयार करून आणले त्यातून नक्कीच सिद्ध होते की, विद्यार्थी हा कोणत्याही वैज्ञानिक शास्त्रज्ञा पेक्षा कमी नसतो. आज विद्यार्थ्यांनी तयार करून आणलेले सर्व प्रयोग मॉडेल हे भविष्यातील प्रश्न सोडविणे होते. या विज्ञान प्रदर्शनात प्राथमिक, माध्यमिक, दिव्यांग आणि शिक्षक शैक्षणिक साहित्य अशा चार गटांमध्ये सहभाग नोंदविण्यात आले होते.

यात प्राथमिक स्तरावर ४४, माध्यमिक स्तरावर १३, दिव्यांग गटातून ०६ आणि शिक्षक शैक्षणिक साहित्य यातून ०३ सहभाग नोंदविले आहेत. विशेष म्हणजे समावेशित शिक्षण अंतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांनी देखील उत्साह पूर्ण सहभाग नोंदविण्याचे दिसून आले.

आजचे बाल वैज्ञानिक स्पर्धेचे निकाल खालील प्रमाणे प्राथमिक गट सहावी ते आठवी. प्रथम मंथन राऊत जिजाऊ ज्ञानतीर्थ विद्यालय मानवत, द्वितीय ध्रुव गणेश बाराहाते जि प इरळद,तृतीय स्वराज महाडिक एस एस के के विद्यालय मानवत. माध्यमिक गट नववी ते दहावी. प्रथम अक्षरा कृष्णा बल्लेवार केजीबीवी मानवत, द्वितीय ज्योती नारायण गिरी राजीव गांधी विद्यालय ताडबोरगाव, तृतीय वैष्णवी नारायण हरकळ एस एस के के विद्यालय मानवत. दिव्यांग गटातून प्रथम शिवानी बालासाहेब होगे एस एस के के विद्यालय मानवत, माध्यमिक गटातून सावता धुमाळ नेसूवी मानवत, शिक्षक गटातून प्राथमिक स्तरावर सोनवणे पी पी मानोली, माध्यमिक गटातून प्रथम लाड बी ए जि प शाळा रामपुरी यांनी आपली नाही नैपुण्यात सिद्ध केली.

. बालवैज्ञानिक स्पर्धे साठी परीक्षक म्हणून लाभलेले सुरेखा बोबडे, प्रल्हाद थोरात, बालासाहेब होगे के के एम कॉलेज मानवत श्री नितीन पडघन यांनी परीक्षणाचे उत्कृष्ट कार्य केले. शकुंतला विद्यालय मानवत शाळेचे मुख्याध्यापक पुंडलिक गज्जेवाड यांनी आपल्या शाळेतील परिसर उपलब्ध करून देऊन तालुक्यातील सर्व विद्यार्थ्यांना व्यक्त होण्याची संधी उपलब्ध करून दिले. बालवैज्ञानिक स्पर्धा यशस्वी होण्यासाठी, वाघमारे सर,पवार सर, पातेकर मॅडम सर्व शकुंतला विद्या मानवत यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ पातेकर यांनी केले. तर आभार शाळेचे मुख्याध्यापक पुंडलिक गज्जेवाड मानले. व कार्यक्रमाची उत्साहात सांगता यावेळी झाली होती.

# मानसिक आजाराला बळी पडू नका-डॉ.जगदीश टेकाळे

तभा वृत्तसेवा
बीड दि.११ डिसेंबर



जर तुमच्या कुटुंबात वडीलधारी व्यक्ती असतील तर त्यांचे प्रेम, आशीर्वाद आणि अनुभव इतर सदस्यांना आयुष्यात खूप मदत करतात. या वयात ते अनेकदा मानसिक आजाराला बळी पडतात. म्हणून, त्यांना या अवस्थेत पोहोचण्यापासून रोखण्यासाठी, लक्षणांवर लक्ष ठेवा. अशाच काही लक्षणांबद्दल आपण जाणून घेऊया.

लोकांपासून दूर राहणे : जेव्हा एखादी वयस्कर व्यक्ती अचानक लोकांपासून दूर राहते, कमी संवाद साधते किंवा संवाद साधण्यास अडचण येते, तेव्हा ते मानसिक आजाराचे लक्षण असू शकते. * या वर्तणुकीतील बदल (चिडचिडेपणा): जर ते सामाजिक परिस्थिती टाळू लागले आणि सहज अस्वस्थ, चिडचिडे किंवा चिडचिडे झाले तर हे देखील मानसिक आजाराचे लक्षण असू शकते * स्वतःची काळजी न घेणे : जर एखाद्या व्यक्तीने वयानुसार स्वतःची काळजी, स्वच्छता आणि काळजी घेण्याकडे दुर्लक्ष करायला सुरुवात केली तर हे देखील मानसिक त्रासाचे लक्षण आहे.

* वजनात बदल : भूकेतील बदल, क्रियाकलाप पातळी, सतत कमी मूड, एकटेपणा, दुःख आणि सामाजिक अलगाव यामुळे अचानक वजन कमी होऊ शकते. हे देखील नैराश्याचे लक्षण आहे. जर एखाद्या व्यक्तीला वय वाढत असताना झोपेचा त्रास होत असेल तर हे मानसिक विकाराचे लक्षण असू शकते.* मित्र परिवाराचा आभाव : सुसंवाद साधण्यासाठी मित्राची कमतरता. असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.म नसोपचार तज्ज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात. मो.९५१ ८५५१५०३, ९५४५६१५३५२.

# भगवान महादेवाची भक्ती उपासना केल्यावर मानवी जीवनाचा उद्धार होतो-कनकेश्वरी देवीजी





तभा वृत्तसेवा
माजलगाव दि.११ डिसेंबर

माजलगाव येथे भव्य शिवमहापुराण कथेच्या चतुर्थी दिवशीच्या कथा वाचताना श्री.कनकेश्वरी देवीची यांनी सांगितले की महादेवाची भक्ती, उपसना, सेवा केल्याने मानवी जीवन सार्थक होते. अनेक उदाहरणे दिली. शिव ची सेवा केल्याने मानवी जीवनातील समस्या कमी होऊन मानसाचे कल्याण होते. या शिवपुराण कार्यक्रमास गुजरात येथील सुरत चे गोशाळा प्रमुख संत व काशीचे विविध संतांनी या कथा श्रवणाचा लाभ घेतला व भेट दिली.

माहेश्वरी समाजाच्या माजलगाव येथील विविध ठिकाणच्या महिला दररोज एक रांगोळी काढतात.या शिवपुराण कार्यक्रमास दररोज हजारो शिवभक्त, गो सेवकव राजस्थानी समाज बांधव उपस्थित असतात. मुख्य यजमान लड्डा व महाप्रसादाचे यजमान करवा (ढासाळा) परिवार च्या वतीने दररोज पुष्पहार अर्पण करून आरती केली जाते.या वेळी शहरातील नव्हे तर संपूर्ण तालुक्याती व जिल्ह्यातील भक्त परिवाराची उपस्थित असते. या कार्यक्रमास चे आयोजन श्री.सदगुरु गोसेवा समिती च्या वतीने करण्यात आले आहे.

# भारत मंडपम् सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवासाठी ह.भ.प.प्रज्ञा रामदासी यांची निवड

तभा वृत्तसेवा
बीड दि.११ डिसेंबर



दिल्ली येथील 'भारत मंडपम' येथे सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाचे दि.१३,१४,१५ डिसेंबर रोजी आयोजन करण्यात आलेले आहे. या महोत्सवासाठी संपूर्ण देशभरातून जवळपास तीन ते साडेतीन हजार लोकांची उपस्थिती आहे. अनेक संत, महंत, मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न होणार आहे. यात मार्गदर्शन, शक्तिप्रदर्शन, ऐतिहासिक वस्तुंचे प्रदर्शन असा अवर्णनीय सोहळा होणार आहे. या सोहळ्यासाठी विशेष निमंत्रितांच्या यादीत बीड येथील प्रथितयश महिला कीर्तनकार ह.भ.प.श्रीमती प्रज्ञा भरतबुवा रामदासी यांची निवड झाली आहे. या बद्दल त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

बीडवासियांच्या ही गोष्ट अभिमानास्पद आहे. सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे. सनातन संस्था ही कित्येक वर्षापासून जनजागृतीचे कार्य अव्याहतपणे करीत आहे. यापूर्वी गोव्यातील महोत्सवातही सहभागी होता आले. आवर्जुन ही संस्था त्यांच्या कार्यक्रमामधून संबोधन, मार्गदर्शनासाठी निमंत्रित करते. त्यामुळे 'जन जागृती'च्या कार्यात योगदान देता येते. आताही दिल्ली येथील 'भारत मंडपम' मध्ये होणारा हा अवर्णनीय, भव्यदिव्य कार्यक्रमास उपस्थित राहता येणार असल्यामुळे हा आनंद शब्दातीत असल्याचेही ह.भ.प.श्रीमती प्रज्ञा भरतबुवा रामदासी यांनी म्हटले आहे.

# ना.पंकजा मुंडे यांच्यामुळे परळी मतदारसंघातील रस्त्याला मिळाला १० कोटीचा निधी

## ना.पंकजाताईंनी मानले केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आभार

तभा वृत्तसेवा
परळी वैद्यनाथ दि.११ डिसेंबर



राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे परळी मतदारसंघातील रस्त्याच्या कामाला केंद्रीय रस्ते विकास योजनेंतर्गत दहा कोटी रूपयाचा निधी मिळाला आहे, निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल ना. पंकजाताईंनी केंद्रीय रस्ते विकास व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांचे आभार मानले आहेत.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची ना. पंकजाताईंनी मध्यंतरी दिल्ली येथे भेट घेतली होती. यावेळी त्यांनी बीड जिल्ह्यातील विविध मागण्यांबरोबरच परळी मतदारसंघातील रस्त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात पत्र दिले होते, या पत्राची दखल घेऊन गडकरींनी केंद्रीय रस्ते विकास योजनेंतर्गत अंबाजोगाई-मांडवा-मांडेखेल- नाथरा- कौडगाव रस्ता रामा-२३५ किमी ३८/२५५ वर पुलाचे बांधकाम करणे आणि कौडगाव घोडा गावाअंतर्गत लांबीमध्ये सिमेंट नालीचे बांधकाम करणे व संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे यासाठी दहा कोटी रूपयाचा निधी मंजूर केला आहे, लवकरच या कामाची प्रोसेस सुरू होवून काम सुरू होणार आहे. हा रस्ता व्हावा अशी ग्रामस्थांची बऱ्याच दिवसांपासून मागणी होती, ही मागणी पूर्ण केल्याबद्दल ना. पंकजाताई यांनी नितीन गडकरी यांचे आभार मानले आहेत.

# लोकनेते मुंडे साहेबांना अभिवादन करण्यासाठी १२ डिसेंबरला गोपीनाथ गडावर उसळणार अलोट गर्दी



तभा वृत्तसेवा
परळी वैद्यनाथ दि.११ डिसेंबर

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी १२ डिसेंबर रोजी गोपीनाथ गडावर राज्याच्या कानाकोपर्यातून मोठी गर्दी उसळणार आहे. राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यावेळी उपस्थित राहणार आहेत.

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांना अभिप्रेत असलेल्या सामाजिक उपक्रम आयोजित करून आपण ज्या ठिकाणी आहात त्याच ठिकाणी मुंडे साहेबांची जयंती साजरी करावी असे आवाहन ना. पंकजाताई मुंडे यांनी केले आहे.

ना. पंकजाताई मुंडे यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून राज्यभरातील कार्यकर्त्यांना आवाहन केले आहे. १२ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता गोपीनाथगड येथे आपण उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. गेल्या वर्षीपासून आपण आहे त्या ठिकाणी मुंडे साहेबांना अभिप्रेत असलेल्या जनसेवेच्या विविध उपक्रमांनी त्यांची जयंती साजरी करावी असे आवाहन केले होते. त्या अनुषंगाने गेल्या वर्षी गावागावांमध्ये अशा पद्धतीने उत्साहात मुंडे साहेबांची जयंती साजरी झाली. याही वर्षी त्याच पद्धतीने गरजूंना मदत करून सामाजिक दायित्व घेऊन जयंती साजरी करावी.

# जेष्ठ नेते दत्ताप्पा इटके गुरूजी यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार जाहीर

**महाराष्ट्र वीरशैव लिंगायत सभा पुणेच्या वतीने २१ डिसेंबर रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार पुरस्कार प्रदान**

तभा वृत्तसेवा
परळी वैद्यनाथ दि.११ डिसेंबर



समाजासाठी निस्वार्थ वृत्तीने कार्य करणारे, सेवाभाव जपणारे आणि परळी वैजनाथ येथील वीरशैव लिंगायत समाजाचे जेष्ठ नेते दत्ताप्पा इटके गुरूजी यांच्या कार्याचा गौरव म्हणून महाराष्ट्र वीरशैव लिंगायत सभा (पुणे) तर्फे राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे. दत्ताप्पा इटके गुरुजी यांनी जीवनभर शिक्षण, संस्कार, धार्मिक व सामाजिक कार्यांद्वारे परळी तालुक्यात एक वेगळा ठसा उमटवला आहे.

दत्ताप्पा इटके गुरूजी यांनी गेल्या अनेक दशकांपासून समाजउद्धार, शिक्षण, संस्कार, सांस्कृतिक जपणूक, सामूहिक विवाह उपक्रम, गरजू कुटुंबांची मदत, आरोग्य शिबिरे, धार्मिक कार्यक्रम आणि समाजातील ऐक्य व एकात्म्यासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. समाजहितासाठी त्यांनी केलेल्या या मोलाच्या योगदानाची दखल घेत सभेच्या प्रदेश समितीने हा मानाचा पुरस्कार जाहीर केला असल्याचे सभेचे सरचिटणीस चंद्रशेखर (बाळासाहेब) होनराव यांनी पत्राद्वारे कळविले आहे.

या पुरस्काराचा वितरण सोहळा दि. २१ डिसेंबर २०२५ रोजी सप्तशृंगी गड, ता. कलवन, जि. नाशिक येथे संपन्न होणार आहे. या प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती अपेक्षित असून परळी परिसरातूनही मोठ्या प्रमाणावर प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

दत्ताप्पा इटके गुरुजींच्या कार्याचा विशेष उल्लेख

या प्रसंगी परळी शहरातील विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांमध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावणारे वैजनाथ विद्यालयाचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक दत्तात्रय गणपतराव (दत्ताप्पा) इटके गुरुजी यांच्या कार्याचाही विशेष गौरव करण्यात आला. त्यांनी केलेले सामाजिक कार्य हे परळीच्या विकासाचा पाया मानले जाते.

त्यांच्या प्रमुख कार्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश-

सन १९७४ पासून परळी वैजनाथ येथे अतिरुद्र अभिषेकामध्ये सहभाग विद्यार्थ्यांसाठी हनुमान व्यायाम शाळामार्फत व्यायाम प्रशिक्षण व संस्कार शिबिरांचे ३० वर्षे आयोजन समाजातील बांधवांच्या ऐक्यसाठी बसवेशकॉलनीत १५० कुटुंबांना निवास व्यवस्था १९८२ पासून २२ वर्षे सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन, २००० गरीब कुटुंबातील मुला-मुलींचे विवाह संपन्न विविध शिवाचार्यांच्या अधिक मास व श्रावण मास अनुष्ठानांचे आयोजन महात्मा बसवेश्वर जयंती सोहळे, वृक्षारोपण, महिला-पुरुष भजन स्पर्धा, रंगोळी स्पर्धा रक्तदान शिबिर, रक्तगट तपासणी व आरोग्य शिबिरे वीरशैव समाजातील आचार्यांचे तपोधन कार्यक्रम परळी नगरपरिषदेत १५ वर्षे नगरसेवक, उपनगराध्यक्ष पदावर कार्य श्री क्षेत्र कपिलधार येथे १० कोटींचे विकास आराखडे मंजूर करण्यात महत्वपूर्ण भूमिका

# मध्य रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे सय्यद हनिफ उर्फ बहादूरभाई यांनी परळीत केले स्वागत

तभा वृत्तसेवा
परळी वैद्यनाथ दि.११ डिसेंबर



परळी-बीड-नगर रेल्वे मार्गापैकी बीड ते वडवणी मार्गावरील रेल्वे चाचणीसाठी परळी शहरात आलेल्या मध्य रेल्वे विभागाच्या अधिकार्यांचे परळी येथे सय्यद इस्माईल फर्मच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते सय्यद हनिफ उर्फ बहादूरभाई यांनी स्वागत केले.

परळी-बीड-नगर रेल्वे मार्गापैकी बीड ते वडवणी रेल्वे मार्गावर दि.१० व ११ डिसेंबर रोजी चाचणी घेण्यात आली.यानिमित्त रेल्वेच्या मध्य विभागाचे चिफ इंजिनिअर मनोज अरोरा,सीएओ अविनाश कुमार पांडे,सीई ब्रिजेश कुमार,अहिल्यानगर बीड रेल्वे मार्गाचे उपमुख्य अभियंता डी.डी.लोळगे आदी अधिकारी हे दि.१० डिसेंबर रोजी परळी येथे आल्यानंतर प्रभु वैद्यनाथाचे दर्शन घेतले.यानंतर परळी येथील अतिथी विश्रामगृहात बहादुरभाई यांनी त्यांचा सत्कार केला यावेळी अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# नागपुरात ना.पंकजाताई मुंडेंच्या हस्ते भगवती माता मंदिराचा शिलान्यास

तभा वृत्तसेवा
नागपूर दि.११ डिसेंबर



मौजे खैरी (जि. नागपूर) येथे नव्यानेच उभारण्यात येत असलेल्या भगवती माता मंदिराचा शिलान्यास राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज मोठया थाटात करण्यात आला.

शहरापासून जवळच असलेल्या खैरी ग्रामपंचायत अंतर्गत अनंतश्रीविभूषित श्रीमद जगदगुरू स्वामी श्री प्रज्ञानंद सरस्वती जी महाराज यांच्या पुढाकाराने भगवती माता मंदिर उभारण्यात येत आहे. परिसरातील दानशूर भक्तांनी यासाठी जमीन दान केली आहे. आज या मंदिराचा शिलान्यास ना. पंकजाताईंच्या हस्ते करण्यात आला. यावेळी स्वामी श्री प्रज्ञानंद सरस्वती महाराज आणि समस्त भक्तगण उपस्थित होते. भगवती माता मंदिराचा शिलान्यास माझ्या हस्ते झाला,यासाठी स्वतःला मी भाग्यवान समजते. हे मंदिर समस्त भक्तगणांना उर्जा देणारे अध्यात्मिक केंद्र बनेल असं याप्रसंगी ना. पंकजाताईंनी सांगितलं. याप्रसंगी स्वामी प्रज्ञानंद यांनी पंकजाताईंना आशीर्वाद आणि शुभेच्छा दिल्या.

# केज बायपास व बसडेपो साठी केज विकास संघर्ष समितीचे पुन्हा आंदोलन

तभा वृत्तसेवा
केज दि.११ डिसेंबर



केज येथे रिंगरोड बायपास किंवा उड्डाणपूल आणि केज येथे बसडेपो तात्काळ मंजूर करा या मागणीसाठी केज विकास संघर्ष समितीने पुन्हा एकदा आंदोलनाचा पवित्रा घेतला असून नवीन वर्षात यामागणीसाठी आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा समितीच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांनी दिला आहे.

समितीच्या वतीने केज विधानसभेच्या आमदार श्रीमती नमिताताई मुंदडा व केज तहसीलदार यांना निवेदनाच्या प्रती देऊन वरील दोन्ही प्रश्नावर शासन दरबारी कार्यवाही करण्यासाठी प्रयत्न करण्याची विनंती केली आहे. सध्या नागपूर येथे हिवाळी अधिवेशन सुरु असून आमदार नमिताताईंनी केजवासियांचे हे महत्वाचे दोन प्रश्न अधिवेशनात मांडण्याचीही विनंती केली आहे.

केज शहर सध्या खामगाव-पंढरपूर व अहमदपूर-अहमदनगर या महामार्गाच्या जोडणीवर आहे. वरील दोन्ही महामार्ग वाहतूकीसाठी सुलभ व सोयीचे झाले असल्याने या वरील वाहतूक खूप पटीने वाढली आहे. यामध्ये अवजड वाहनांची संख्या ही वाढली आहे. परिणामता केज शहर अंतर्गत भागात अपघातांची संख्याही वाढली आहे. शहरातील नागरिक, विद्यार्थी व वृद्धाना पायी चालणे अवघड झाले आहे. यासाठी आता केज शहरांतील अंतर्गत भागात रस्त्यालगत फुटपाथ बनवणे गरजेचे आहे व सततच्या होणाऱ्या वाहतूक कोंडीसाठी आता बायपास (रिंगरोड) अथवा उड्डाणपुल यापैकी जे सोयीचे व फायद्याचे आहे ते मंजूर करून तयार करावे.

याशिवाय केज शहरात अत्यंत मोक्याच्या ठिकाणी बीड रोड लगत बसडेपो साठी साडेसात एकर जमीन आरक्षित केलेली आहे. याठिकाणी बसडेपो मंजूर करून सुरु करावा अशी समितीची केजवासियांच्या वतीने अनेक दिवसापासून मागणी आहे. शासनाच्या नवीन धोरणानुसार इलेक्ट्रिक चार्जींग सेंटर व ई बसडेपो सुरु करणेही सोयीचे आहे. यासाठीही समिती सतत पाठपुरावा करत आहे. तरी याबाबत आमदार महोदया व शासनाने तात्काळ कार्यवाही करावी अशी समितीने मागणी केली आहे. याबाबत निवेदनाच्या प्रती आमदार नमिताताई मुंदडा व केज तहसीलदार यांना देण्यात आल्या आहेत. निवेदनावर हनुमंत भोसले, नासेर मुंडे, शेषराव घोरपडे व इंजिनियर मोहनराव कराड यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई**
मुख्य कार्यालय- बस डेपो शेजारी,परळी-रोड,अंबाजोगाई
**-: प्रत्यक्ष ताबा :-**
कर्जखाते क्र. टीएल-७६ शाखा बीड चे कर्जदार मे. ज्ञानेश्वर माऊली बेकरी प्रोप्रा. दिनेश रमाकांत मोरे यांची खालीलप्रमाणे स्थावर मालमत्ताचे **दीनदयाळ नागरी सहकारी बँक म.अंबाजोगाई** बँकेने दिनांक ०९.१२.२०२५ रोजी प्रत्यक्ष ताब्यात घेतली आहे.
**स्थावर मालमत्तेचे वर्णन:-**
१. मालमत्ता धारक दिनेश मोरे (कर्जदार) हे एम.आय.डी.सी च्या भाडेपट्टे मालमत्तेचे मालक आहेत प्लॉट क्र.डी-२, सर्वे क्र.११३ एकुण क्षेत्रफळ ६२० चौ.मी. ज्यावर पत्र्याचे बांधकाम बांधले आहे जे बीड औद्योगीक क्षेत्रात आहे. ज्याच्या चतुःसिमा खालीलप्रमाणे:-
**पुर्व:-** प्लॉट क्र. डी-३ **पश्चिम:-** प्लॉट क्र. डी-१
**दक्षिण:-** एम.आय.डी.सी. जागा/नाला **उत्तर:-** एम.आय.डी.सी. रोड
(वरील मालमत्ता "जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत")
२. **मालमत्ता मालक:-** रफीक मोहम्मद हुसेन शेख
ग्रामपंचायत वासनवाडीच्या अधिकार क्षेत्रात जमीन मालमत्तेचे पुर्ण मालक आहेत सर्वे क्र.१०९ घर क्र.३७३५ एकुण क्षेत्रफळ १२०० स्वे.मी.०.१३.८३ आर वासनवाडी जि.बीड येथे स्थित आहे ज्याच्या चतुःसिमा खालीलप्रमाणे:-
**पुर्व:-** लोढा यांची जमीन **पश्चिम:-** २० फुट रुंद रस्ता
**दक्षिण:-** ४० फुट रुंद रस्ता **उत्तर:-** लियाकत मोहम्मद हुसेन यांचा प्लॉट/जागम्मद हुसेन यांचा प्लॉट/जागा
(वरील मालमत्ता "जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत")
**(सदर मालमत्ते बाबत यापुर्वी झालेले व पुढे होणारे कोणताही व्यवहार बँकेला बंधनकारक नाहीत.)**
**उपरोक्त स्थावर मालमत्ता कोर्ट कमिशनर मार्फत दीनदयाळ नागरी सहकारी बँक म.अंबाजोगाई शाखा-बीड चे अधिकृत अधिकारी श्री. अनंत गोपाळराव देशपांडे यांनी सिक्युरिटायझेन व रिकन्स्ट्रक्शन ॲक्ट २००२ नुसार प्रत्यक्ष ताब्यात घेतले आहे.**
**दिनांक :- ०९.१२.२०२५**
**ठिकाण :- बीड**
**अधिकृत अधिकारी**
**(सेक्युअर क्रेडीटर)**
**दीनदयाळ नागरी सहकारी बँक म.अंबाजोगाई**
मुख्य कार्यालय- बस डेपो शेजारी,परळी-रोड,अंबाजोगाई
मोबाईल क्र.७६६६५७७९००

# गंगा कदम यांना शासकीय मदतीसह मिळणार शासकीय नोकरी

## आ. हेमंत पाटील यांच्या मागणीनंतर प्रस्ताव तयार करण्याचे आदेश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ डिसेंबर**

नेपाळ येथे नुकत्याच झालेल्या अंध महिलांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत उपकर्णधार गंगा कदम हीने उत्कृष्ट कामगिरी बजावली. भारताने हा विश्वचषक जिंकला. सामान्यातील उपकर्णधार गंगा कदम यांना शासकीय मदतीसह नोकरी द्यावी अशी मागणी शिवसेनेचे आ. हेमंत पाटील यांनी राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचेकडे केली होती. त्यानुसार सामाजिक न्याय विभागाने प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे प्रस्ताव सादर करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

नेपाळ येथे झालेल्या अंध महिलांचा पहिलाच विश्वचषक भारताने जिंकला आहे. या स्पर्धेत उपकर्णधार गंगा कदम यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. विशेष म्हणजे भारतीय संघात गंगा कदम या महाराष्ट्राची एकमेव खेळाडू होत्या. अंध महिला संघाने विश्वचषक जिंकल्यानंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संघाचे स्वागत करून खेळाडूंचे कौतुक केले आहे.

हिंगोली जिल्ह्यातील वारंगा जवळील फुटाणा गावातही गंगा कदम यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. हिंगोली जिल्हाभरात गंगा कदम यांचे सर्वत्र कौतुक आणि सवागत करण्यात येत आहे. खा नागेश पाटील आष्टीकर यांनी गंगाला स्व खर्चातून घर बांधून देण्याचे आश्वासनही दिले आहे. तसेच आ. राजेश नवघरे, गोदावरी अर्बन बँकेच्या राजर्षी पाटील यांनी आर्थिक मदत केली. त्यानंतर आ. हेमंत पाटील यांनी नुकताच उपकर्णधार गंगा कदम यांचा सत्कार केला तसेच राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांना पत्राद्वारे अंध महिलांच्या संघात गंगा कदम या महाराष्ट्रातील एकमेव खेळाडू आहेत. सदर विश्वचषक जिंकल्यानंतर इतर राज्यांनी त्यांच्या खेळाडूंची दखल घेतली आहे. महाराष्ट्राची गंगा यांची परिस्थिती हलाखीची असून या परिस्थितीत त्यांनी देशाचे नाव उंचावले आहे. त्यांच्या गौरवशाली कामगिरीची दखल घेवून राज्य सरकारने त्यांना शासकीय मदतीसह शासकीय नोकरी द्यावी अशी मागणी केली आहे. या मागणीची दखल सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी घेतली असून प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे पुढील काळात गंगा कदम यांना शासकीय मदतीसह नोकरी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# पाणी फाऊंडेशन अंतर्गत गट शेती प्रीमीयर लीग स्पर्धा

## अश्विन पतंगे यांचा जिल्हाधिकाऱ्यांच्याहस्ते सत्कार




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ डिसेंबर**

पाणी फाउंडेशन अंतर्गत गट शेती प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेत भाग घेतलेल्या २० गटांना प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला यावेळी दत्तकृपा शेतकरी गटाचे निमंत्रक यांचा जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचेहस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, कृषी विभागाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र कदम, पोखरा प्रकल्प अधिकारी अनिल लेकुळे , कळमनुरी कृषी विभागाचे सुपरवायझर नंदकुमार वाईकर व राजू भोजे व कृषी सहाय्यक घोंगडे उपस्थित होते. जिल्हा अधीक्षक कृषी अधीकारी राजेंद्र कदम यांनी महाविस्तार ॲप व कृषी विषयक विविध योजना बद्दल शेतकरी गटांना माहिती दिली व बदलत्या हवामानानुसार शेती कशी करायची याबद्दल मार्गदर्शन शेतकऱ्यांना केले व नैसर्गिक संकटांना गटामार्फत माध्यमातून एकजुटीने कसं काम करायचं याबद्दल माहिती दिली श्री दत्तकृपा शेतकरी गटाचे निमंत्रक अश्विन बळीराम पतंगे रा. रेणापूर ता. कळमनुरी यांना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते सन्मानपत्र देण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने शेतकरी तसेच गटांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पाणी फाउंडेशनचे विभागीय समन्वयक संतोष शृंगारे व पाणी फाउंडेशनचे जिल्हा समन्वय अनिल राठोड भागवत कोटकर व वानखेडे यांनी परिश्रम घेतले.


# अंभेरीच्या भवानी गडावर सप्ताहाची उत्साहात सांगता



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ डिसेंबर**

गेल्या चार वर्षापासून अखंडित सुरू असलेला हिंगोलीच्या आंभेरी गडावर भवानी देवीच्या सप्ताहाची गुरूवारी ह.भ.प.सोपान महाराज सानप(शास्त्री) यांच्या काल्याच्या कीर्तनाने सेवा समाप्ती झाली आहे.

४ डिसेंबर रोजी सुरू झालेल्या या धार्मिक सोहळ्यात अन्नदान, हरिपाठ जागर, ज्ञानेश्वरी पारायण भागवत यासह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन तसेच भवानी मातेच्या जागरण गोंधळाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात परिसरातील कनका, राजुरा, इसापूर, खानापूर, अंभेरी, इसापूर तांडा, लासीना, पाटण, बोरी गावातील हजारो नागरिकांची दररोज उपस्थिती होती. सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी सार्वजनिक महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमात मंदिर उभारणीसाठी अनेक मंडळींनी बांधकाम साहित्य व रोख रक्कम दान स्वरूपात दिले आहे. मंदिर समितीच्या वतीने लवकरच भवानी मातेच्या गडावर भव्य सभामंडप उभारणीचं काम सुरू होणार असल्याचं आयोजन समितीच्या वतीने सांगण्यात आले आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मोलाचं योगदान आणि सेवा दिली होती.



**हिंगोली– कोट्यावधी रूपये खर्च करून येथील बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांचे निवासस्थानासाठी सुसज्ज अशी इमारत बांधण्यात आली आहे. परंतु या इमारतीमध्ये अद्याप कोणीही राहत नसल्यामुळे परिसरात काटेरी झुडूपे आणि झाडे वाढली असून शासनाचे कोट्यावधी रूपये पाण्यात गेल्याचे दिसत आहे. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांची २८ डिसेंबरला शिष्यवृत्ती परीक्षा

हिंगोली– महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा (एनएमएमएस) इयत्ता ८ वी साठी रविवार, दि. २८ डिसेंबर, २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे. ही परीक्षा राज्यभरात एकूण ७५८ परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी महाराष्ट्र राज्यातून एकूण १३ हजार ७८९ शाळांनी सहभाग नोंदविला असून एकूण २ लाख ५० हजार ५४४ विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात आलेली आहे. परीक्षेसाठी प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळांवर संबंधित शाळांच्या लॉगिनवर दि. १० डिसेंबर, २०२५ पासून उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. ही प्रवेशपत्रे विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांची राहणार आहे. प्रवेशपत्रामधील विद्यार्थ्यांचे नाव, वडिलांचे नाव, आडनाव, आईचे नाव यातील स्पेलिंग दुरुस्त करावयाची असल्यास (कोणत्याही परिस्थितीत पूर्ण नावात बदल करता येणार नाही) तसेच जन्मतारीख, जात, आधार क्रमांक इत्यादी बाबींमध्ये दुरुस्ती आवश्यक असल्यास संबंधित शाळांच्या लॉगिनद्वारे दि. २७ डिसेंबर, २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ऑनलाईन अर्जाव्यतिरिक्त टपाल, समक्ष किंवा ई–मेलद्वारे तसेच विहित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या दुरुस्त्यांचा विचार करण्यात येणार नाही. या दुरुस्त्या परीक्षा झाल्यानंतर लागू करण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्तांनी कळविले आहे.

### ११ कृषी निविष्ठा विक्रेत्यांचे परवाने निलंबीत

हिंगोली– जिल्ह्यात रब्बी हंगामाची पेरणी जवळपास पूर्ण झाली असून खताच्या दुसऱ्या डोससाठी शेतकऱ्यांकडून डीएपी व युरिया खताची मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. वसमत तालुक्यात बाजारात खते उपलब्ध असूनही शेतकऱ्यांना पुरवठा न केल्याबाबत तक्रारी तालुका गुणनियंत्रण निरीक्षकांकडे प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय भरारी पथकाद्वारे सलग चार दिवस वसमत येथील कृषि निविष्ठा विक्री केंद्रांची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान ज्या विक्री केंद्रांवर अनियमितता आढळून आली, त्या केंद्रांवर परवाना अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांच्याकडून परवाना निलंबनाची कार्यवाही करण्यात आली आहे. खत नियंत्रण आदेश १९८५ अन्वये वसमत शहरातील एकूण ११ खत विक्रेत्यांचे परवाने निलंबित करण्यात आले असून त्यामध्ये जय किसान कृषि केंद्र, बसवेश्वर कृषि केंद्र, श्री व्यंकटेश्वरा ॲग्रो एजन्सी, शिवछत्रपती ॲग्रो सोल्युशन, माऊली कृषि केंद्र, श्री साई फर्टीलायझर्स, बाहेती कृषि सेवा केंद्र, हरी ओम कृषि केंद्र, ओम कृषि केंद्र, बजरंग कृषि केंद्र व गुरुकृपा कृषि केंद्र यांचा समावेश आहे. हिंगोली जिल्ह्यातील कोणताही कृषि निविष्ठा विक्रेता चढ्या दराने विक्री, साठवणूक, लिंकींग अथवा अन्य अनियमितता करत असल्यास त्यांच्यावर नियमानुसार कठोर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, अशी ताकीद जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी राजेंद्र कदम यांनी दिली आहे.

{XA

# मुलींच्या वस्तीगृहात ब्लँकेट, गाद्यांचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ डिसेंबर**

येथील आदर्श शिक्षण संस्थेच्या मुलींच्या वस्तीगृहात संस्थेचे सचिव रामचंद्र कयाल यांनी थंडीपासून बचाव करण्यासाठी वस्तीगृहाला ब्लँकेट व गाद्यांचे वाटप केले आहे.

सध्या हिंगोली जिल्ह्यात कडाक्याची थंडी पडत आहे. शहरातील आदर्श महाविद्यायालयाच्या मुलींच्या वस्तीगृहात ४८ मुली निवासासाठी राहत आहेत. या वस्तीगृहात पलंगावर गादी व पांघरण्यासाठी ब्लँकेटची सुविधा नव्हती ही बाब संस्थेचे सचिव रामचंद्र कयाल यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तत्काळ या वस्तीगृहातील मुलींसाठी ४८ ब्लँकेट व गाद्यांचे वाटप केले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष गणेश चौधरी, प्राचार्य डॉ विलास आघाव, संजय नरवाडे, सचिन हटकर, व्यवस्थापिका शैला वाघ, वर्षा सावतकर, सपना पोपलवार, अर्चना चिकटे यांच्यासह मुलींची उपस्थिती होती. ०

# नायलॉन मांजाची विक्री तसेच वापर करणाऱ्यांवर होणार गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ डिसेंबर.**

शहरासह जिल्हाभरात पतंग उडविण्यासाठी नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्यांवर तसेच वापर करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचा इशारा पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिला आहे. पतंग व मांजा विक्रीच्या दुकानांची तपासणी करण्यासाठी पथकेही स्थापन करण्यात आली असल्याची माहीती पोलिस सुत्रांनी दिली आहे.

मकर संक्रातीचा सण उत्साहात साजरा केला जातो. संक्रांतीनिमित्त अबालवृध्द पतंग उडविण्याचा आनंदही साजरा करतात. यावेळी विविध प्रकाराच्या मांजाचा वापर केला जातो. नायलॉन मांजा, चायनीज मांजा किंवा कोणत्याही धोकादायक कृत्रिम मांजाचा वापर हा कायद्याने प्रतिबंधीत केला आहे. या मांजामुळे मानवी जीवीतास तसेच पशु–पक्ष्यांच्या जीवाला गंभीर धोका निर्माण होण्याचे प्रकार मागील काळात अनेक ठिकाणी घडल्याचे दिसून आले.

मकर संक्रांतीनिमित्त आतापासूनच रंगीबेरंगी पतंग बाजारात विक्रीसाठी दाखल झाले आहेत. बच्चेकंपनी पतंग उडविण्याचा आनंद घेतांना दिसून येत आहेत. मात्र यावर्षी नायलॉन मांजा, चिनी मांजा विक्री करणाऱ्यांवर तसेच त्याचा वापर करणाऱ्यांवरही कारवाई करण्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे. जिल्हाभरात मांजा विक्रीवर लक्ष ठेवण्यासाठी पोलिस विभागाकडून स्वतंत्र पथके स्थापन करण्यात आली आहेत. या पथकांकडून मुख्य बाजारपेठेसह गल्लीबोळातील दुकानांचीही तपासणी केली जाणार आहे. मांजाची विक्री, साठा, वाहतुक तसेच पतंगबाजी करणाऱ्यांविरूध्द कायदेशीर कारवाइ करण्यात येणार असल्याचे पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्पष्ट केले आहे. मागील वर्षभरात जिल्ह्यात धोकादायक ठरणाऱ्या मांजाची विक्री करणाऱ्यांविरूध्द कारवाईची मोहीम हाती घेतली होती. त्यावेळी पंधरा जणांवर गुन्हे दाखल झाले असून ३.५० लाख रूपयांचा मांजा जप्त करण्यात आला होता. नागरिकांनी तसेच बच्चेकंपनीने पर्यावरणपुरक मांजाचा वापर करावा. नागरिकांना कुठेही नायलॉन मांजाची विक्री, साठवणुक किंवा वापर होत असल्याचे दिसून आल्यास तातडीने पोलिस ठाण्याला माहीती देण्याचे आवाहनही पोलिस अधीक्षक कोकाटे यांनी केले आहे.

# आंतरराज्यीय आर्यवैश्य वधू–वर परिचय मेळाव्याची जय्यत तयारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ डिसेंबर**

येथील बालाजी मित्र मंडळाच्या वतीने आयोजित आर्यवैश्य समाजातील आंतरराज्यस्तरीय मेळाव्याची तयारी पूर्णत्वाकडे असून समाजातील सर्वच क्षेत्रातील उपवधू उपवरांसाठी द्वितीय परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

सदरील मेळाव्यात जमलेल्या इच्छुक वधू वरांची मोफत लग्न त्यांच्याच इच्छेनुसार लावणार असल्याने हिंगोली येथे आर्यवैश्य समाज बांधव आणि भगिनींनी मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी संकल्प केला आहे. सदरील मेळावा १४ डिसेंबर २०२५ रविवार रोजी हिंगोली अकोला हायवे शेजारी असलेल्या भव्य तिरुमला लॉनमध्ये आयोजित आहे.सकाळी ८.३० वाजता सुरू होणार असून केवळ २५० उपवधू आणि २५० उपवरांची सशुल्क ऑनलाईन नोंदणी करण्यात येत आहे. मेळाव्याच्या रोजी देखील ऑन दि स्पॉट नोंदणी घेतल्या जाणार आहे तर एखाद्या व्यक्तीला प्रवेश पाहिजे असल्यास पाचशे रु. शुल्क असणार आहे. हिंगोलीत द्वितीय आंतर राज्यस्तरावरील हा उपवधु उपवर मेळावा सामाजिक बांधिलकीच्या उद्दिष्ट्य पूर्तीसाठी आर्य वैश्य समाजातील सर्व पुरुष, महिला, युवक युवती, संघटनानी योगदान द्यावे व ऐतीहासिक नोंद करावी असे आवाहन आयोजक बालाजी मित्र मंडळाच्यावतीने गिरीश गुंडेवार व बालाजी मित्र मंडळाच्या सर्व विश्वस्त मंडळींनी केले आहे. बालाजी मित्र मंडळाने जाहीर केलेल्या लिंक वरून नोंदणी करावी असे आवाहन करण्यात आले आहे. मेळाव्यात तीन जणांना अकराशे रू.भरून आवश्यक त्या सर्व सुविधा दिवसभर देण्यात येणार आहेत. नोंदणी केलेल्या एका उपवधू किंवा एका उपवरा सह सोबतच्या अन्य दोघांना प्रवेश, वैद्यकीय सेवा, नाश्ता, दिवसभर चहापाणी, सुग्रास भोजन, भव्य दिव्य अत्याधुनिक रॅम्प, दृक श्राव्य परिचय, यंत्रणा आदी आवश्यक त्या सर्व सुविधा, विविध निःशुल्क आणि सशुल्क स्टॉल्स मधूनही देण्यात येणार आहेत. मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी सेवा द्याव्यात आवश्यक त्या समित्यामध्ये आपापल्या आवडी नुसार स्वंयसेवक म्हणून सेवा देणाऱ्या समाज सेवकांनी बालाजी मित्र मंडळाच्या सदस्याकडे नाव नोंदणी करून सहकार्य करावे असे आवाहन गिरीश गुंडेवार यांनी केले आहे. या मेळाव्याची जय्यत तयारी आर्यवैश्य समाजाच्यावतीने करण्यात येत आहे.

# बनावट परिवहन संकेतस्थळे व फसव्या लिंकपासून सावध रहा– गावडे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ डिसेंबर**

अलीकडील काळात ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन नोंदणी, ई–चलन आदी परिवहन सेवांशी संबंधित बनावट संकेतस्थळे, फसवी मोबाईल ॲप्स एपीके तसेच मोबाईल एसएमएस व व्हॉटस्अपद्वारे पाठविण्यात येणाऱ्या खोट्या लिंकच्या माध्यमातून नागरिकांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक होत असल्याचे निदर्शनास आले आहे. यामधून वाहनचालक व वाहनमालकांची आर्थिक फसवणूक, वैयक्तिक माहितीची चोरी तसेच ओळख गैरवापराचे प्रकार घडत आहेत.

या पार्श्वभूमीवर सर्व वाहनचालक व वाहनमालकांनी केवळ परिवहन विभागाच्या अधिकृत शासकीय संकेतस्थळांचाच वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. वाहन नोंदणीसाठी ड्रायव्हिंग लायसन्ससाठी परिवहन सेवांसाठी तसेच ई–चलनासाठी संकेतस्थळांचा वापर करावा. सर्व अधिकृत संकेतस्थळे ही सीं.ळप या डोमेनने समाप्त होतात. डोमेन असलेल्या कोणत्याही संकेतस्थळांवर नागरिकांनी माहिती भरणे किंवा व्यवहार करणे टाळावे.

फसवणूक करणाऱ्यांकडून बहुधा आपल्या वाहनाचे चलन प्रलंबित आहे, तत्काळ दंड भरा, ड्रायव्हिंग लायसन्स सस्पेंड होणार आहे, त्वरित तपासा अशा स्वरूपाचे धमकीवजा संदेश पाठवून अनधिकृत लिंक देण्यात येतात, याबाबत नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी.

आरटीओ कार्यालय किंवा परिवहन विभागाकडून कोणत्याही परिस्थितीत व्हॉटस्अपद्वारे पेमेंट लिंक पाठविली जात नाही, याची नागरिकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल गावडे यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# कॅनॉल दुरुतीच्या नावाखाली बेकायदा वृक्ष तोड

**तभा वृतसेवा**
**निवघा बा., दि. १२ डिसेंबर-**

तालुक्यातील मौजे तळणी शिवारात गट नंबर ७५ मधुन उर्ध्वपैनगंगा प्रकल्प यांचे कॉनलचे दुस्तुची काम सुरु आसुन सदरील कॅनॉलच्या लगत जवळपास ७० वर्षा पुर्वीचे पिंपळाचे, वड,अंबा व कडूलिंब अश्या प्रकारचे जिवंत हिरवीगार झाडे आहे. भारत देश हा निर्सग आणी वणराईने संपन्न आसलेला समृध्द व हरित देश आहे. सदरील वृक्ष मागिल सत्तर वर्षांपासून जिवंत असुन या वृक्षाची कत्तल करण्याचे बेकायदेशीर कृत्य कॅनॉल दुस्तीचे ठेकेदार व इंजिनीअर हे संगणमत करून करीत आहेत.

हि वृक्षतोड बेकायदेशीर आसुन या कृतीला आमचा सक्त विरोध आहे. आम्ही सदरील इंजीनिअर यांना वारंवार सुचना करुन सुध्दा ते या वृक्षाची कत्तल करणार असल्याचे वक्तव्य करत आमच्या मागणीकडे दुर्लक्ष करीत आहेत. निर्सगाचे पर्यावरण व शेतक-यांच्या पशुधनासह वन्य जिवांचे



रक्षण करण्यासाठी या वृक्षांच्या सावलीचा उपयोग असतो त्यामुळे निसर्ग भकास करून कोणता विकास होणार आहे असा आमचा प्रश्न आहे.

वृक्षाच्या परीसरात पाण्याचा हौद असल्याने अणेक रानटी प्राणी येथे पाणी पिण्यसाठी येत असतात त्यामुळे त्यांचे जिवन स्वरक्षण होते. कष्ठकरी शेतकरी आणी वज्य जिव प्राणी यांच्यासह पाळीव प्राण्यासाठी सदर वृक्षांची सावली हे विसाव्याचे ठिकाण आहे. त्याच बरोबर वड, पिंपळ हे वृक्षवर जनतेची श्रध्दा असल्याने धार्मीक दृष्टया पुजनीय आहे तसेच तेथे मसोबा हे शेतक-यांचे कुल दैवत आहे.

निवेदनाची दखल घेवुन होत असलेली वृक्षतोड तात्काळ याबविण्यासाठी कायदेशीर कार्यवाही करून उपकृत करावे अन्यथा वृक्षप्रेमी व गावकऱ्यांच्या वतीने वृक्ष बचाव करण्यासाठी मोठे आंदोलन करण्यात येईल असे निवेदन समाजिक कार्यकर्ते पवनकुमार डुब्बेवार यांनी हदगावचे तहसीलदार यांना दिले आहे.

# हिमायतनगर ग्रामीण रुग्णालयास जिल्हा शल्यचिकित्सक यांची भेट



**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. १२ डिसेंबर-**

ग्रामीण रुग्णालयास अचानकपणे डॉ.संजय पेरके जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या पथकांनी भेट देऊन येथील कर्मचारी अधिकारी रिक्त पदाचा अनुशेष तसेच उपजिल्हा रुग्णालयास मिळालेल्या मान्य पदे विषयी ईमारत बांधकाम व स्वच्छते विषयी आढावा घेण्यात आला आहे.ग्रामीण रुग्णालयात मोठ्या प्रमाणावर कर्मचाऱ्यांचा रिक्त पदे, कार्यरत पदे व विविध योजनेतील लाभार्थी यांचा आढावा घेण्यात आला आहे. रुग्णालयातील औषधी वाटप कक्ष, रुग्ण तपासणी कक्ष,ऑपरेशन कक्ष आदी विभागाची पाहणी यावेळी करण्यात आली.रुग्णालयात शहरातील नागरिकांनी वैद्यकीय अधिकारी व आधी परिचारीका,कर्मचारी पदे,रिक्त पदा सह अनेक पदे रिक्त आहेत.ती तातडीने भरावी.सोनोग्राफी मशीन, सिटीस्कॅन मशीन,एक्स-रे मशीन या सर्व मशीन धुळकात पडुन असल्याने ते नियमित चालु करुन रुग्णाला नियमित सेवा देण्यात यावी. असे नागरिकांनी मागणी केली आहे.यावेळी उपस्थित असलेले पत्रकार बांधवांनी सीएस यांना काही प्रश्न विचारले असता,त्यांनी जिल्ह्यात आचारसंहिता लागु असल्याने मी काहीही बोलणार नाही.अशी भूमिका घेऊन त्यांनी ग्रामीण रुग्णालयाच्या समस्येविषयी अनास्था दाखवत आपला दौरा आटोपता घेत निघून गेल्याचे दिसुन आले आहे. पत्रकारानां सीएस यांनी आचारसंहितेचे नाव सांगुन विविध समस्यांविषयी प्रश्नांना बगल दिल्याचे बोलले जातआहे. आचारसंहिता व ग्रामीण रुग्णालयास शासकीय दिलेली भेट ही कोणत्याही आचारसंहितेचे उल्लंघन करत नसल्याचे,असे सांगुन ही त्यांनी यावर बोलण्यास नकार दिल्याने याविषयी आश्चर्य व्यक्त होत आहे. यावेळी निवासी वैद्यकीय अधिक्षक जाधव,अन्वर खान पठाण,ईरफान खान पठाण,लाला,ज्येष्ठ पत्रकार सय्यद मन्नान,आसद मौलाना,शे. सादीक, मनोज पाटील,धोंडोपंत बनसोडे,सह अनेक जन उपस्थित होते.



## गडगा केंद्राची शैक्षणिक परिषद उत्साहात; नव्या दिशेने शिक्षणाला चालना

**नायगाव** -गडगा केंद्रांतर्गत मोकासदरा येथील जिल्हा परिषद शाळेत केंद्रस्तरीय शालेय शिक्षण परिषद उत्साहात संपन्न झाली. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (ऊखएढ) यांनी सुचवलेल्या शैक्षणिक उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षकांच्या अध्यापन गुणवत्तावृद्धीसाठी ही परिषद विशेष उपयुक्त ठरली. गटशिक्षणाधिकारी सुरेश पाटील यांच्या मार्गदर्शना खाली केंद्रप्रमुख कपिल गारटे यांच्या नेतृत्वाखाली १० डिसेंबर रोजी आयोजित या एकदिवसीय शालेय शिक्षण परिषदेची सुरुवात शिक्षक गणेश वाले नीं सादर केलेल्या सुरेल स्वागतगीताने झाली. अध्यक्षस्थानी केंद्रप्रमुख गारटे होते. त्यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून परिषदेचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले परिषदेतील मार्गदर्शन सत्रात सुलभक गजानन नागेश्वर व रवि प्रकाश बुध्देवार यांनी सकारात्मक शिस्त, बालसुरक्षा, माता-पालक गट बळकटीकरण यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. तसेच डॉ. जयंत नारळीकर गणित व विज्ञान समृद्धी कार्यक्रम याबाबत माहिती देत विद्यार्थ्यांच्या संकल्पनावृद्धीसाठी नव्या अध्यापन पद्धतींचा उपयोग करण्यावर भर देण्यात आला. केंद्रप्रमुख कपिल गारटे यांनी इयत्ता ४ थी, ७ वी व ८ वी शिष्यवृत्ती परीक्षा, नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा पूर्वतयारी, तसेच विद्यार्थ्यांसाठी सुरू असले ल्या विविध शैक्षणिक योजना व बालसंगोपन योजना यांची माहिती देत शिक्षकांनी संघटितपणे उपक्रम राबविण्याचे आवाहन केले. या परिषदेच्या यशस्वीतेसाठी आनंद गायकवाड (मु.अ., संकुल गडगा), आनंदराव आमलापुरे (पदोन्नत मु.अ.), सूर्यकांत जाधव (माजी पर्यवेक्षक), आनंदराव सूर्यवंशी, एकनाथ मुनगीलवार (माजी मुख्याध्यापक), नागनाथ येल्लूरे व नागोराव चव्हाण यांचे मोलाचे सहकार्य लाभले. समृद्ध विषयांची मांडणी, शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग आणि शैक्षणिक प्रगतीसाठीची दृढ भूमिका यामुळे ही परिषद गडगा केंद्रातील शैक्षणिक उपक्रमांना नवी दिशा देणारी ठरली.

## क्रिकेटपट्टू कु. गंगा कदम यांना शासकीय नोकरी द्यावी : आ. हेमंत पाटील

**नांदेड**-आंतरराष्ट्रीय दिव्यांग दृष्टिहीन क्रिकेट खेळाडू तथा दृष्टिहीन महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार कु. गंगा संभाजी कदम यांना राज्य शासनाकडून शासकीय नोकरी देण्यात यावी तसेच प्रोत्साहनात्मक मानधन मिळावे अशी मागणी मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा ( हळद ) संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष तथा आमदार हेमंत पाटील यांनी राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्याकडे केली. सोबतच राज्याचे क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे आणि दिव्यांग कल्याण विभाग यांच्याकडे सुद्धा केली. हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यातील फुटाणा येथील कु. गंगा संभाजी कदम यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थिती घरातील अडचणी आणि अपंगत्व यावर मात करून क्रिकेटसारख्या जागतिक दर्जाच्या खेळात चमकदार कामगिरी करत भारतीय दृष्टिहीन महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार पदाची धुरा यशस्वी सांभाळली आणि देशाला श्रीलंका येथे झालेल्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत विश्वचषक मिळवून दिला. या विजयाचा जल्लोष देशभरात साजरा करण्यात आला . एवढी मोठी कामगिरी करणारी कु. गंगा कदम हि आपल्या भागातील आपल्या मराठवाड्याच्या मातीतील लेक असल्याचा अभिमान असल्याची भावना आमदार हेमंत पाटील यांनी व्यक्त केली. नुकताच फुटाणा येथे कु.गंगा कदम यांचा सन्मान लेकीचा या कार्यक्रमांतर्गत नागरी सत्कार व सन्मान करण्यात आला. यावेळी आमदार हेमंत पाटील यांनी त्यांचे स्वागत करून त्यांना आर्थिक मदत सुद्धा दिली होती. आपल्या राज्याची मान अभिमानाने उंचविणाऱ्या खेळाडूचा सन्मान करण्यासाठी याहीपुढे जाऊन आमदार हेमंत पाटील यांनी कु. गंगा कदम यांना राज्य शासनाने शासकीय नोकरी द्यावी व प्रोत्साहनात्मक मानधन मिळावे अशी मागणी राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्याकडे आणि सोबतच राज्याचे क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे व दिव्यांग कल्याण विभाग यांच्याकडे सुद्धा केली. आपल्या भागातील खेळाडूंना आपण प्रोत्साहन दिले तर त्यांना उज्ज्वल कामगिरी करण्यासाठी ऊर्जा मिळेल असेही आमदार हेमंत पाटील म्हणाले.

## राष्ट्रीय जल दिनाच्या मागणीसाठी मुंबईत पत्रके वाटून जनजागृती

**नांदेड**- २० मार्च १९२७ महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह हा राष्ट्रीय जल दिन म्हणून घोषित व्हावा या मागणीचा प्रचार आणि प्रसार व्हावा याकरीता या आंदोलनाचे प्रणेते महेंद्र पिंपळगावकर यांनी महापरिनिर्वाण दिनी मुंबईच्या चैत्यभूमी परिसरात पत्रके वाटून जनजागृती केली. त्यांच्या या उपक्रमास भीम अनुयायांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. दरवर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबई येथे लाखोंचा जनसागर उसळतो. या अनुयायांच्या माध्यमातून महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह दिन हा राष्ट्रीय जल दिन घोषित व्हावा ही मागणी सबंध देशभर विशेषतः राज्यात सर्वत्र पोहोचली पाहिजे. त्याच अनुषंगाने आंबेडकरी अनुयायांनी आपापल्या जिल्ह्यात, गावात, परिसरात या मागणी संदर्भात चर्चा घडवून आणावी व त्यांच्या पातळीवर प्रशासनाच्या संबंधितांकडे निवेदनाद्वारे आपली मागणी पुढे रेटावी असा मुंबई येथे पत्रक वाटण्याचा हेतु होता, असे पिंपळगावकर यांनी सांगितले. सदर पत्रकाचे वाटप झाल्यानंतर अनेकांनी ही मागणी रास्त असून याबाबत आपल्या योगदानाची तयारीही दर्शवली.

# जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश चाचणी परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १२ डिसेंबर-**

जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश चाचणी परीक्षा २०२५ जिल्ह्यातील ६४ केंद्रावर शनिवार १३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी १.३० या वेळेत घेण्यात येणार आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता-२०२३ चे कलम १६३ अन्वये या ६४ परीक्षा केंद्रापासून १०० मिटरच्या परिसरात शनिवार १३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ८ ते रात्री ६ वाजेपर्यतच्या कालावधीत परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी, कर्मचारी या व्यतिरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करता येणार नाही असे आदेश पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी निर्गमित केले आहे.

तसेच परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी व कर्मचारी या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस कॅलक्युलेटर, ट्रान्झिस्टर, रेडिओ, लॅपटॉप इ. तत्सम साहित्य परीक्षा केंद्रापासून १०० मीटर परिसरात वापरण्यास व बाळगण्यास तसेच परीक्षा केंद्रात नेण्यास, त्याचप्रमाणे वर दर्शविलेल्या कालावधीत परीक्षा केंद्राच्या परिसरात १०० मीटर पर्यंतची सर्व सार्वजनिक टेलिफोन्स, एसटीडी, आयएसडी, भ्रमणध्वनी, फॅक्स, झेरॉक्स, पेजर आणि ध्वनिक्षेपक चालू ठेवण्यास प्रतिबंध केले आहे.

# नियमबाह्य औषध विक्री करणाऱ्या डी अँड जी फार्मावर औषध प्रशासनाची धडक कारवाई

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १२ डिसेंबर-**

देगलूर नगरपालिका कॉम्प्लेक्समधील डी अँड जी फार्मा या औषध विक्री केंद्रावर औषध प्रशासन विभागाने धडक कारवाई करत परवाना रद्द करण्याचा कठोर निर्णय घेतला असून या आदेशाने शहरातील औषध विक्री व्यवसायात मोठी खळबळ उडाली आहे. तक्रारदार गजानन प्रकाश ढगे यांच्या तक्रारीनंतर सहायक आयुक्त (औषधे) अ. तू. राठोड यांनी २६ ऑगस्ट २०२५ रोजी केलेल्या तपासणीत गंभीर अनियमितता उघड झाल्याने ही कारवाई अपरिहार्य ठरली. परवाना धारकांनी ४ सप्टेंबरला दिलेले स्पष्टीकरण तथ्यहीन आणि समाधानकारक नसल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

तपासणीत डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय औषध विक्री, मुदतबाह्य औषधांचा व्यवहार,



बिलिंगमध्ये चुकीचे बॅच क्रमांक, दुकानात परवाना प्रदर्शित न करणे, तपासणी नोंद वही उपलब्ध नसणे, तसेच Tramadol आणि Pregabalin सारख्या नियंत्रणाधीन औषधांच्या साठ्यात मोठी तफावत अशा गंभीर त्रुटी आढळल्या. भागीदारी बदलाची कायदेशीर नोंद न करणे आणि शेड्यूल क-१ औषधांचे अपूर्ण रेकॉर्डही नियमभंगात मोडल्या. संगणकातील बिघाड किंवा ग्राहकांची गर्दी ही कारणे प्रशासनाने दिशाभूल करणारी ठरवत फेटाळून लावली आहेत.

या पार्श्वभूमीवर परवाना क्रमांक MH-N-N-४६१२८० आणि MH-NN-४६१२८१ हे २१ डिसेंबर २०२५ पासून रद्द मानण्याचा आदेश देण्यात आला आहे. त्या नंतर दुकानात कोणतीही औषध खरेदी-विक्री, साठा ठेवणे किंवा औषधे प्रदर्शित करणे हे कायद्याच्या कलम १८(सी) नुसार थेट गुन्हा ठरणार आहे. संबंधितांना पुढील तीन महिन्यांत मा. अन्न व औषध प्रशासन मंत्री, मंत्रालय मुंबई येथे अपील करण्याची संधी उपलब्ध आहे.

शहरात काही दिवसांपासून डी अँड जी फार्मामधील नियमबाह्य औषध विक्रीबाबत चर्चा रंगत होती. त्यातच परवाना रद्दीची कारवाई होताच नागरिकांत भीतीचे तर औषध विक्रेत्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. देगलूरमध्ये या प्रकरणामुळे औषध व्यवसायातील प्रामाणिकपणावर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

# आदमपूरात खंडोबा पालखीचा वार्षिक महोत्सव उत्साहात

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. १२ डिसेंबर-**

मौजे आदमपूर,(ता. बिलोली) येथे दरवर्षीप्रमाणे श्रीक्षेत्र माळेगांव यात्रेपूर्वी याही वर्षी श्रीदैवत खंडोबा देवाचा अर्थात श्री.मल्हारी मार्तंडांचा एकोणीसावा वार्षिक दिंडी व पालखी यात्रा महोत्सव दि.११ डिसेंबर रोजी गुरूवारी दुपारी वाजतगाजत संपन्न झाला. जागरण कर्ते म.भ.पा.पांडुरंग महाराज वाघे नरसीकर,बळी महाराज वाघे रामतिर्थकर,वारू मंडळी शंकर भरगिरे,पप्पू भरगिरे, माधव भरगिरे,बालाजी डोईफोडे, रामदास देवारे,राम देवारे,मारोती पेंटे,योगेश डोईफोडे,बालाजी पेटेकर,माधव बोडके,बालाजी हरनाळीकर,आत्माराम भरगिरे, बिरप्पा येतोंडे आदिंचा सहभाग होता.केरूर येथील पालखीचाही सहभाग सदरील दिंडीत होता.

येथील श्री.खंडोबा मंदिरावरील पुजारी शिवानंद महाराज डोईफोडे आदमपूरकर व खंडोबा अनुयायी व गावकरी यांच्या सहकार्याने ही यात्रा आयोजित केली जाते.देव मल्हारी मार्तंड पालखीची सुरूवात पुजारी शिवानंद डोईफोडे महाराज यांच्या घरातून परंपरागत वाजत गाजत दुपारी सुरूवात भक्तगणांनी केली. गावातील विविध मंदिरांचे दर्शन करीत पालखीचे गावातील मुख्य रस्त्यावरून मार्गक्रमण सुरू झाले. चाबूक, डफ,तुणतुण्याच्या लयीत वारूंनी पालखी प्रस्थानावेळी रंगत आणली. पिवळ्या धमक भंडाऱ्यात आसमंत न्हाऊन निघाले. पिवळे निशाण डौलाने फडफडत होते.फुले, खोबरे,रेवडी आणि बत्ताशांची मुक्त उधळण झाली. आदमपूरसह गाव परिसरातील अनुयायी यावेळी दर्शनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ.आंबेडकर महापरिनिर्वाण दिना निमित्य विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. १२ डिसेंबर-**

महापरिनिर्वाण दिनानिमित्त मे.फकीरा बहुउद्देशीय संस्था बळीरामपुर नांदेड यांच्या वतीने तालुक्यातील शासकीय आश्रमशाळा मौजे एकघरी येथील शालेय विद्यार्थीना शैक्षणिक साहित्याचे वाटप करुन महापरिनिर्वाण दिनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पुष्प पुजन करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक श्री खैरे सर हे होते. तर कार्यक्रमाचे

प्रमुख पाहुणे म्हणुन श्री चिलकर सर, श्री राठोड सर ,श्री कुमारवाड सर, श्री वाळके सर, श्री डवरे सर, श्री घोडके सर, श्री निम्मलवाड सर आदीची प्रमुख उपस्थिती होती.या प्रसंगी सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून करुन त्रिशरण - पंचशिलाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.कार्यक्रमाचे अध्यक्ष खैरे यांनी डॉ.बाबासाहेब अंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्य विद्यार्थ्यांशी संवाद साधत विद्यार्थ्यांची पुढील स्वप्न जाणुन घेतली यावेळी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध निळ्या आकाशातील लाल वादळ या संचाचे ख्यातनाम प्रबोधनकार माधवराव वाघमारे कृष्णुरकर,स्वर गायिका सविता गोदाम, तबलावादक आदिराज वाघमारे ,पेटीवाद सुरज गायकवाड यांनी प्रबोधनात्मक गीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्तावित संस्थेचे अध्यक्ष संतोष तेलंग यांनी केले. तर सूत्रसंचालन श्री रंजीत रोकडे सर यांनी केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रविण मल्लेवार,साईप्रसाद जळपतराव, सचिन वाघमारे,संदिप फुलारे आदी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी अधिक परिश्रम घेतले होते.

# पदवी प्रात्यक्षिक परीक्षेसाठी सुविधा नसलेल्या महाविद्यालयावर कारवाई करण्याची एसएफआयची कुलगुरूंकडे मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ११ डिसेंबर-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखेच्या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रात्यक्षिक परीक्षा विद्यापीठ मार्फत आयोजित करण्यात आल्या होत्या्. पण संबंधित महाविद्यालयात सदरील प्रात्यक्षिक परीक्षेसाठी लॅब(प्रयोग शाळा) उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होऊन त्यांनी नाराजी व्यक्त केली्. या विषयाची प्रात्यक्षिक परीक्षेचा फटका बसू नये असे असल्याचे निवेदन दिनांक ११ डिसेंबर २०२५ रोजी एसएफआय विद्यार्थी संघटना नांदेड जिल्हा कमिटीच्या वतीने विद्यापीठाचे कुलगुरू यांच्या नावे केंद्रीय आवक जावक विभागात देण्यात आले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड च्या वतीने दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी पासून घेण्यात आलेल्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखेच्या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रात्यक्षिक परीक्षा विद्यापीठ मार्फत आयोजित करण्यात आले आहेत. सदर परीक्षा साठी बहिस्त परीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. पण यावेळी महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रावर गंभीर स्वरूपाच्या त्रुटी आढळून आल्या की परीक्षा केंद्रावर त्या विषयाच्या प्रयोगशाळाच उपलब्ध नव्हत्या व विद्यार्थ्यांना लागणारे रसायने उपलब्ध नसल्याचे येथील बहिस्थ परीक्षकाच्या लक्षात आले आणि त्या परीक्षकांनी सदर माहिती विद्यापीठास कळवलेली आहे. या महाविद्यालयाच्या निष्काळजीपणे वागून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष अडचणीत आल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांनी नाराजी व्यक्त करून सदरील गैरवर्तन करणाऱ्या महाविद्यालयावर विद्यापीठाने योग्य ती कारवाई करून व त्यांची सलग्निता रद्द करण्यात यावी, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसान करता त्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा पर्यायी पद्धतीने व पर्यायी ठिकाणी तात्काळ आयोजित करण्यात यावी अशा घटना घडणार नाही याची काळजी परीक्षा पूर्वच घ्यावी व महाविद्यालय सुविधा पडताळणी ऑनलाईन करून घ्यावी अशा आशयाचे निवेदन एसएफआय संघटनेचे डॉ. सचिन खेडकर व गजानन इंगोले यांनी दिले आहे.

# दत्त जयंतीनिमित्त भव्य कविसंमेलन व महाप्रसाद कार्यक्रम उत्साहात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ११ डिसेंबर-**

अक्षरोदय साहित्य मंडळ, महाराष्ट्र राज्य या प्रतिष्ठित साहित्य संस्थेमार्फत दत्त जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेला भव्य कविसंमेलन व महाप्रसाद कार्यक्रम अत्यंत उत्साह, भक्तिभाव आणि साहित्यिक रंगतदार वातावरणात पार पडला. बालाजी मंदिर, स्नेहांजली कॉलनी, नांदेड येथे हा सोहळा रविवारी संध्याकाळी झाला. मोठ्या संख्येने साहित्यप्रेमी, कवी, महिला, युवक, समाजकार्यकर्ते आणि नागरिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाला अभूतपूर्व प्रतिसाद दिला.कार्यक्रमाची सुरुवात दत्ताच्या प्रतिमेचे पूजन करून शांत व भक्तिमय वातावरणात झाली. सूत्रसंचालनाने कार्यक्रमाला सुसंवादी सुरुवात झाली. दत्त जयंतीचा धार्मिक आणि सांस्कृतिक उत्सव व त्यात साहित्याचा सुगंध अशी सुंदर मेळ साधणारा हा उपक्रम यंदा विशेष गाजला.कार्यक्रमाचे अध्यक्षा सुनंदा भगत म्हणाले, साहित्य ही फक्त अभिव्यक्ती नसून समाज बदलण्याची ताकद आहे. दत्त जयंतीसारख्या दिवशी कवींच्या माध्यमातून मूल्य, संस्कार आणि सामूहिकता जागवणे ही अक्षरोदय साहित्य मंडळाची परंपरा आहे. कवी-कलावंतांना व्यासपीठ देणे, त्यांना मान देणे आणि साहित्यिक बंध वाढवणे हा आमचा उद्देश पुढेही असाच राहील.

समाजातील बदल, सद्भावना, कवींची भूमिका आणि साहित्याची दिशा यावर त्यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे मा. अशोक कुबडे आणि मा. दत्ता वंजे उपस्थित होते. दोन्ही मान्यवरांनी संस्थेच्या उपक्रमांचे कौतुक करून,कविसंमेलन म्हणजे समाजाला शब्दांनी घडवण्याचे कार्य. आज ऐकलेल्या कवितांमधून समाजातील वेदना, आशा आणि बदलाची हाक स्पष्ट जाणवली. अशा भावना व्यक्त केल्या. तसेच त्यांनी कवी-लेखकांचे प्रोत्साहन, युवा पिढीला साहित्याकडे ओढण्याचे प्रयत्न यांचे कौतुक केले. कविसंमेलनात राज्यातील अनेक प्रतिभावंत कवींनी सहभाग घेतला. पंडित पाटील बेरळीकर, अनुरत्न वाघमारे, नागोराव डोंगरे, प्रज्ञाधर ढवळे, मोरे सर, वाघमारे ताई, रुपाली वाघरे, पवळे सर, बालाजी भागानागरे, मनिषा सपकाळे भावकविता, सामाजिक कविता, ओवी, विनोदी चारोळ्या, स्त्रीविषयक काव्य, ग्रामजीवन, पर्यावरण, आध्यात्म विचार अशा विविध रंगांनी संपूर्ण मंच भारावून गेला.कवींच्या ओजस्वी सादरीकरणांवर रसिकांनी टाळ्यांचा कडकडाट करत भरभरून दाद दिली. अनेक कविता विचारप्रवर्तक तर काही कविता विनोद आणि मिश्कीलपणाने रसिकांना खळखळून हसवणाऱ्या ठरले. या उपक्रमात महिला कवींनी अत्यंत प्रभावी कविता सादर केल्या. महिलांच्या भावविश्वापासून ते सामाजिक मुद्द्यांपर्यंत त्यांच्या कविता ठसठशीतपणे समोर आल्या. रसिकांनी त्यांच्या सादरीकरणाचे मनापासून स्वागत केले. कार्यक्रमाच्या यशात संस्थेच्या पुढील मान्यवर सदस्यांनी मोठी जबाबदारी सांभाळली सौ. चव्हाण ताई, मनिषा सपकाळे, वाघमारे ताई व अनेक सदस्यांनी समन्वय करत कार्यक्रम सुरळीत पार पाडला. कविसंमेलनानंतर आयोजित महाप्रसादात मोठ्या संख्येने भक्त व नागरिक सहभागी झाले. समाजातील विविध घटक एकत्र येऊन केलेले भोजन हा एकात्मतेचा सुंदर प्रतीक ठरला. संपूर्ण कार्यक्रमाचे मार्गदर्शन चंद्रकांत चव्हाण (राज्य सहसंपर्क प्रमुख) यांनी केले. त्यांचे नियोजन, संपर्क व समन्वय कौतुकास्पद ठरले. दत्त जयंतीच्या निमित्ताने साहित्य, संस्कृती, भक्ती आणि सामूहिक सलोखा यांचा अद्भुत संगम या कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला.या कार्यक्रमाने नांदेड शहरात साहित्यिक जागर निर्माण केली असल्याचे सर्व उपस्थितांचे मत होते.अक्षरोदय साहित्य मंडळाने अशा कार्यक्रमांची पुढेही परंपरा चालू ठेवावी, अशी सर्व स्तरातून अपेक्षा व्यक्त करण्यात आली.